।। श्रीदेव अंजनेश्वर प्रसन्न ।।

बारा गावांचे स्वयंभू जागृत देवस्थान

# श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे

मु. पो. मिठगवाणे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी - ४१५ ८०५

(ट्रस्ट रजि. नं. ए-६७ नोंदणी वर्ष- सन १९५२)

# वार्षिक अहवाल

(वर्ष सन २०२२-२३)





नवीन निशाणकाठीचे स्वागत होताना...



जुन्या निशाणकाठीचे विसर्जन आणि नवीन निशाणकाठीची स्थापना समारंभ...



श्री. नरेश कांबळी यांच्या घराशेजारी माता भगिनींनी केलेले निशाणकाठीचे औक्षण कार्यक्रम...



लघुरुद्र स्वाहाकार पूर्णाहुती...



मिठगवाणे तेली समाजाच्या ५०० मशालींच्या प्रकाशात झालेला पालखी सोहळा...



यज्ञ समारंभातील भाविकांची उपस्थिती...



तुळशी विवाह समारंभ



ह. भ. प. कैलास खरे यांची कीर्तनसेवा...




कार्तिकोत्सवातील पालखीसोहळा



मिठगवाणे तेली समाज शोभायात्रा...

॥ श्री देव अंजनेश्वर प्रसन्न ॥



बारा गावाचे जागृत देवस्थान



# श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे

(ट्रस्ट रजिस्ट्रेशन नं. ए–६७ नोंदणी वर्ष सन १९५२)

## -निमंत्रण -

स.न.वि.वि.

प्रतिवर्षाप्रमाणे श्रीदेव अंजनेश्वरचा वार्षिक कार्तिकोत्सव मिती कार्तिक शुध्द दशमी ते कार्तिक पौर्णिमा, बुधवार दिनांक २२ नोव्हेंबर २०२३ ते रविवार दिनांक २६ नोव्हेंबर २०२३ असा पाच दिवसांचा आहे. उत्सव काळातील पाच दिवसामध्ये आरती, भोवती, कीर्तन हे प्रथेप्रमाणे कार्यक्रम होणार आहेत. तरी आपण सर्वांनी अगत्यपूर्वक उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी व यथाशक्ती देणगी पाठवावी ही विनंती.

आपला नम्र,

विश्वस्त,

श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे

संपर्कासाठी मोबा. नं. ९८२३२७७३२६ (whats app)***

ई–मेलआयडी–shridevanjaneshwar@gmail.com

# • जनरल सभेची नोटीस •

**सर्व सन्माननीय खोतमंडळी, सेवेकरी, मानकरी, देणगीदार मंडळी, आणि देवस्थान हितचिंतक यांसी**

स.न.वि.वि.

कार्तिकी उत्सवाचे पूर्वनियोजन करण्यासाठी सोमवार दि. ०६.११.२३ रोजी संध्याकाळी ७.०० वाजता श्री देव अंजनेश्वर मंदिरात जनरल सभेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी विश्वस्त, खोत मंडळी, सेवेकरी, मानकरी, देणगीदार व अन्य सर्व हितसंबंधी व्यक्तींनी जनरल सभेसाठी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

आपला नम्र,

विश्वस्त,

श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे

कार्तिकी उत्सवाबाबत काही महत्त्वाच्या सूचना अथवा काही नवीन अभिनव कल्पना असतील तर जनरल सभेपूर्वी दोन दिवस प्रत्यक्ष भेटून अथवा पत्रव्यवहार करून सांगाव्यात. तसेच देवस्थान कामकाजाबाबत आपल्या काही तक्रारी अथवा हरकती असतील तर त्या तक्रारी दोन दिवस अगोदर निःसंकोचपणे सांगाव्यात किंवा लेखी स्वरूपात पाठवाव्यात.

*** टिप – या ट्रस्टच्या ट्रस्ट इंस्ट्रूमेंटमध्ये मासिक सभा अथवा जनरल सभा घेण्याची तरतूद केलेली नाही तरी सुध्दा सन २००८ पासून महाशिवरात्री उत्सवाचे पूर्वी आणि कार्तिकी उत्सवाचे पूर्वी नियमितपणे जनरल सभा बोलावून देवस्थान ट्रस्ट बाबतचे हिशोबाचे तपशील आणि अन्य महत्वाचे तपशील सांगितले जातात. आणि त्याचे प्रोसिडिंग ठेवले जाते.**

# - कार्तिकोत्सवातील कार्यक्रम -

• प्रतिवर्षीप्रमाणे रोज रात्री ठिक ९.०० वाजता धुपारती. आरती व पालखी प्रदक्षिणा होईल. रोज रात्री ठिक १० वाजता **ह.भ.प.श्री. महेश सरदेसाई, रत्नागिरी** यांचे कीर्तन होईल..

कीर्तनासाठी ऑर्गनसाथ श्री.मनोहर विष्णू तथा उदय गोखले, नाणार व तबला साथ श्री. सुधीर जोशी, सांगली यांची असणार आहे.

• **शनिवार दि.२५.११.२०२३** रोजी सकाळी ८.०० ते दुपारी १२.००पर्यंत **'लघुरूद्रस्वाहाकार' व यज्ञाची पूर्णाहुती** होईल. त्यानंतर दुपारी १.०० वाजेपर्यंत यज्ञप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे आणि संध्याकाळी ५.०० ते ७.०० या वेळेमध्ये श्री देवी भराडणी मंदिरामध्ये धार्मिक कार्यक्रम होणार आहे आणि श्रीदेवी भराडणी अंजनेश्वर उत्सवासाठी पालखीमधून बसून निघणार आहे.

• **रविवार दि.२६.११.२०२३** रोजी सकाळी १० वाजता **बलीपूजन** कार्यक्रम होईल. दुपारी १२.०० वाजता श्रीदेवाला महाप्रसाद दाखवण्यात येईल.

दुपारी १२.३० ते २.३० वाजेपर्यंत सर्व भाविक भक्तांसाठी **महाप्रसाद** वाटप सुरू राहील. त्या दिवशी संध्याकाळी ७.०० वाजता **त्रिपूर पूजन** होईल. रात्री १२.०० आरती, भोवती, लोटांगण, दरबार झाडणे आदी कार्यक्रम होतील. रात्री उशिरा सामान्यपणे दोन वाजता लळीताचे कीर्तन सुरू होईल. सकाळी चार वाजेपर्यंत उत्सवाची सांगता होईल.

•••

● आग्रहाचे आमंत्रण ●

# *श्रीदेवी भगवती पालखी सोहळा*

शनिवार दि. २५ नोव्हेंबर २०२३ रोजी ‘श्री देवी भगवती देवी, भंडारसाखरी’ ही ‘श्री देवी भराडणी देवी’च्या भेटीसाठी येणार आहे. हा कार्यक्रम संध्याकाळी ७.०० वाजता संपन्न होईल. श्री देवी भराडणी मंदिरामध्ये देवीवर धार्मिक संस्कार झाल्यावर श्री देवी भराडणी सह श्रीदेवी भगवती अंजनेश्वर मंदिराकडे निघेल. अंजनेश्वरच्या पालखीसोहळ्यामध्ये सहभागी होऊन मंदिरांतील आदरातिथ्य स्वीकारून दोन्ही देवींचे पुन्हा परतीच्या प्रवासाचा कार्यक्रम होईल. तरी आपण सर्वांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

आपला नम्र,<br>
विश्वस्त,<br>
श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे

# ● महत्वाच्या सूचना ●

● देणगीदारांनी आपली देणगी श्रीदेवाच्या बँक खात्यात थेटपणे जमा करावी.

● क्यूआरकोडने अंजनेश्वर साठीची देणगी थेटपणे पाठवता येते. सर्व पेमेंट ॲप च्या सहाय्याने रक्कम थेटपणे अंजनेश्वर बँक खात्याला जमा होत असल्याने हा मार्ग सगळ्यात सर्वोत्तम आहे. तरी आमची विनंती आहे की या पुढे अंजनेश्वर साठी देणगी देण्यासाठी क्यूआर कोडचा वापर करावा. क्यूआर कोडने देणगी पाठवून झाल्यावर पेमेंट स्क्रीन शॉट आणि देणगीदाराचा संपूर्ण पत्ता (पिनकोड/मोबा.नं सह) पाठवण्यास विसरू नये.. सोबत क्यूआर कोड दिला आहे.

– बँक खात्याचा तपशील–

**'श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे'**

**A/c No- 143710100000001**

**IFSC code- BKID0001437**

**बँक ऑफ इंडिया, मिठगवाणे शाखा**

**देणगी देण्यासाठी क्यूआर कोड :**

**BHIM BOI UPI QR**

**SCAN HERE TO PAY**

**WITH ANY BHIM UPI APP**

SHRI DEV ANJANESHWAR KASBA MITHGAVANE

boism-7038785001@boi

UPI | BHIM

Payment Through Any UPI App Accepted Here

भीमअॅप, पेटीएम आदी मोबाईलअॅपद्वारा वरील तपशील घालून देणगी रक्कम पाठवता येईल. तसेच कोणत्याही बँकेतून एनईएफटी /आरटीजीएस करता येईल. देणगी श्रीदेवाच्या बँक खात्यात जमा केल्यावर पेमेंट स्क्रीनशॉट व आपला पूर्ण पत्ता (पिनकोड व मोबाईल नंबर सह) whatsapp no-९८२३२७७३२६ वर मेसेज करून किंवा shridevanjaneshwar@gmail.com या मेल वर पाठवता येईल. भाविक भक्तांनी आपली देणगी थेट **श्रीदेवाच्या बँक खात्यात पाठवण्यास प्राधान्य द्यावे.** आपला पूर्ण पत्ता ९८२३२७७३२६ या व्हाट्स्अप नंबरला मेसेज करून पाठवल्यावर देणगीपावती बनवून आपल्याला पोस्टाद्वारे पाठविणे, प्रसाद/अंगारा पाठविणे सोयीचे होईल. कृपया बँकेत जमा केलेल्या देणगीचा तपशील न विसरता पाठवावा.

● मनीऑर्डर द्वारा देणगी रक्कम पाठवताना मनीऑर्डर फॉर्मवर संपूर्ण पत्ता पिनकोड सह लिहावा. मनीऑर्डर रिसीट चा फोटो whats app no. -९८२३२७७३२६ – वर मेसेज करून पाठवता येईल.

● देणगीदारांना कोणत्याही बँकेत स्वत:च्या नावाने मुदत ठेव ठेवून त्याचे तिमाही अथवा वार्षिक व्याज श्रीदेवाच्या बँक खात्याला ट्रान्स्फर करता येईल. आपल्या व्याजाची रक्कम वर्षभर होणाऱ्या सर्व धार्मिकांसाठी व देवस्थान सुधारणेसाठी खर्च होईल. अशी मुदत ठेव किमान रु. १० हजार किंवा समान पटीत असावी, अशी विनंती आहे. या देणगीदारांची नावे कायम देणगीदार या सदराखाली येतील. व्याज जमा झाल्यावर देणगी पावती/प्रसाद पाठवणे ही देवस्थानची जबाबदारी राहील.

● **भाविक भक्तांना आपले गुप्त दान, निनावी देणगी दानपेटीत अर्पण करता येईल.. दानपेटीत जमा झालेल्या दानाचा विनियोग भोजन प्रसाद, स्वाहाकार सारखे धार्मिक विधी आदीसाठी खर्चीला जाणार आहे. लखोटा बंद देणगी रक्कम संपूर्ण नाव, गांव, पूर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक आदी तपशील नमूद करून दानपेटीत अर्पण झाल्यास यथावकाश देणगीपावती अंगारा–प्रसादासह पाठवली जाईल..**

● श्रीदेवाला वस्तुरूप देणगी देताना देवस्थानशी संपर्क साधून दिल्यास योग्य होईल. मंदिरातील गरजा लक्षात घेऊन वस्तुरूप देणगी दिली जावी, अशी नम्र सूचना आहे.

● देवस्थान संबंधातील अनेक तऱ्हेची माहिती/फोटो/व्हिडीओ व सर्व काही 'Shree Dev Anjaneshvar Devastan' या फेसबुक पेजवर अपलोड करण्यात आली आहे. तरी आपणही या फेसबुक पेजला आवर्जून भेट द्यावी.

● देवस्थान भक्तनिवासामध्ये निवास व भोजन, नाश्ता, चहापानाची सोय होण्यासाठी श्री. सदानंद तुकाराम तथा राजा लिंगायत यांचेशी मोबा.नं. ७२६२९१९५१४ या द्वारे आगाऊ संपर्क साधावा. निवास व्यवस्थेच्या नोंदणीसाठी आपले आधारकार्ड अनिवार्य आहे.

● श्रीदेवावर आवर्तन, अभिषेक, एकादशणी आदी धार्मिक विधींसाठी श्री. विजय भुस्कुटे मोबा नं. ९८२०६७५०८५ (व्हाट्सअॅप),श्री.शेखर फडके मोबा. नं.९३२६६२१४०४ (व्हाट्सअॅप)/ ८५५२९७६२३२ अथवा श्री.प्रकाश परांजपे ९४२१४४१६४४/८४१२८७९३२२ यांचेशी आगाऊ संपर्क साधावा .

● श्री देवाच्या पिंडीवर धान्याची पूजा बांधायची असल्यास श्री. विजय वामन लिंगायत ९४२३३७४५९१ अथवा संतोष वामन लिंगायत ९५४५२७१९५० यांचेशी संपर्क साधावा..

●●●

**देणगी देण्यासाठी क्यूआर कोड :**

**BHIM BOI UPI QR**
**SCAN HERE TO PAY**
**WITH ANY BHIM UPI APP**

SHRI DEV ANJANESHWAR KASBA MITHGAVANE

boism-7038785001@boi

UPI | BHIM

Payment Through Any UPI App Accepted Here

**2012-17** **2017-18** **2018-19**

**2019-20** **2020-21** **2021-22**

( वरील QR Code द्वारे गुगल ड्राइव्ह फाईल स्वरुपात गेल्या दशकभरातील देवस्थान कामकाजाचा आढावा म्हणून अहवालांच्या प्रती भाविकांना उपलब्ध करून दिल्या आहेत.)

फेसबुक पेज यूट्युब चॅनल वेबसाईट

देवस्थानच्या फेसबुक पेज, युट्युब चॅनल, आणि वेबसाईटशी सुलभपणे कनेक्ट होण्याची सोय म्हणून QRCode दिले आहेत.

# मनोगताचे 'दोन शब्द'

**सर्वांसी नमस्कार.**

प्रतिवर्षाप्रमाणे आजरोजी दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर सन २०२२/२३ सालचा वार्षिक अहवाल आपल्याला समोर ठेवत आहे. आजरोजी सकाळी ठिक ७.०० वाजता श्रीदेव अंजनेश्वर महाराजांच्या समोर हा वार्षिक अहवाल सखोल पडताळणीसाठी ठेवला आहेच.आपणही हा वार्षिक अहवाल वाचून आपले अभिप्राय,आपल्या सूचना आमच्यापर्यंत पाठवाव्यात.

फेसबुक, व्हाटस अप, आणि शक्य तिथे हस्तदेय पध्दतीने हा 'वार्षिक अहवाल' आपल्यापर्यंत पोहोचवून वर्षभरातील एकूण कारोभाराचा लेखाजोखा आपल्यापुढे सादर केला आहे.कुणी मागणी केली तर हा वार्षिक अहवाल पोस्टाने त्या मागणीदाराच्या पत्त्यावर पाठवता येईल.

सन २००७ ते२०१२ हा पंचवार्षिक अहवाल, सन २०१२ ते २०१७ हा दुसरा पंचवार्षिक अहवाल आणि त्या नंतर सन२०१७/१८चा वार्षिक अहवाल, सन २०१८/१९चा वार्षिक अहवाल, सन २०१९/२०चा वार्षिक अहवाल, सन २०२०/२१ चा वार्षिक अहवाल, सन २०२१/२२ चा वार्षिक अहवाल आपल्याला यापूर्वी सादर केलेला आहे आणि या सर्व अहवालांच्या पीडीएफ कॉपी देवस्थान फेसबुक पेजला व देवस्थानच्या वेबसाईटला अपलोड केलेल्या आहेत. त्यामुळे सन २००७/०८ पासूनचा सर्व आर्थिक व्यवहार आणि झालेले कामकाज अहवालांच्या रूपाने शब्दबध्द करुन आपल्या समोर ठेवलेले आहे. सन २०२२/२३ चा हा वार्षिक अहवाल पीडीएफ कॉपी मध्ये अंजनेश्वर देवस्थान फेसबुक पेजला आणि देवस्थानच्या संकेत स्थळावर कायम स्वरुपी उपलब्ध करून ठेवला आहे. सर्व अहवाल सहजपणे पाहता यावेत म्हणून प्रत्येक अहवालसाठी क्यूआर कोड तयार केला आहे. अंजनेश्वर फेसबुक पेज कधीही वाचता यावे म्हणून त्यासाठी क्यूआर कोड तयार केला आहे.अंजनेश्वर युट्यूब वरील व्हिडिओ क्लिप पहाण्यासाठी क्यूआर कोड तयार केला आहे.अंजनेश्वर वेबसाईट क्यूआर कोड स्कॅन करून पहाता येणार आहे.अंजनेश्वर बँक खात्याचा क्यूआरकोड वापरून देणगी पाठवणे सुलभ केले आहे.

वर्षभरातील सारे सारे कामकाज आपल्यापर्यंत पोहोचावे, वार्षिक जमाखर्च समजावा,वर्षभरातील उत्सवांचे सर्व सामान्य समालोचन शब्दबध्द असावे,वर्षभरात मंदिर परिसरात झालेल्या सोयीसुधारणांचा गोषवारा आपणा सर्वांना वर्षाच्या वर्षाला समजावा म्हणून या वार्षिक अहवालाचे प्रयोजन आहे. हा वार्षिक अहवाल म्हणजे वर्षभराचे प्रोसिडिंग आहे, वर्षभरातील संपूर्ण कामकाजाचे इतिवृत्त आहे. वर्षभरातील सारें सारें कामकाज 'उजेडी' ठेवण्यासाठीचा हा माझा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

वार्षिक अहवालाचे निमित्ताने वर्षभरातील सर्व कामकाजाचे इतिवृत्त तथा प्रोसिडींग लिहून आपल्याला सादर केले आहे.जेणेकरुन सर्व गोष्टी तपशीलाने समजाव्यात आणि वर्षानुवर्षे हा मजकूर वार्षिक अहवालच्या निमित्ताने जतन व्हावा.अतिविस्तार झाला असला तरी पुढील अनेक वर्षांसाठी या अहवाल वर्षातील अनुभव उपयोगी ठरतील व या अनुभवाच्या प्रकाशात पुढील वाटचाल करता येईल. अहवाल लिखाणात काही चूक भूल झाली असल्यास निदर्शनास आणून द्यावी व चूकभूलीला आपण मोठ्या मनाने माफी द्यावी.

सन २०२२ मधील कार्तिकी उत्सवाच्या अगोदर एक दिवस जुन्या निशाणीकाठीचे अवरोहण तथा विसर्जन झाले आणि नवीन निशाणीकाठीचे आरोहण तथा स्थापना झाली. चांदीची पालखी आणि चांदीचे सिंहासन याचा संकल्प सोडून सुरूवात म्हणून चांदी विटांचे कलेक्शन विधीवत सुरू झाले आहे. चांदी संकलनाचे काम सन २०२६ पर्यंत करून सन २०२७ मध्ये चांदीची पालखी आणि चांदीचे सिंहासन करायचे आहे. सिंहासन आणि पालखी शिशवी लाकडाची करून झाली आहे. महत्वाचे म्हणजे श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे हा ट्रस्ट आयकर विभागाकडे ' पूर्णत: धार्मिक पब्लिक ट्रस्ट' म्हणून नोंदला गेला आहे. यामध्ये श्री.निलेश पाटणकर सीए यांचे योगदान सदैव स्मरणात ठेवले पाहिजे.आयकरातून १००% माफी मिळणार आहे.सुमारे चार साडेचार लाख रुपये यामुळे देवस्थानच्या धार्मिक कार्यात किंवा मंदिर दुरूस्तीमध्ये उपलब्ध होणार आहेत. ही एकप्रकारची मोठी बचत झाली आहे.श्रीदेवी भराडणी मंदिराचे आणि परिसराचे नूतनीकरण करण्यात आले आहे. हे महत्त्वाचे काम झाले आहे.'श्रीदेव अंजनेश्वर पथदीप योजना' ही एक नवीन लोकोपयोगी योजना देवस्थान मार्फत राबवली जात आहे. संध्याकाळी ७.०० ते रात्री १२ पर्यंत ग्रामस्थांना रात्र प्रकाशाची सोय व्हावी म्हणून ही अंजनेश्वर पथदीप योजना एक लोककल्याणकारी योजना म्हणून राबविण्यात आली आहे. मिठगवाणे माडबन गावामध्ये हे पथदीप लावण्यात आले आहेत.लोकांचे सहकार्य मिळाले तर ही योजना नक्कीच यशस्वी होईल आणि त्या मध्ये हळूहळू वाढ आणि सुधारणा करता येईल. यावर्षी पासून सर्व हिशोब टॅली सॉफ्टवेअर मध्ये करण्यास सुरुवात केली आहे. जेणेकरून कधीही हिशोबाचे सर्वच्या सर्व तपशील सार्वजनिक करता येतील.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहीनी योजना, अंजनेश्वर जमीन क्षेत्रामध्ये मनरेगा मधून फळबाग लागवड योजना आदी काम हाती घ्यायचे आहे. अंजनेश्वर जमीन जागेला कंपाऊंड वॉल घालणे आदी कामे हाती घेतली आहेत. प्रयत्न करणे हे माझे काम आहे. यश देणें हे सर्वस्वी श्रीदेवाच्या हाती आहे. विरोध झेलून अविरत काम करणे हे माझे हाती आहे. अंजनेश्वर चाफा स्टॉप जवळ आरसीसी प्रवेशद्वार बांधून झाले आहे. हेतू असा की रस्त्यावरून जाता येताना श्रीदेवाकडे जाणारा मार्ग लक्षात रहावा. तेथून येणारा रस्ता सुध्दा डांबरीकरण करून घेण्यासाठीचा प्रयत्न सुरू आहे. जेणेकरून चाफा स्टॉप कडून भाविक भक्तांना मंदिराकडे येणे सोपे सोयीचे व्हावे. अंजनेश्वर मंदिराकडे येणारे सर्वच्या सर्व रस्ते, मार्ग डांबरीकरण कॉक्रीटचे करण्यासाठी प्रयत्न करत आहे. अर्थात तिथेही प्रयत्न यशस्वी होणे, हे आपल्या हाती नाही तर ते केवळ आणि केवळ श्रीदेवाच्या हाती आहे.

धर्मशाळा विस्तारीकरणासाठीचा पहिला टप्पा हाती घेतलेला आहे. पिलर आणि त्यावर स्लॅब घातला की त्यावर चार-पाच संडास बाथरुम सहीत खोल्यांचे बांधकाम शासननिधी उपलब्ध करून करायचे आहे. आयकराच्या रूपाने संचित निधी खर्च करून त्या कामामधील पहिला टप्पा मार्गी लावायचा आहे.श्रीदेव अंजनेश्वरच्या पिंडीवर वज्रलेपन करण्यासाठी सर्व आवश्यक पूर्तता केली आहे.परमेश्वराची इच्छा होईल तेव्हा ते कार्य आपोआप पूर्णत्वास जाईल. श्रीदेवी भराडणीमदिराचा थोडाफार कायापालट करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच 'श्रीदेव अंजनेश्वर पथदीप योजना' ही एक अभिनव योजना अजूनही थोडीफार विस्तारीकरण करण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

मित्रांनो, श्री देव अंजनेश्वरचे कामकाज अगदी मनापासून आणि निरपेक्ष भावनेने करणे हे मला माझे कर्तव्य वाटते. माझ्या नावाचा स्पेशल उल्लेख करण्याची या कामामध्ये गरजच भासत नाही. श्रीदेवाचे नांव जसे जसे मोठे मोठे होत जाईल तसतसे आपले केलेले कामकाज पुण्यदायी होत जाईल, असे मला नेहमी वाटत रहाते. त्यामुळे विश्वस्त म्हणून माझ्या नावाचे संबोधन मी या छपाईमध्ये केलेले नाही. संपर्काचा फोन नंबर पुरेसा आहे आणि म्हणून माझ्या नावाचा उल्लेख नाही. अर्थात अहवालातील प्रत्येक अक्षराची जबाबदारी सर्वस्वी माझी आहे, असे मी समजतो. **देवस्थानचा कारभार मुंबई विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५०, आयकर कायदा, देवस्थान ट्रस्टच्या नोंदणीमधील देसाई संस्थापकांच्या नमूद केलेल्या इच्छा, अपेक्षा आणि दि.१७.११.१९५२ रोजीची मा. धर्मादाय आयुक्त कोल्हापूर यांच्या आदेशानुसार यथोचितरीत्या चालविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहे.** वैयक्तिक व्यक्तीसंबंध बाजूला सारून श्रीदेव अंजनेश्वर देवस्थानचे समग्र हिताचा विचार करून कारभार चालविण्याचा प्रयत्न असतो. जे जे देवस्थानसाठी हिताचे आहे ते ते करण्यासाठी आग्रही असतो. स्वत:चा मान सन्मान बाजूला ठेवून, जे जे अंजनेश्वरसाठी आवश्यक आहे ते ते सर्व काही करायचे, असे माझे ध्येय आहे. वर्षभरातील सर्व जमा व सर्व खर्च रक्कमेचे उत्तरदायित्व माझे आहे असे मी समजतो.देवस्थान कामकाजातील सर्व चुका उणीवा, लाभहानी याचाही भार आपणच स्वाभाविकपणे स्वीकारला पाहिजे, झटकून चालणार नाही असे मला वाटते..देवस्थानच्या एकूण कारभाराबद्दल कधीकाळी टीकाटिपण्णी झाली तरी आपणच ती सहजतेने झेलली पाहिजे, असे मला वाटते. माझेसाठी श्री देव अंजनेश्वर सर्वस्व आहे, त्याचा गरीमा उंचावणे हे माझे कर्तव्य आहे. 'अंजनेश्वर' या नावाला यत्किंचितही ओरखडा कधीही पडू नये असे मला वाटते. माझ्याकडून कशापध्दतीने काम करून घ्यायचे हे श्री देव अंजनेश्वर महाराज ठरवत असतात. त्यामुळे त्यांनी नेमून दिलेले काम इमानइतबारे आणि पूर्ण ताकदीने करणे, इतकेच माझे हाती आहे. बाकी काही नाही. ''तु पुढे हो, मागे पाहू नकोस. बाकी सारेंकाही मी पाहून घेईन'', हीती आज्ञा मी शिरसावंद्य मानतो आणि माझे काम करत रहातो. मग बाकी विचार करण्यासारखे काही रहात नाही.

आपला नम्र ,
विश्वस्त ,
श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे
संपर्कासाठी मोबा. ९८२३२७७३२६(whatsapp)
ई-मेलआयडी-shridevanjaneshwar@gmail.com

# वर्षभराचे प्रोसिडिंग तथा महत्वाच्या घटनांचा, कामकाजाचा गोषवारा 'इतिवृत्त'

## ● आयकर खात्याकडील नोंदणी

मित्रांनो, 'बात तो बनती ही है' तुम्हा सर्वांना कळविल्याशिवाय मला चैनच पडत नाही. अंजनेश्वर देवस्थान बाबतची प्रत्येक गोष्ट आपल्याला कळवायची, असे पक्के ठरवले आहे.श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे हा ट्रस्ट दि.०४ एप्रिल २०२२ रोजी Unique Registration Number-AARTS7339FE20214 ने आयकर खात्याकडे नोंदणीकृत झाला आहे. ट्रस्ट रजिस्ट्रेशन झाल्याबाबतचे आदेश मे. मुख्य आयकर आयुक्त Principal Commissioner of Income Tax यांनी ईमेल करून पाठवले आहेत.अंजनेश्वर ट्रस्टच्या इतिहासात याची नोंद निश्चितच होणार आहे. श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे हा ट्रस्ट दि.१७.०५.१९५२ रोजी कोल्हापूर न्यास नोंदणी कार्यालयात तथा धर्मादाय कार्यालयात नोंदला गेला. नोंदणीमध्ये दोन देसाई लोकांनी पुढाकार घेतला म्हणून त्यावेळच्या ट्रस्ट एप्लिकेशन मध्ये त्या दोघांची नावे नोंदली आहेत. कै सदाशिव लक्ष्मण तथा बाबुराव देसाई व कै.गणेश बाळकृष्ण तथा आबा देसाई हे ते दोन देसाई आसामी की ज्यांच्या भाग्यामध्ये श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे हा ट्रस्ट नोंदण्याचे पुण्य जाते. धर्मादाय खात्याने नोंदणी क्रमांक ५७१/५२ देऊन या ट्रस्टच्या नोंदणीचे एप्लिकेशन कोल्हापूर धर्मादाय दप्तरी नोंदले गेले. ट्रस्ट धर्मादाय कडे नोंदणीकृत करून या १७ मे २०२३ ला ७१ वर्षेपूर्ण होणार आहेत. मित्रांनो, जसा ट्रस्ट धर्मादाय खात्याकडे नोंदला गेला तसाच हा ट्रस्ट आयकर खात्याकडे (Income Tax Office,) नोंदला जाणे आवश्यक होते व विश्वस्त म्हणून माझेसाठी बंधनकारक वाटत होते. आयकर खात्याकडे धार्मिक ट्रस्ट नोंदणे अशासाठी आवश्यक की असा ट्रस्ट आयकर खात्याकडे नोंदला गेला की धार्मिक स्वरूपाचा ट्रस्ट म्हणून आयकरातून १००% माफी मिळते. वार्षिक टिडीएस बँकेने कापून जो टॅक्स आयकर खात्याकडे जातो तो सर्वच्या सर्व रिफंड मागता येतो. १००% करमाफी मिळते. देणगी रक्कमेवर आयकर द्यावा लागणार नाही. थोडक्यात भाविकाने दिलेल्या देणगीतला एकही रुपया आयकराच्या रूपाने देवस्थानला भरावा लागणार नाही. मित्रांनो. आयकर विभागाकडे हा ट्रस्ट धार्मिक पब्लिक ट्रस्ट म्हणून नोंदला गेल्यामुळे जे थोडेफार पुण्य पदरी पडेल ते माझ्या नशीबी नोंदले जाईल. हे माझ्यासाठी पुरेसे होईल. याबाबत सीए सौ. नम्रता निलेश पाटणकर यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. त्यांनी विशेष पुढाकार घेऊन माझ्या एकट्याच्या आधार कार्ड आणि पॅन कार्डने फॉर्म भरून सर्व पूर्तता केली. त्यांच्याकडील स्टाफने मेहनत घेतली. नोंदणी फॉर्म फाईल झाला. दि २५ मार्च २०२२ रोजी फॉर्म भरला गेला. ह्या फॉर्मला नोंदणी अर्ज क्रमांक ४२११५०८००२५०३२२ असा देण्यात आला. आयकर खात्याकडे श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे या धार्मिक पब्लिक ट्रस्टची नोंदणी झाली. युनीक रजिस्ट्रेशन नंबर म्हणून AARTS7339FE20214 असा नंबर मिळाला.

सोमवार दि.०४.०४.२०२२ रोजी ही प्रोव्हिजल रजिस्ट्रेशनची ऑर्डर मंजूर झाली. आयकर खात्याकडील श्री देव अंजनेश्वर ट्रस्टची नोंदणी माझ्या आधार कार्ड/पॅन कार्डने आणि माझ्या मोबाईल नंबरने झालेली, हे कायमस्वरूपी माझ्या लक्षात राहील. ज्यावेळी आयकर खात्याकडील या ट्रस्टनोंदणीमुळे श्री देवाचा आयकर वाचेल, भाविकांनी दिलेल्या दिलेल्या देणगीमधून आयकर कापला जाणार नाही तेव्हा ते श्रेय कुणाला देणार ? निश्चितच हे श्रेय ऑडिटर श्री. निलेश पाटणकर यांना जाते. सीए सौ.नम्रता निलेश पाटणकर यांनी लक्षपूर्वक पूर्तता केली म्हणून त्यांना जाते. थोडेफार श्रेयातील हिस्सा श्री. निलेश पाटणकर यांच्या ऑफिसमधील स्टॉफला जाते.

आमचा मुलगा चि. मकरंद याने अगदी आत्मविश्वासाने काही कायदेशीर बाबी लक्षात आणून दिल्या होत्या म्हणून काही अंशी त्याचे श्रेय त्यालाही दिले पाहिजे आणि सर्वात श्रेय श्रीदेवाला दिलेच पाहिजे. त्याचे वजन असल्याशिवाय हे असे कसे शक्य आहे. अशा पध्दतीने श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे या ट्रस्टची नोंदणी आयकर विभागाकडे झाली आहे.

**● अंजनेश्वर जमीन जागेवर फळबाग लागवड–**

मित्रांनो. मे.जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी 'श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे' या ट्रस्टच्या ४५ हेक्टर (सुमारे ११२.५ एकर) जमीन जागेवर रोजगार हमी योजनेतून फळबाग लागवड योजना राबविण्याचे ठरवले आहे. पत्रव्यवहाराचा पाठलाग केल्यामुळे हा कार्यक्रम शासनस्तरावरून हाती घेण्यात आला आहे. या निमित्ताने रोहयो राबवली गेली तर अंजनेश्वर देवस्थानची वर्षानुवर्षे पडीक जमीन लागवडीखाली येईल परंतु त्यापेक्षा मोठा फायदा असा की या ठिकाणी मजुरी काम करण्यासाठीची तयारी असणाऱ्या गावातील किंवा परिसरातील जॉबकार्ड धारकांना वर्षाला १०० दिवसांचा रोजगार मिळेल. गडगा कंपाऊंड घालण्यापासून जागेची साफसफाई करणे, विहीरीची खोदाई–बांधकाम, प्रत्यक्ष कलमे लावणे आदी सर्व कामे रोहयो मार्फत होणार असल्याने रोजगार उपलब्ध होईल.जॉबकार्ड साठी केवळ पासपोर्ट फोटो, बँकपासबुक, आधार कार्ड, रेशनकार्ड हे सोबत घेऊन ग्रामपंचायत ऑफिसला गेले की जॉब कार्ड तयार होते. १८ वर्षावरील व्यक्ती स्त्रीपुरुष जॉबकार्ड मिळवण्यासाठी पात्र आहेत. श्री देव अंजनेश्वरची जमीन मंदिराच्या पाठीमागे एकक्षेत्री स्वरूपात आहे. यामध्ये काही अंशी कलमलागवड लिंगायत गुरवांनी यापूर्वी केलेली आहे. परंतु याला कुठे ही सरकारी अनुदान मिळालेले नाही. स्वखर्चाने त्या त्या वेळी वहिवाट क्षेत्रात लागवड झाली आहे. परंतु ही लागवड अगदी अत्यल्प आहे. रोहयोचे पाठबळ मिळाले तर लागवडीला गती येईल. सर्व जमीनभाग एकाच ठिकाणी असल्याने गडगा कंपाऊंड रोहयो तथा मनरेगा योजनेतून घालणे शक्य होणार आहे. एकदोन मोठ्या विहिरी रोहयोतून मिळाल्या तर सर्व जमिनीला एकत्रित पाणी देता येईल. सर्व जमिनीला ठिबक सिंचन माध्यमातून पाणी पुरवठा करता येईल. रोहयोतून दोन तीन शेतघरे बांधता येतील. एखाद्या चांगल्या कामासाठी पुढाकार घेतला म्हणजे सर्व यशस्वी होणार असे कधीच होत नाही. त्यात अनेक बाधा तयार होतात. बरेच वेळा गैरसमज पसरवले जातात. हरकती येतात.आडवे येणारे हमखास 'आडव' येतात. हे सर्व गृहीत धरून कामकाज करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.

मित्रांनो, अशा वेळी फळबाग योजना राबवण्याचे दूर रहाते, वादावादी हाऊन पोलिस स्टेशनमध्ये प्रकरण जाते. फळबाग योजना पोलीस स्टेशनामध्ये अडकते. इथे तसे होणार नाही, अशी आशा बाळगूया. कारण ही जमीन कुणाची वैयक्तिक नाही. श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे या ट्रस्टच्या नावाने सर्व जमीन नोंदलेली आहे. जमीन ट्रस्टची असली तर त्यामधील ट्रस्टी त्या जमीनीचे मालक होत नाहीत. तसे पाहिले तर देवस्थानची जमीन शासन मालकीची असते. यावर खरा अंमल धर्मादाय खात्याचा आणि महसूल खात्याचा. थोडक्यात धर्मादाय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी एकदा ठरवले की ही फळबाग योजना राबवण्यात कोणतीही अडचण येणार नाही. अडचण आली तर तेच प्रथमतः सर्व निस्तरतील. मित्रांनो. माझे काम एवढेंच आहे की देवाचे कागद घेऊन पत्रव्यवहार करणे, पाठलाग करणे, सातत्याने पाठलाग करणे. यश येणे, यशस्वी होणे हे आपल्या हाती नाही. 'हे माझे आहे असे समजून कामकाज करणे,' इतकेच माझे काम आहे. माझी स्वतःची जमीन असती आणि ती पडीक असती तर मी योजनेचा फायदा नक्कीच मिळवला असता. तसाच प्रयत्न मी श्री देव अंजनेश्वर या अबोल व्यवस्थेसाठी केला पाहिजे. अशी जाणीव आणि नेणीव ठेवून मी प्रयत्न करीत आहे. ती अबोल व्यवस्था स्वतः पत्रव्यवहार करत नाही म्हणून आपण करायचा आहे. ती अबोल व्यवस्था स्वतः पाठलाग करत नाही म्हणून आपण करायचा.ती अबोल व्यवस्था पुढचे सर्व काही ठरवत असते या वर माझा पूर्ण विश्वास आहे.

**●श्री देव अंजनेश्वर जमीन स नं.६१/१ आणि त्याबाबतची जमा रक्कम–**

मित्रांनो, श्री देव अंजनेश्वर जमिनीबाबतचे अधिकार श्री देव अंजनेश्वरचे स्वतःचे आहेत, पर्यायाने ते अधिकार ट्रस्टचे आहेत. श्रीदेवाच्या जमीन व्यवहातून मिळालेली रक्कम सुरक्षित ठेवणे, त्या रक्कमेचे ऑडिट अकाऊंटींग करणे व ऑडिट रिपोर्ट धर्मादाय खात्याकडे पाठविणे हे देवस्थानचा विश्वस्त म्हणून माझे संविधानिक कर्तव्य (Statutory duties) चा एक भाग आहे व हे कर्तव्यपालन करणे माझेसाठी कायद्याने बंधनकारक (Mandatory) आहे.

स.नं.६१ /१ ची रक्कम रु.४५ लाख देवस्थान बँक खात्याला सन २०१२ पासून जमा असून त्याबाबत मुदतठेव सर्टिफिकेट करून ठेवलेली आहेत. मुदतठेवींचे प्रतिमहा व्याज अंजनेश्वरच्या बचतखात्याला नियमितपणे जमा होत आहे. श्रीदेवाच्या नावाने जमा असलेल्या संपूर्ण रक्कमेवर येथील लिंगायत पुजाऱ्यांना अधिकार सांगायचा असेल तर त्यासाठी त्यांनी मे.धर्मादाय सह आयुक्त कोल्हापूर यांच्याकडे रक्कम मागणीचा दावा, रिकव्हरी सूट केला पाहिजे. त्याशिवाय अन्य कोणताही पर्याय उपलब्ध नाही. अन्याय झाला अशी भावना वर्षानुवर्षे जपून ठेवण्यापेक्षा मे.धर्मादाय सह आयुक्त कोल्हापूर ह्यांच्या दरवाजात न्यायासाठी सत्वर जाणे हे त्यांचेसाठी हितकारक होणारे आहे. अकारण चर्चा, संभ्रम उपस्थित करणे, गैरसमज पसरविण्यातून प्रत्यक्ष न्याय दूर दूर निघून जातो. अपप्रचार करुन देवस्थानच्या बचत खात्यातील रक्कम कधीच मिळणार नाही. त्यासाठी न्यायाचे दरवाजे ठोकावणे उचित व फायदेशीर ठरणारे आहे. आपण अकारण जेव्हा एखाद्याची अप्रतिष्ठा करण्यासाठी समाजामध्ये बाहेर पडतो, तेव्हा कदाचित त्यात यशस्वी होतो. मात्र एखाद्याची वैयक्तिक अप्रतिष्ठा करण्याच्या नादात आपलेच 'अकल्याण' होऊन जाते, हे लक्षात घेतले पाहिजे. याप्रकरणी सन २०१२ पासून अप्रतिष्ठेसोबत अकल्याण धावत आहे. यास्तव याला कुठेतरी थांबा मिळावा म्हणून रामनवमीचा मुहूर्त साधून 'एक नोटीस' केली होती. त्या नोटिशीची प्रत समस्त जनतेसाठी, भाविक भक्तांसाठी, देवस्थान हितसंबंधी आसामींसाठी, देणगीदारांसाठी, खोत, सेवेकरी, मानकरी या सर्वांना कळीत व्हावे म्हणून फेसबुक पेजला पोस्ट लिहून शेअर केली होती. मी श्री देवाचा विश्वस्त असण्यापेक्षा एक 'रखवालदार' आहे. या ट्रस्टची 'Statutory Authority' मे. धर्मादाय आयुक्त हे आहेत व आत्ता तर मे. आयकर आयुक्त हे सुध्दा आहेत. मी केवळ रखवालदार आहे, 'सुप्रीमो' नाही. माझ्यावर कितीही सामाजिक, राजकीय दबाव आला तरी रखवालदार म्हणून मी माझे कर्तव्य बजावणार आहे. कोणत्याही दबावाला बळी पडणार नाही. वार्षिक अहवालाच्या निमित्ताने ही बाब सर्वांना आश्वस्त करून सांगून ठेवत आहे.

**●भक्त निवासाबाबत काही सूचना –**

'श्री देव अंजनेश्वर भक्तनिवास' ही निवासी व्यवस्था केवळ आणि केवळ तीर्थयात्रेसाठी येणाऱ्या भाविक भक्तांसाठी आहे, उत्सव कालावधीमध्ये नि:शुल्क सोय तर अन्य वेळी रु. ५००/– देणगीपावती करून एक दिवसाची निवासी व्यवस्था उपलब्ध होते. आधारकार्ड, फोन नंबर, पत्ता आदी तपशील नोंदणी करून सकाळी ७.०० ते रात्री ८.०० पर्यंत पोहोचणाऱ्या भाविक भक्तांना निवासी व्यवस्था उपलब्ध होते. रात्री ९.०० वाजता मंदिर आणि मंदिर परिसर कुलुप बंद होत असल्याने भाविक भक्तांनी वेळेवर पोहोचणे आवश्यक आहे. भोजन, चहा अल्पोपहार व्यवस्था श्री. सदानंद तुकाराम उर्फ राजा लिंगायत याचे रहात्या घरी 'खाजगी सोय' म्हणून केली जाते व त्याबाबतची वाजवी रक्कम परस्पर घेण्यासाठीची मुभा त्यांना देण्यात आली आहे. संबंधितांनी श्री.सदानंद तुकाराम तथा राजा लिंगायत यांचेकडे आगाऊ संपर्क साधावा, अनामत म्हणून रू.५०० रक्कम त्याचे बँकखाती भरावी व भोजनाची सोय त्यांच्या त्यांच्या सोयीनुसार करून घ्यावी. ही सोय श्री. सदानंद तुकाराम यांच्या कौटुंबिक क्षमतेनुसार शक्य झाली तरच होते, हेही लक्षात घ्यावे.आजकाल घरगुती कामकाज उरकण्यासाठी, शासकीय कामकाज करण्यासाठी, घराकडील कौटुंबिक कार्यामध्ये सहभागी होण्यासाठी, पर्यटन म्हणून अनेक आसामींना भक्तनिवासामध्ये निवासीसोय हवी असते. परंतु तशा पध्दतीने भक्तनिवासाचा उपयोग होवू नये, असे नेहमी वाटते. अगदीच वैयक्तिक अडचण असणाऱ्यांची सोय भक्तनिवासामध्ये केली जाते. परंतु ती बाब अडचणीची होत आहे. येणाऱ्यांची अपेक्षा लॉजींगबोर्डिंगची असते. तशी सर्व्हिस देणे येथे शक्य होणार नाही आणि तसे भक्तनिवासमध्ये अपेक्षीले जावू नये. लॉजींगबोर्डिंग म्हणून अंजनेश्वर भक्तनिवास हे ठिकाण प्रसिद्ध होऊ नये म्हणून सुद्धा खबरदारी घेतलेली आहे. मद्यपान, धूम्रपान आदी पूर्णतः त्याठिकाणी प्रतिबंधित आहे आणि निषिद्ध समजले पाहिजे.भक्तनिवास हे केवळ यात्रेकरुंसाठीच व यात्रेकरूंकरिताच आहे, ही ओळख कायम राहिली पाहिजे. 'धर्मशाळा' ही ओळख राहिली पाहिजे व अशीच ओळख राखण्यासाठी आपण सर्वांनी कटिबद्ध असले पाहिजे. व तसा प्रसार प्रचार आपणही सर्वांनी केला पाहिजे. भक्तनिवास ही श्रीदेवाची मालमत्ता आहे, ती

कुणाची वैयक्तिक मालमत्ता नाही. त्यामुळे तेथील नियमनियमावली श्रीदेवासाठी अनुकूल व पोषक असली पाहिजे. सुस्पष्ट सूचना लिहिली आहे, गैरसमज न करावा. श्री. सदानंद तुकाराम लिंगायत यांचा संपर्क नंबर ७२६२९१९५१४ असा आहे. कृपया भक्तनिवास बाबत आगाऊ संपर्क साधावा.

**●वात्सल्य सेवा ट्रस्ट चा उपक्रम..**

गुरुवार दि.२३ जून २०२२ रोजी संध्याकाळी ४.०० वाजता वात्सल्य ट्रस्ट, मुंबई याचे सेक्रेटरी श्री. रा.रा. श्रीकांत जोशी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अंजनेश्वर मंदिराला सदिच्छा भेट दिली. आमचे मित्र श्री. उमर हसन नाईक यांनी हा योगायोग जुळवून आणला. या भेटीच्या वेळी देवस्थानचे मानकरी, सेवेकरी, खोत आणि देवस्थान हितसंबंधी उपस्थित होते. मुळचे कुवेशी गावचे असलेल्या श्री. श्रीकांत जोशी यांनी वात्सल्य ट्रस्टचे सेवाकार्य विषद केले.वात्सल्य ट्रस्टने या पंचक्रोशीमध्ये सेवाकार्य सुरू करण्याचा मनोदय बोलून दाखवला. त्यांनी भक्तनिवास, मंदिराशेजारील सभागृह याची पहाणी केली. वात्सल्य ट्रस्टच्या सेवाकार्यामध्ये सहयोग देण्याचे सांगण्यात आले. श्रीदेवाच्या कार्तिकोत्सवामध्ये उपस्थित रहाण्यासाठीचे आमंत्रण देण्यात आले. एकूण त्यांचा 'मंदिर भेटी'चा कार्यक्रम उत्साहवर्धक झाला. या वेळी श्री. दत्ताराम जगन्नाथ पाटणकर, श्री. नरेश विठ्ठल कांबळी, श्री. शामसुंदर गवाणकर, श्री. उमर हसन नाईक, श्री. गंगारामतात्या गवाणकर, श्री. भागवत राऊत, श्री. विलास चेऊलकर, डॉ. श्री. प्रदीप मयेकर, श्री. दिवाकर आडविलकर, श्री. मनोहर धुरी, श्री. संतोष वामन लिंगायत, श्री. सदानंद तुकाराम लिंगायत, श्री. दिनकर लिंगायत, श्री. सुधाकर लिंगायत आदी मंडळी उपस्थित होते. वात्सल्य ट्रस्ट, कांजूरमार्ग मुंबई हा एक नावारूपाला आलेला चारिटेबल ट्रस्ट आहे. शिक्षक आमदार कै. संजीवनी रायकर यांनी सन १९८३ मध्ये स्थापन केला. अनाथांना आधार देण्याच्या उद्देशाने हा ट्रस्ट स्थापन झाला. अनाथ मुलांचे संगोपन, व्यवस्थापन, वृद्धाश्रम, स्किल डेव्हलपमेंट, कॉम्प्युटर कोर्स, नर्सींग असिस्टंट, सारखे अनेक कोर्स मुलामुलींसाठी उपलब्ध करून देण्याचे कार्य या वात्सल्य ट्रस्टच्या पुढाकाराने महाराष्ट्रभर सुरू आहे. श्री देव अंजनेश्वर देवस्थान ट्रस्टच्या सहकार्याने असे काही उपक्रम सुरू करता येतील का याची प्राथमिक चर्चा या भेटीच्या वेळी झाली. सौ. वर्षा पवार तावडे संपादित 'Adoption एक गुड न्यूज', व श्री. विजय तापस संपादित 'लोकव्रती वात्सल्यची तीस वर्ष' ही दोन पुस्तके, वात्सल्य ट्रस्टचा वार्षिक अहवाल श्री. श्रीकांतजी जोशी यांनी देवस्थानसाठी दिला. देवस्थानचे वतीने मंदिराचा फोटो, बेलपान, प्रसाद व देवस्थान वार्षिक अहवाल देण्यात आला. कार्यक्रम छोटेखानी झाला असला तरी 'विचारांची पेरणी' अप्रतीम झाली.

**● दानपेट्या..आणि दानाची प्रसिध्दी**

श्री देव अंजनेश्वर मंदिरातील दानपेटी मधील एकूण दानाची रक्कम आपल्या पर्यंत कळीत व्हावी या उद्देशाने दानपेटी बाबत वेळोवेळी प्रसिद्धी पत्रक काढण्यात येते. भक्तांनी गुप्तदान अर्पण केले असले तरी त्याचा हिशोब गुप्त ठेवणे आवश्यक नाही. दानपेटीचा हिशोब सर्वांपर्यंत पोहोचेल तेव्हा दानपेटीबाबतची विश्वासार्हता वाढत जाईल. ज्या भक्तांनी दानपेटी मार्फत आपली देणगी रक्कम नाव आणि पत्ता लिहून पाकीट बंद करून दिली त्या देणगीदार भक्ताला देणगीची पावती प्रसाद अंगाऱ्यासह पोहोचेल तेव्हा ती दानपेटी 'कलेक्शन बॉक्स' म्हणून सुध्दा नावारूपाला येईल. देवस्थान कारभाराबाबत यत्किंचितही शंका राहू नये म्हणून हे सर्व काही केले जात आहे. भक्त जे दान ठेवतो ते देवासाठी ठेवलेले असते. देवाच्या धार्मिक कार्यासाठी ते ठेवलेले असते. श्रीदेवाच्या दैनंदिन गरजा पूर्ण होण्यासाठी ते 'दान' भक्त ठेवत असतो. देवाच्या पुढ्यातील अर्पण दानावर देवाशिवाय अन्य कुणाचाही अधिकार नाही व हे सर्व अर्पणदान हिशोबात आले पाहिजे, किर्द खतावणीमध्ये नोंदले गेले पाहिजे, दानाचे ऑडिट अकाऊंटींग झाले पाहिजे. धर्मादाय खात्याला अथवा मुंबई विश्वस्त कायद्याला हीच अपेक्षा आहे. देवाला ठेवलेले 'दान' देवाचे, देवासाठी असते हे लक्षात घेतले पाहिजे. हे भाविक भक्तांनी लक्षात घेतले पाहिजे आणि हे पुजारी वर्गाने सुध्दा लक्षात घेतले पाहिजे.

**● श्रावण दिंडी सन २०२२ मधील–**

सन २०२२ मधील श्रावण दिंडी श्रीदेव बांदेश्वर माडबन येथे आयोजित करण्यात आली होती.याबाबतचे नियोजन

सोमवार २५ जुलै रोजी संध्याकाळी आरतीच्या वेळीच झाले होते. आरतीच्या येणाऱ्या माडबनकर मंडळींनी अगदी स्वाभाविक होकार दिल्यामुळे प्रतिवर्षीप्रमाणे श्रावणातील तिसऱ्या सोमवारी श्रावण दिंडी काढण्याचे निश्चित झाले. १५ ऑगस्ट २०२२ झेंडावंदन होते, ग्रामसभा होत्या, स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाचे कार्यक्रम होते. तरी सुद्धा हे सर्व कार्यक्रम आटोपून, अटेंड करून सर्व येतील, मोठ्या संख्येने येतील, शाळकरी विद्यार्थ्यांना सुट्टी असल्याने तेही सहभागी होतील असा विश्वास होता. प्रतिवर्षीप्रमाणे तिसऱ्या सोमवारी श्रावण दिंडी काढायची असे उपस्थित सर्वानुमते ठरवण्यात आले. रिक्षा, स्पीकर, ढोल, तासे आदीचे सर्व नियोजन सर्वांच्या उपस्थितीत झाले. १५ ऑगस्टचा कार्यक्रम उरकून सर्वांना सकाळी दहापर्यंत येता येईल. श्रावणदिंडीचा कार्यक्रम अगदी उत्साहाने पार पडला. माडबनकरी मंडळींनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले. ५००/६०० भाविक भक्तांच्या उपस्थितीत झालेल्या श्रावण दिंडीचे स्वागत सदैव स्मरणात राहील. श्रीदेवी भवानी मंदिरात आणि श्रीदेव बांदेश्वर मंदिरात झालेले उत्स्फूर्त स्वागत वर्षानुवर्षे स्मरणात राहील.

**● नामजप कार्यक्रम –**

प्रतिवर्षी प्रमाणे नामजपाचा कार्यक्रम सोमवार २२ ऑगस्ट २२ रोजी संध्याकाळी ६.०० ते ७.०० वाजता नामजप कार्यक्रम पार पडला. फक्त एक तासाचा नामजपाचा कार्यक्रम होता. १३० च्या आसपास उपस्थिती होती. उपस्थित भाविक भक्तांना चहापान देण्यात आले.

**● श्री देवी भराडणी मंदिरामधील आणि श्रीदेवी मुहूर्ताई मंदिरामधील नवरात्र उत्सव –**

श्रीदेवी मुहूर्ताच्या 'नवरात्र उत्सवा'चे निमंत्रण अंजनेश्वर फेसबुक पेज द्वारे आणि व्हाटस् अप द्वारे सर्वांना पाठविण्यात आले होते. श्रीदेवीचा उत्सव म्हणजे 'स्त्रीशक्ती चा उत्सव' असतो. त्यामुळे या उत्सवात स्त्रीवर्गाची उपस्थिती मोठ्या संख्येने व उत्स्फूर्तपणे असावी, अशी अपेक्षा असते. रोज रात्री ठीक ९.०० वाजता आरती सुरू होतील व ठीक ९.३० वाजता आरती समाप्त होतील, अशी खात्री झाल्यामुळे महिलावर्गाची उपस्थिती वाढली होती आणि आरतीनंतर 'भजन' अथवा 'दांडिया' असे कार्यक्रम असल्याने एकूणच उपस्थिती वाढू लागली होती. गेली १३/१४ वर्ष लक्षात घेतली तर श्रीदेवी मुहूर्ताईच्या नवरात्रउत्सवामध्ये भरपूर प्रमाणात बदल झाले आहेत. उत्सवामधील भाविकांची उपस्थिती २५०/३०० इतकी वाढली आहे. आरती वेळेवर सुरू होतात आणि वेळेवर समाप्त होतात. कंटाळवाणे असे काही होत नाही. दांडिया सारखे कार्यक्रम सुरू केल्यामुळे स्त्रिया, लहान लहान मुलांचा सहभाग वाढला आहे. उत्सव काळात प्रसाद, चहापान, अल्पोपहार आदी उपलब्ध होण्यासाठी विषेश प्रयत्न केला जातो. हळदीकुंकू समारंभ, स्त्रियांच्या 'पैठणी स्पर्धा' असे कार्यक्रम घेतले गेल्यामुळे उत्सवातील स्त्रियांचा सहभाग वाढला आहे. मंदिर परिसरात संडास बाथरुमची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मंदिराबाहेर शेडनेटचा मंडप उभारल्यामुळे जागेचा प्रशस्तपणा वाढला आहे. मंदिरातील विहिरीला कठडा, त्यावर अल्यूमिनियम जाळी लावून घेण्यामुळे मंदिर आवारातील विहीर सुरक्षित झाली आहे. लख्ख लाईट, रोषणाईचे नियोजन होत असल्याने उत्सवकालावधीत मंदिर परिसर लख्ख प्रकाशाने उजळून जातो. उत्सवामध्ये ध्वनिक्षेपकाची व्यवस्था केली जात असल्याने आरती, भजन, दांडिया आदी कार्यक्रमांचा हुरूप वाढला आहे. श्री देवी मुहुर्ताईच्या मंदिरात इन्व्हर्टर सुविधा उपलब्ध झालेली असल्याने वीज पुरवठा खंडित झाला तरी अडचण भासत नाही. मंदिराची व मंदिर परिसराची साफसफाई अगदी लक्षपूर्वक केली जात आहे. मंदिराचे नूतनीकरण, मार्बलकाम, लादीकाम, रंगरंगोटी यासाठी मोठा खर्च करून मंदिराचे रुपडे पूर्णपणे बदलून गेले आहे. स्टील रेलिंग बसवल्यामुळे मंदिराला बंदिस्तपणा आला आहे. यामुळे उनाड कुत्र्यांचा वावर बंद झाला आहे. हातपाय धुण्याची सोय करण्यात आली आहे. लोखंडी गेट बसवून मंदिरपरिसर बंदिस्त झाला आहे. ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असताना मंदिर परिसराला शासकीय पैशातून तटबंदी झाली आहे. देणगीतून मुहूर्ताई मंदिरासाठी आरसीसी प्रवेशद्वार झाले आहे. देणगी जमा करून मंदिराच्या आवाराला दगडी फरस बसवण्यात आली आहे. ग्रामपंचायत मिठगवाणे मार्फत प्रवेशाचा रस्ता डांबरीकरण करून

झाला आहे. उत्सवकाळात देवीच्या सर्व वस्तू ठेवता याव्या म्हणून मंदिरात मजबूत लोखंडी कपाट घेतलेले आहे. हरकोल, वाघनख, आदी देवीच्या दागिन्यांची दुरुस्ती झाली आहे. मित्रांनो, श्रीदेव अंजनेश्वर देवस्थान मार्फत हे सर्व खर्चिक कामकाज अगदी धिटाईने व पुढाकाराने केलेले आहे. १५/२० वर्षांपूर्वीचा कालावधी लक्षात घेतला तर मुहूर्ताच्या नवरात्र उत्सवात फक्त १५/२० लोकांची उपस्थिती असायची.आत्ता ही उपस्थिती २५०/३०० वर गेली आहे व ही सर्व झालेली प्रगती, सुधारणा छातीठोकपणे सांगायला मला अजिबात संकोच वाटत नाही. 'सत्य ठोकून सांगितले गेले पाहिजे आणि ते उजेडात राहिले पाहिजे', म्हणून हे सारे सारे सांगितले गेले पाहिजे. मित्रांनो, अजूनही सुधारणा करणे शक्य आहेत. उत्सवामधील उपस्थिती, मंदिरपुजारी वर्गाचे सहकार्य लाभले तर अजूनही काही करता येईल. नवरात्रउत्सव अजूनही मोठा करण्यासाठी सर्वांची साथ पाहिजे. उपस्थिती, सहभाग पाहिजे. काही सुधारणा करणे आवश्यक असेल तर सूचना केल्या पाहिजेत. अर्थात नुसत्या सूचना करून चालणार नाही तर त्यासाठी थोडेसे समर्पण, सहभाग आवश्यक आहे. भाविक भक्तांना नवरात्र उत्सवाला देणगी देता यावी म्हणून श्रीदेवी मंदिरामध्ये उत्सव कालावधीमध्ये देणगी पावती देण्याची व्यवस्था केली आहे. रु.२५ पासूनच्या देणगी रक्कमेला देणगी पावती देता येईल. तसेच ज्या भाविकांना ऑनलाईन पद्धतीने देणगी श्रीदेवीच्या नवरात्र उत्सवाला थेट पाठवायची इच्छा असेल त्यांना खालील तपशिलाच्या आधाराने देणगी रक्कम देता येईल. देणगी देण्यासाठी क्यूआर कोड :

श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे
A/C 143710100000001
IFSC code -BKID0001437
Bank of India, Mithgavane

**BHIM BOI UPI QR**
**SCAN HERE TO PAY**
**WITH ANY BHIM UPI APP**
SHRI DEV ANJANESHWAR KASBA MITHGAVANE
boism-7038785001@boi
UPI | BHIM
Payment Through Any UPI App Accepted Here

या तपशिलानुसार एन ई एफ टी, आरटीजीएस करता येईल. तसेच भीम, पेटीएम, गुगल पे द्वारा रक्कम पाठवता येईल. रक्कम पाठवली की मोबाईल नंबर ९८२३२७७३२६ या व्हाटस् अप नंबर ला पेमेंट स्क्रिन शॉट पाठवला की देणगी पावती तयार करून प्रसाद अंगारा पोस्ट पाकीटाद्वारे पाठवता येईल. ज्यांना देणगी पावतीची आवश्यकता नसेल, नावाची आवश्यकता नसेल त्यांनी रक्कम थेटपणे बँक खात्यात पाठवली तर ती 'गुप्त देणगी तथा (Anonymous donation)' म्हणून समजण्यात येईल. ही देणगीची सर्व रक्कम ऑडिट खाली येणार आहे. तसेच उत्सवाला अगदी एक रुपयापासून देणगी देता यावी म्हणून आता दानपेटीची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

दि.२६ सप्टेंबर २०२२ रोजी श्रीदेवी मुहूर्ताई मंदिरातील नवरात्र उत्सव व श्रीदेवी भराडणी मातेचा नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहात सुरू झाला आणि साजरा झाला. श्रीदेवी भराडणी येथे संध्याकाळी ठीक ७.०० वाजता आरती सुरू झाली आणि श्री देवीमुहूर्ताईच्या मंदिरात रात्री ठीक ९.०० वाजता आरतीला सुरूवात झाली. श्री देवी मुहूर्ताई येथे दोन्ही दिवस आरतीच्या सुरूवातीला श्री. विलास चेऊलकर यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. कार्यक्रमांची सामान्य रूपरेखा, देणगी बाबत, ड्रॉप बॉक्स बाबत सर्व काही सांगितले. श्रीदेवी मुहूर्ताई मंदिरामध्ये पहिल्या माळेच्या दिवशी आरतीला तब्बल पावणेदोनशे/ दोनशे भाविकांची उपस्थिती होती. तर दुसऱ्या दिवशी जवळपास अडीचशेच्यावर उपस्थिती होती. पहिल्या दिवशी साबुदाणा खिचडीचा प्रसाद श्री. मोर्ये, सडेवाडी यांचे तर्फे दिला होता तर दुसऱ्या दिवशीचा गोड शिऱ्याचा प्रसाद श्री. संतोष पाटणकर यांचे तर्फे दिला होता. श्री. मनोज परमार यांनी त्यासाठी खूप मेहनत घेतली होती. पहिल्या दिवशी लिंगायतवाडीचे भजन होते, तर दुसऱ्या दिवशी कुळंबौशीवाडीचे भजन होते. श्री देवी भराडणी देवीच्या मंदिरात पहिल्या दिवशीची उपस्थिती १६ तर दुसऱ्या दिवशीची उपस्थिती २४ होती. ही उपस्थिती खूपच उत्साहवर्धक आहे. श्री. प्रमोद उपळकर आणि श्री. प्रकाश उपळकर या दोन बंधूंनी गेल्या चार पाच

वर्षांपासून श्री देवी भराडणी देवीच्या मंदिरात आरती सुरू केली आणि ती चालू ठेवली. आत्ता श्री.विलास चेऊलकर, मणचेकर, तांबे, पाटणकर, कुळकर्णी, लिंगायत आदी मंडळी येवू लागली. स्त्री पुरुष उपस्थित राहून आरती कार्यक्रम होत आहे. अगदी उत्साहात होत आहे. संध्याकाळी ठिक ७ वा आरती सुरू होते आणि ठिक ७.३० वाजता समाप्त होते. अगदी सुटसुटीत आणि नेमस्त. अघळपघळ असे काहीच नाही. मी उशीरा पोहोचलो तरी कुणी थांबून रहात नाही. कुणासाठी इथे थांबून रहायचे नाही हा तो 'एक मंत्र' आहे. श्री देवी मुहूर्ताच्या मंदिरात ९ वा. सुरू होणारी आरती ठिक ९.३० वाजता समाप्त होते. त्यानंतर भजन, गरबा दांडिया आदींसाठी वेळ राखीव असतो. उत्सवासाठी खर्च होतो तो सर्व अंजनेश्वर तिजोरी मधून खर्च होतो. श्री देवी मुहूर्ताई उत्सवाला स्वतंत्र देणगी देता यावी म्हणून तेथे देणगीचे पावती पुस्तक ठेवण्याची सुरूवात केली. सोबत एक ड्रॉपबॉक्स भाविकांची एक रूपया पासूनची उत्सव देणगी स्वीकारण्यासाठी ठेवला. आरती श्री.गंगाधर भोगले आणि श्री.बबन गडगेकर यांनी सुरू करायच्या आणि त्यांनीच समाप्तीचे 'घालीन लोटांगण' म्हणावे. पंचारती श्री. नरेश कांबळी यांनी धरली तर रोजचे गऱ्हाणे श्री. महेश कांबळी यांनी घातले. देवीची गुरवखी श्री.मनोज परमार यांची होती. बाकी सर्व व्यवस्था चोख होती. सर्व ठीक वेळेवर होते. फार काय कुणाला सांगावे लागत नाही. नवरात्र उत्सवापूर्वी श्री. नरेश कांबळी, श्री. संतोष शिंदे, श्री. रामदास रायकर, श्री. बबन तथा अनंत गडगेकर, श्री. राजा राणे यांनी अंजनेश्वर मंदिरातील शेडनेटचा मंडप आणून मुहुर्ताईच्या प्रांगणात उभारला. सोबत श्री. सय्यद सुलेमान हसोळकर यांनी सुध्दा मंडपाच्या खांबांची जोडणी करण्यासाठी मदत केली. श्री. प्रदिप दशरथ कणेरी यांने मंदिराची झाडलोट साफसफाई केली. सौ. रेश्मा रमेश मेस्त्री, सौ. गडगेकर, सौ. शिल्पा प्रिंदावणकर यांनी झाडलोट साफसफाई आदी उरलीसुरली कामे केली. स्पीकर जोडणी श्री. बाबू तारकरने केली होती. मंदिराचे सभोवतालच्या कंपाऊंड वॉल वर अगदी कमानीच्या द्वारापर्यंत लाईट गोळे श्री.नरेश कांबळी यांनी लावले. सर्व परिसर लख्ख प्रकाशाने उजळून निघाला होता.

श्रीदेवी मुहूर्ताई आणि श्री भराडणी देवीच्या सन २०२२ मधील नवरात्र उत्सवामधील तिसरा, चौथा अन् पाचवा दिवस उत्साहात पार पडला. श्री भराडणी देवीच्या आरतीच्या उपस्थितीमध्ये संख्या अगदी दिवसागणिक वाढत गेली. एकूण उपस्थिती ३०/३२ पर्यंत पोहोचली. ही उपस्थिती खूपच उत्साहवर्धक होती. आरत्या अगदी वेळेवर ७.०० वाजता सुरू झाल्या आणि अगदी वेळेवर ७.३० वाजता समाप्त झाल्या. प्रसादाची रेलचेल होती. ध्वनीक्षेपकाची उपलब्धी होती. प्रकाश व्यवस्था अगदी मुबलक होती. घनदाट राईमध्ये इतके वर्ष स्थितप्रज्ञ असलेल्या श्रीभराडणी देवीला हे सर्व सुखद वाटत होते. श्रीदेवी मुहूर्ताई मंदिरातील रोजची आरतीची उपस्थिती २५०/२७०/२९० पर्यंत पोहोचली होती. ठीक पावणे नऊ वाजता धुपारत इशारत, त्यानंतर श्री. विलास चेऊलकर यांचे रोजचे 'दोन शब्द' व्हायचे. सूचना, विनंती, नवीन विचार आदीसाठीचे ते दोन शब्द होते. त्यानंतर आरतीची सुरुवात श्री. गंगाधर भोगले आणि श्री. अनंत गडगेकरच्या पुढारपणात होत होती. ढोलकीसाठी श्री. संतोष लिंगायत तर कधी श्री. गंगाधर भोगलेची थाप व्हायची. आरतीची समाप्ती ठीक रात्री ९.३० वाजता व्हायची. सारें सारे नेमस्त आणि घड्याळाच्या काट्यांच्या इशाऱ्यावर होत होते. रोज भजनाचा कार्यक्रम आणि पावसाच्या इशाऱ्यावरचा दांडीया नृत्य पार पडले. श्री. मेस्त्रीबुवा, जानशी, श्री. रांबाडेबुवा, बाकाळे यांची भजने झाली. अल्पमानधन देवून आणि त्यामध्येच कमालीचे सामाधान होते. उपस्थित भक्तांच्या प्रसादाची सोय कधी श्री. विश्राम महादेव तांबे यांच्याकडून तर कधी बांदेश्वर मंदिर समितीकडून तर कधी अंजनेश्वर देवस्थान मार्फत होत होती. प्रसाद म्हणून कधी मसाला दूध तर कधी राजगिरा लाडू प्रसाद तर कधी खटखटे बुंदी लाडू अन् मक्याचा चिवडा दिला जात होता. हे सगळे नियोजन श्री. मनोज परमार यांचे होते. रोजचे गऱ्हाणे.'बांदेश्वर महाराजा मुलाबाळांचा संभाळ कर.' 'पुरकेश्वर महाराजा हातपायाखाली बरे ठेव.' आणि खुद्द श्रीदेवी मुहुर्ताईला रोजचे तेच तेच सांगणे 'चूक भूल माफ कर. काही धानपीडा, अडचण असेल तर चतु:सीमेच्या बाहेर घालवून टाक.' महेश कांबळीचे अगदी खर्जातले गऱ्हाणे व्हायचे. नवीन इनोव्हेटिव्ह म्हणजे 'सर्व स्त्रीशक्तीला देवीच्या आरतीसाठी देवीच्या समोर उभे करणे' झाले. गेल्या १३/१४ वर्षांच्या कालावधीत नवरात्रीचे उत्सवामध्ये महिला वर्गाची उपस्थिती लक्षणीय वाढली आहे. हळदीकुंकू समारंभ, पैठणी स्पर्धा आदी मध्ये त्यांचा

सहभाग वाढला आहे. अन्यथा या नवरात्र उत्सवामध्ये रात्रीच्या आरतीला महिला वर्ग कधीच येत नसे. कधी त्यांना बोलावणे झालेले नव्हते. सन २००८ पासून ही सुरुवात झाली. महिलांना आमंत्रित करून तेव्हा पासून बोलावणे सुरू झाले. महिला मंडळाची उपस्थिती आत्ता लक्षणीय दिसत आहे. परंतु हा महिलावर्ग आरतीच्या वेळी देवीच्या बाजूच्या भागामध्ये, पडवीच्या भागामध्ये उभा राहायचा. यंदा हेच ते इनोव्हेटिव्ह की सर्व महिलावर्ग देवीच्या समोरच्या डाव्या बाजूला उपस्थित राहू लागला आहे. अंधाराकडून प्रकाशाकडे येणे झाले. ‘उजेडी’ आल्या हे ते इनोव्हेटिव्ह झाले. देवीचा उत्सव असल्यामुळे प्राधान्य नारीशक्तीला असले पाहिजे हा तो एक विचार होता. अंमलात आला म्हणून काहीसा आनंद झाला. बाकी काही नाही. दुसरे इनोव्हेटिव्ह म्हणजे ‘ड्रॉपबॉक्स’. म्हणजे ‘तात्पुरती दानपेटी’ आणि उत्सवदेणगी देण्यासाठी देणगीपावतीची सोय केली. हे इनोव्हेटिव्ह अगदी सुशेगात सुरू झाले. उत्सव खर्च वाढले की त्याचे नियोजन केले पाहिजे, तरतूद केली पाहिजे आणि म्हणून ही सुरुवात केली आहे. कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार नाही. आणि या सुधारणेला सुध्दा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत गेला. नवरात्र उत्सव जमा आणि नवरात्र उत्सव खर्च म्हणून सेपेरेट ‘लेजरपेज’ केले आहे. खतावणीमध्ये नवीन रकाना तयार झाला आहे. बाकी अडचण कोणतीच नाही. मित्रांनो, श्री देवी भराडणी मंदिराला तटबंदी, छोटीशी विहीर आणि त्या ठिकाणी सभोवताली चिरेबंदी फरस बसवीण्याचा विचार केला. २०००/३००० जांभा चिऱ्यांचे कामकाज होते.दीड दोन लाखांचा खर्च सहजपणे होणार होता. ‘जमेचे रकाने वाढवले तर आणि तरच खर्चाचे रकाने करता येतील. यंदा श्रीदेवी भराडणी मंदिरात दोन छोटी लाकडी कपाटे तथा फडताळे करून झाली. श्री. प्रमोद उपळकरने पुढाकार घेऊन श्री. जगदीश मेस्त्री कडून करून घेतले. अगदी थोडक्यात झाले. छोटीशी ढोलकी, आरतीचे टाळ आदी साहित्य राहील इतकीच जागा उपलब्ध होईल अशी कपाटे आहेत. बैठकीच्या जागेखाली ही कपाटे आहेत. अडचणीची होणार नाही याची पूर्ण खबरदारी घेऊन करण्यात आली आहेत. सभोवतालच्या परिसराची साफसफाई त्या निमित्ताने झाली. श्री. प्रमोद उपळकरने स्वखर्चाने भिंती वरचे घड्याळ आणून बसवले. वार्षिक नवरात्र उत्सवामधील सहावा दिवस धमाकेदार पावसाने गाजवला, धो धो पाऊस पडला. कडकडाट करून गरजला. लखलखाट करून बरसला. संध्याकाळी साडेसहाला पावसाने नवरात्र उत्सवामधील आपली बॅटींग सुरू केली. धो धो पाऊस पडत असताना आणि खळखट्याक सुरू असताना संध्याकाळी ठिक सात वाजता श्री भराडणी देवीची आरती सुरू झाली. अगदी वेळेवर सुरू झाली. विद्युत मंडळाचा लाईट खळखट्याकला घाबरून पळून गेला होता परंतु चार्जिंग दिव्यावर भराडणी देवीची आरती पार पडली.ठीक साडे सात वाजता प्रसाद वाटप झाले. उपस्थिती थोडी कमी झाली असली तरी इतक्या ठोम पावसात भाविक भक्तांनी हार मानली नाही. श्रीदेवी मुहूर्ताईचे धुपारतीचे ढोल वाजू लागले. परंतु ठोम पाऊस होता. चारचाकी घेवू की दुचाकी घेवू या घोळात थोडासा वेळ गेला. पावसाने थोडी उसंत घेतल्याने आणि सौभाग्यवतींनी डोक्यावर छत्र धरल्यामुळे दुचाकी वरून मंदिरी जाणे शक्य झाले होते. आरती अगदी ठीक वेळेवर सुरू झाल्या. त्या दिवशी पुन्हा एक इनोव्हेशन झाले. पंचारत धरणारे श्री. नरेश कांबळी ‘तयार सोवळ्यात आणि उपरण्यात’ सज्ज झाले. हे ते इनोव्हेशन होते. नेहमीच्या हाफ पॅन्ट मधून चक्क सोहळ्याच्या पेहरावात श्री. नरेश कांबळी उपस्थित झाल्याने चक्क श्रीदेवी मुहूर्ताई सुध्दा मनोमन खूष झाली होती. आत्ता हे इनोव्हेशन ‘एक रिवाज’ करण्याचे काम आपले आहे.आरती सुरू असताना पावसाला सुध्दा अगदी ऊत आला होता. सुरू झालेल्या आरती अगदी नियत वेळेवर समाप्त झाल्या. मृदुंगाचा मुखलेप उतरला. प्रसाद वाटप सुरू झाले. त्या दिवशीचा प्रसाद श्री.दिलीप चव्हाण यांच्या मुलाने दिला होता. डिश भरून बटाटा वेफर्स दिले गेले. प्रसाद देणाऱ्या बद्दल आभार मानले ते पोलिस पाटील श्री. गजानन भोगले यांनी. भजनासाठी श्री.साखरकर आदी मंडळी अगदी वेळेवर उपस्थित होतीच. धूमधडक्याचा पाऊस असूनही उपस्थिती भरपूर होती. ‘लक्षणीय’ होती. श्री. सचिन मेस्त्री याने हे सर्व मोबाईल शुटिंग केल्यामुळे ते साठवणीत राहीले. नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने श्री देवी मुहूर्ताईच्या मंदिरामध्ये हळदीकुंकू समारंभ आणि पैठणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे १२५/१५० स्त्रियांनी हळदीकुंकू समारंभासाठी आपली उपस्थिती लावली. पैठणी स्पर्धेसाठी १८ स्त्रियांनी आपली नोंदणी केली. पैठणी स्पर्धेसाठी अँकरींग केले ते ‘आमचे भावजी’ श्री. उदय कांबळे सरांनी. स्पर्धा अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने कंडक्ट

करण्यात आली. प्रथम क्रमांक सौ.अश्विनी अनिल कुवेसकर, महामेरीवाडी–मिठगवाणे यांनी तर द्वितीय क्रमांक सौ.मानसी विजय चव्हाण, कसबावाडी–मिठगवाणे यांनी पटकावला. सौ. अश्विनी कुवेसकर यांनी 'मानाची पैठणी' पटकावण्यात यश मिळविले. तर सौ.मानसी चव्हाण यांना द्वितीय क्रमांक म्हणून आणि श्रीदेवी मुहूर्ताईचा प्रसाद म्हणून नऊवारी साडी देण्यात आली. श्रीदेव अंजनेश्वर देवस्थान मार्फत हे सर्व नियोजित करण्यात आले होते. दुपारी ३.०० पासून संध्याकाळी साडेपाच पर्यंत हा कार्यक्रम चालला होता. पुढच्या वर्षीपर्यंत स्मरणात राहील असा कार्यक्रम झाला. नवरात्र उत्सव म्हणजे श्रीदेवीचा उत्सव असल्याने हा स्त्रियांसाठीचा कार्यक्रम घेण्यात आला. कोरोना कालावधीमध्ये दोन वर्ष हा कार्यक्रम होऊ शकला नाही. त्यापूर्वी दोन वर्ष हळदीकुंकू समारंभ आणि पैठणी स्पर्धेचे आयोजन केले होते. तो अनुभव लक्षात घेऊन हा कार्यक्रम घेण्यात आला. स्त्रियांचा उत्स्फूर्त सहभाग वाढला हे ते विशेष होते.

**● शिवणकाम कोर्स –**

मंगळवार २७ सप्टेंबर २०२२ पासून अंजनेश्वरच्या भक्तनिवासमध्ये 'शिवणकाम कोर्स ' सुरू करण्यात आला. दुपारी ३.०० वाजता एक औपचारिक कार्यक्रम करून शिवणकाम कोर्स सुरू झाला. वात्सल्य ट्रस्ट मुंबई व श्रीदेव अंजनेश्वर देवस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम सुरू झाला आहे. शिवणकाम कोर्स पूर्ण केल्यावर वात्सल्य ट्रस्ट कडून सर्टिफिकेट दिले जाणार आहे. ठरल्याप्रमाणे श्री देव अंजनेश्वरच्या भक्तनिवास मध्ये शिवणकाम कोर्स सुरू झाला. सुमारे ७०/८० ग्रामस्थांच्या उपस्थितीत हा छोटेखानी कार्यक्रम पार पडला. श्री.दिवाकर आडविलकर, श्री.डॉ.प्रदीपकुमार मयेकर, श्री.सत्यवान कणेरी, सरपंच श्री. बलवंत सुतार, श्री. उमर नाईक, वात्सल्य ट्रस्टचे श्री. पाटीलसाहेब या मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. मिठगवाणे, तुळसुंदे, बाकाळे, दांडे, अणसुरे, पठारतिवरांबी आदी ठिकाणच्या ग्रामस्थ महिला पुरुष उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते फित कापून शिवणकाम कोर्सची सुरुवात झाल्याचे जाहीर करण्यात आले. वात्सल्य ट्रस्ट मुंबई आणि श्रीदेव अंजनेश्वर देवस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. वात्सल्य ट्रस्टचे सेक्रेटरी श्री.श्रीकांतजी जोशी यांनी या मध्ये पुढाकार घेऊन वात्सल्य ट्रस्ट कडून उषा कंपनीच्या शिलाई मशीन उपलब्ध करून दिल्या होत्या म्हणून हे सर्व शक्य आहे. प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षकांचा पगार वात्सल्य ट्रस्ट मार्फत दिला जाणार आहे. श्री. उमर नाईक यांनीही यासाठी सतत पाठपुरावा केला होता. या कार्यक्रमाला श्री. रमेश राणे, श्री.समशुद्दीन मिर, श्री. रझाकखान गवाणकर, श्री. नरेश कांबळी, श्री. उदय कांबळेसह, श्री. मोहीतेसर, श्री.वसंतराव मोहीते आदी मंडळी उपस्थित होती. उपस्थित सर्वांना चहापान देण्यात आले. श्री.सदानंद लिंगायत, श्री.सुधाकर लिंगायत, श्री.तेजस लिंगायत, श्री. सिध्देश लिंगायत यांनी सर्व बैठक व्यवस्था ठेवली होती. एकूण २२ विद्यार्थी आजरोजी रजिस्टर झाले. श्री. सत्यवान कणेरी, प्रशिक्षक सौ. मेस्त्री मॅडमनी सर्व विद्यार्थ्यांना क्लास बाबत माहिती दिली. सुरुवात उत्साह वर्धक झाली. हा नवीन उपक्रम व्यवस्थित चालला तर अजूनही छोटे छोटे कोर्स सुरू करता येतील. मोबाईल रिपेरिंग, कॉम्प्युटर ट्रेनिंग आदी कोर्स सुरू करणे शक्य आहे.

**● निशाणकाठी स्थापनेचे नियंत्रण.**

उत्सवाच्या एक दिवस पूर्वी म्हणजे 'बुधवार दि. ०२ नोव्हेंबर २०२२ रोजी' मंदिरातील जुन्या निशाणकाठीचे विसर्जन / अवरोहण होणार होते तर नवीन निशाणकाठीची स्थापना तथा आरोहण होणार होते. सन १९४५ मध्ये स्थापना झालेली लाकडी निशाणकाठीचे विधीवत विसर्जन तथा अवरोहण होत असताना आपली सर्वांची उपस्थिती आवश्यक आणि प्रार्थनीय होती. मंदिरातील ७७ वर्षांच्या निषाणकाठीचे विसर्जन आपणा सर्वांच्या उपस्थितीत विधीपूर्वक आणि समारंभपूर्वक करायचे होते. नवीन निशाणकाठी श्री.नरेश कांबळी यांच्या घराजवळून सवाद्य मिरवणूकीने आणून श्रीदेवाच्या मंदिरात स्थापना तथा आरोहण करायची होती. हा सर्व धार्मिक कार्यक्रम १२ गावचे १२ खोत, जवळपासच्या देवस्थानचे विश्वस्त व आपण सर्व भाविकभक्त यांच्या उपस्थितीत संपन्न होणार होता. सकाळी ८.०० ते दुपारी १ वाजेपर्यंत हा संपूर्ण कार्यक्रम होणार होता. या कार्यक्रमाचे आपण सर्व साक्षीदार असावे म्हणून हे आगाऊ निमंत्रण दिले होते लहान थोर, अबालवृद्ध, माताभगीनींच्या उपस्थित हा कार्यक्रम होणार होता तरी

आपल्याला या कार्यक्रमाला उपस्थित रहाता यावे, तिकीट रिझर्व्हेशन करता यावे म्हणून हे आगाऊ आमंत्रण दिले होते. श्री देवाचा कार्तिकोत्सव 'गुरूवार दि.०३ नोव्हेंबर ते सोमवार दि.०७ नोव्हेंबर २०' असा पाच दिवसांचा होता. त्याचे निमंत्रण स्वतंत्र दिले होते. परंतु निशाणीकाठी स्थापना हा कार्यक्रम उत्सवापूर्वी एक दिवस होणार होता म्हणून थोडी जास्त प्रसिद्धी करावी लागली होती.

**● शुभारंभ भराडणीच्या कामांचा...**

दसऱ्याला शुभमुहूर्त असल्याने त्यासाठी दुसरा शुभमुहूर्त शोधण्याची आवश्यकता भासली नाही. श्री भराडणी देवीच्या मंदिराच्या चोहोबाजूला ४/५ फूट उंचीची दगडी चिऱ्याची तटबंदी, मंदिराच्या सभोवती दगडी चिऱ्याची फरसबंदी आणि आठ फूट व्यासाचा पाण्यासाठीचा आड (छोटीशी विहीर) अशा कामांचा शुभारंभ करायचा हे ठरवलेच होते. 'बारापाचांची देवता'. भराडणी देवीच्या या कामकाजामध्ये सर्वांना हातभार लावण्याची संधी ठेवलेली होती. उदा.विहीरीचे खोदकाम करण्याची कुणाची इच्छा असेल तर ते करता येईल. कुणाला या कामासाठी देणगी देण्याची इच्छा असेल त्यांना या कामासाठी 'यथाशक्ती यथामती' देणगी देता येईल. 'सक्ती' कुणावरही नाही. देणगी 'श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे' या बँक खात्याला ट्रान्स्फर करता येईल, अशी सोय केली होती. त्याबाबतची देणगीपावती संबंधित देणगीदार व्यक्तीला देता येईल. चिरे, सिमेंट, वाळू, लोखंडी गेट आदीची वस्तुरूप देणगी कुणाही व्यक्तीला देता येईल, कुणाही व्यक्तीला या ठिकाणी काम करणाऱ्या मजूरांच्या चहापानाचा खर्च करता येईल. मित्रांनो. हे कामकाज श्रीदेव अंजनेश्वर देवस्थान माध्यमातून करायचे ठरवले होते. परंतू त्यामध्ये प्रत्येक घरातील सहभाग मिळावा, अशी अपेक्षा ठेवली होती. सक्ती अजिबात नव्हती. सामान्यपणे ५०००/६००० जांभ्या चिऱ्यांचे एकूण कामकाज असल्यामुळे पाचसहा लाखांचा कमीत कमी खर्च अपेक्षित होता. जे ज्याला जसे शक्य होईल तसे तसे त्याने करावे, असे सामान्य सूत्र होते. मंदिराचे जतन करणे, सुशोभीकरणापेक्षा ऊर्जितावस्था राखून ठेवणे हे आपले कर्तव्य आहे म्हणून हा धाडसाने घेतलेला पुढाकार होता.

नवरात्र उत्सवामधील मुहुर्ताईच्या मंदिरामधील उपस्थिती ३०० च्या जवळपास झाली होती. दोन दिवस पावसाने अगदी पूर्णपणे उसंत दिल्यामुळे उपस्थिती वाढली होती. श्री भराडणी देवीच्या मंदिरात कालरोजीची उपस्थिती ३० पार करून गेली. पूर्वी अनेक वर्ष एकान्तवास सहन करणारी श्रीदेवी भराडीण मनोमन खूष झाली होती. मंदिरांचे जीवंतपण भक्तांच्या उपस्थितीवर शाबूत रहाते. भक्तांची वरदावळ सुरू राहीली की परमेश्वर सुध्दा स्वाभाविक म्हणतो की आपण येथेच भक्तांसाठी थांबून राहिले पाहिजे. मोठ्या मोठ्या मंदिरामध्ये अलोट गर्दी होते. आपोआप साफसफाई स्वाभाविकपणे होते. परंतु छोट छोटी मंदिरे गर्दीची ठिकाणे झाली नाही तरी चालतील परंतु किमान अधूनमधून येणे जाणे राहिले तर मंदिरातील स्वच्छता आदी गोष्टी स्वयंप्रेरणेने अनेकदा होतात आणि तेवढे झाले तरी पुरेसे असते.

दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर श्रीदेवी भराडणी देवीच्या सभोवताली दगडी तटबंदी, दगडी फरसबंदी आणि पाण्यासाठी आड तथा गोल विहीर या कामांचा शुभारंभ होणार होता. सर्वांना निमंत्रण दिले होते.अनेकांनी या कामासाठी देणग्या देण्यासाठी सुरूवात केली होती. जांभा चिरा, बांधकामी मजूर लोक आदी सर्व उपलब्ध झाले तर हे नियोजित काम अगदी जलदगतीने पूर्ण होईल अशी अपेक्षा होती.

महत्वाची सूचना अशी दिलेली होती की या कामासाठी जी देणगी रक्कम पाठवायची असेल ती श्रीदेव अंजनेश्वरच्या बँक खात्याला पाठवली पाहिजे. काही आमच्या मित्रमंडळीनी देणगी रक्कम माझ्याच बँक खात्याला ट्रान्स्फर केली होती. मला ती सर्व रक्कम अंजनेश्वर खाती जमा करून देणगी पावत्या करायला लागल्या होत्या. त्यामुळे या कामासाठी देणगी देताना ती श्री देव अंजनेश्वर बँक खात्याला थेटपणे दिली पाहिजे, माझ्या खात्याला नको असे मेसेज करून सांगितले होते. देणगीचे कामकाज सुटसुटीत व्हावे म्हणून देवस्थानचा बँक क्यूआर कोड दिला होता. क्यूआर कोड आपल्या गॅलरी मध्ये आपोआप सेव्ह होतो. हा सेव्ह क्यूआर कोड सिलेक्ट करून गुगल पे, पेटीयम, भीम आदी द्वारे पेमेंट करता येईल. पेमेंटचा स्क्रीन शॉट ९८२३२७७३२६ या व्हाटस्अप नंबरला पाठवला की पावती करणे सोपे होते आणि सोयीचे होते. मित्रांनो, 'श्रीदेवी भराडणी मंदिर' मिठगवाण्यातील 'तिसरे महत्त्वाचे मंदीर'आहे. श्री देव अंजनेश्वर व श्री देवी मुहूर्ताईच्या दर्शनामध्ये श्रीदेवी भराडणीचे दर्शन झाले नाही तर ती दर्शनातील अपूर्णता

समजायची. इतके 'महत्त्वाचे स्थान' आहे. 'श्रीदेवी भराडीण' तथा 'श्री देवी भरतदुर्गा'. लहानपणात ठसलेले ते 'भराडीण'. अकलेचे धुमारे फुटायला लागल्यानंतरचे ते नाव ''श्रीदेवी भरतदुर्गा'. मराठी शाळेत असतानाची ती 'खेळायची जागा'. खांबा पाठीमागे लपून बसले तरी शाळेतल्या मास्तरांना कळणार नाही इतके मोठे मोठे खांब आहेत. 'सहा खांब'. संपूर्ण एकसंध दगडात कोरलेले आहेत. उंचीला बेताचे असले तरी रुंदी डोळ्यात भरणारी आहे. खांबामागे लपून बसलेले पोर मास्तरांच्या कधीच लक्षात येणार नाही, इतके मोठे आहे. दोन चार भोंबाडे. दोन-चार बिनत्राशीक कुत्री बसलेली असायची. पौर्णिमेच्या रात्री सुध्दा चंद्रप्रकाश जमिनीपर्यंत पोहोचणार नाही इतकी घट्ट राई. सुरंगीणी, ओवळीणीची गच्च झाडी. कडू काजरे अख्या गावाचे तिथे भराडणीच्या सोबतीला उभे असल्यासारखे. समोर अजस्त्र वटवृक्ष व त्याच्या सोबत तितकाच अजस्त्र पिंपळ सुद्धा. 'दोघेही मंतरलेले' आहेत. मदिरेचा अतिरेक झालेल्यांना मंदिरी नतमस्तक होण्याची सोयिस्कर जागा म्हणजे 'भराडीण'. 'भराडीण मंदीर'. अगदी परवा परवा पर्यंत निसर्ग राईतले मंदीर श्री देवी भराडीण मंदीर असे होते.

दुपारच्याला रणरणत्या उन्हात यऊन नमस्कार न करता विसावण्याचे ठिकाण म्हणजे 'श्रीदेवी भराडीण मंदीर' मराठी शाळेतल्या मुलांची डबे खायची जागा म्हणजे 'श्री देवी भराडीणचे मंदीर'. कै. जयराम उपळकरांचे संध्याकाळचे वास्तव्य इथे असायचे म्हणतात. असे मी आमच्या गावखडच्या स्वर्गीय काशीआत्ते कडून बरेच वेळा ऐकलेले होते. आमची सुमनआत्ते सुद्धा नेहमी हे आवर्जून सांगायची. त्यांच्या लहानपणी तिन्हिसांजेला दिवावात भराडणीला लावायला जायची त्यावेळचा त्यांचा तो अनुभव होता. 'देवराई' अशी सातबारातली नोंद आहे. सरकारी मालकीचा सातबारा आहे. म्हणून तर 'राई' राहिली. 'सुरंगीणी' राहिल्या. 'ओवळीणी' राहिल्या. 'सरकारी जुगाढ' म्हणून. 'वर्ष २००१' मध्ये हे सर्व पालटले. गावकऱ्यांनी जीर्णोद्धार करायचे ठरवले. तत्कालीन अंजनेश्वरचे विश्वस्त श्री. बा.गो. तथा बाळाभाऊ देसाई यांनी पुढाकार घेतला. दत्ताराम जगन्नाथ म्हणजे बाळू पाटणकर यांनी सुद्धा पुढारपण घेतले. श्री. राजाराम मसूरकर व श्री. नरेश कांबळी यांनी निधी गोळा करण्यात हातभार लावला. बांधकाम सुतारकाम श्री. विलास मेस्त्री, श्री. भगवान राणे, श्री. रामदास रायकरांनी केले. मंदिराची उंची वाढवण्यासाठी सहा खांबावरची 'सहा उठाळी' श्री. दशरथ कणेरींनी घडवली. हे 'घडवण' सुध्दा इतके सोपे नाही. कातळ पोखरून तयार केलेले दोन फुट उंचीचे खांबाच्या आकाराचे सहा दगड, कठीण काम म्हणून तर हा दशरथदादांचा उल्लेख केला आहे.भंडारसाखरीचे श्री. सूर्यकांत धोंडू साखरकर यांनी लाकडी रेलिंग, लादी, टाईल्सची रक्कम दिली होती. श्री.दिनकर वासुदेव देसाई व कै.पर्शरामपंत गोखले तथा भाऊराव गोखले कोल्हापूर, कै.किशोर भुर्के यांचेसह माडबनमधून जास्तीची व जानशी, बाकाळे, तिवरांबी आदी सर्व गावांनी यथाशक्ती देणगी देऊन 'उघडे उघडे' असलेले मंदिर लाकडी रेलिंग मधले, दरवाजा असलेले झाले. प्रमोद कुवेसकरने लादीकाम व प्लास्टर केले होते.

नवीन लाकूड सामान वापरून संपूर्ण नवीन छपराचे काम हाऊन सज्ज झाले. रु.५२१०७/- जमले व ६३८ रुपये २५ पैसे सर्व खर्च भागवून शिल्लक राहिले. सन २००१ मध्ये हे सर्व झाले म्हणून ते साक्षीदार वर्ष.. अहवाल लिहिला गेला म्हणून ती 'अहवालाची पाच पाने' साक्षीदार आहेत. सर्व देखरेख दत्ताराम जगन्नाथ पाटणकर यांची. आढे चढवल्याची नोंद माझ्या डायरीत टिपलेली आहे .'गुरुवार दि.२९ मार्च २००१ श्री देवी भराडणीच्या मंदिरावर आढे बसवल्याची नोंद डायरीत आहे'. ग्रामपंचायतीने मंदिरासमोर छोटी पाखाडी सद्धा बांधली. आमची सौभाग्यवती शरयू जवळपास नियमित संध्याकाळी फूलवात लावायला जाते. म्हणून रोजचे स्मरण होते. ''भराडणीला जाते .. ऐकलं का'' म्हणून आपोआप ते तिचे शब्द माझ्या कानावर पडून पडून माझे सुध्दा रोजचे नित्य स्मरण. श्री देवी भराडणीचे.'आपोआप स्मरण' 'मंदिरात न जाताच'होते. अशा नित्य स्मरणातून सुचलेले व हातून झालेले सहजचे पुण्यकर्म म्हणजे विद्युत कनेक्शन घेण्याचे पंण्यकर्म' हो मला पुण्यकर्म केल्यासारखे वाटले व वाटते सुद्धा. कारण गावात लाईट पेटला १९७८ सालात, परंतु भराडीण काळोखातच होती. म्हणूनचे 'पुण्यकर्म' वाटते. सन २०१७ मध्ये केलेले 'पुण्यकर्म'. श्री देवी भराडणीचे मंदिराला लाईट कनेक्शन.

हो. प्रयत्नांचे 'जुगाड' करून विद्युत कनेक्शन मिळाले. ३/४ पॉईंटचे फिटिंग झाले. श्री. गिरीश धनावडे याच्या हातचे फिटींग आहे. टेस्ट रिपोर्टचे 'जुगाड' सुद्धा गिरीश धनावडेने केलेले आहे. 'ईश्वर इच्छा बलीयसी' तून मिळालेले लाईट कनेक्शन. बाहेर सोलर दिवा सुद्धा लागला होता तो अंजनेश्वर ग्रामीण यात्रास्थळ विकास योजनेतला, अंजनेश्वरसाठी जास्त झालेला, तो इथे लावला होता.

श्री. पांडुरंग भिकाजी तांबे,श्री. विश्राम महादेव तांबे व श्री. प्रकाश शांताराम उपळकर यांच्या कुटुंबाकडून दर मंगळवारची साफसफाई होत असते. कोणतेही मानधन न घेता होते. त्यांची ती सेवा महत्वाची वाटते. श्री. प्रकाश मणचेकरांची अधूनमधूनची सेवा घडते. मंदिराशेजारचे कै.ल.रं.हातणकरांच्या कारकिर्दीतले बोअरींग निकामी झाले म्हणून मी तांबे-उपळकर-मेस्त्री-मणचेकर या चार परिवारांना स्वखर्चाने पाण्याची सोय करून दिली होती व त्या आठवणीतून त्यांची ती भराडणीची 'साप्ताहिक सेवा' होत आहे. कै.लक्ष्मी तांबी श्रावणात भराडीण परिसर बेणून काढायची म्हणूनचा तिचा 'तो उल्लेख'महत्त्वाचा वाटतो. अशी सेवा 'अपूर्व' असते म्हणून अश्यांची नोंद शब्दात करून ठेवायची असे वाटत रहाते. श्री. प्रमोद उपळकर, श्री. प्रकाश उपळकर मंगळवारी जमेल तेव्हा आरती करतात. नवरात्रीचे नऊ दिवस उपळकरांच्या पुढाकाराने 'आरती' होते. मी सुद्धा जवळपास सर्व दिवस जातोच जातो.

सन २०१७ मध्ये पुन्हा रंगरंगोटी झाली. नरेश कांबळी, प्रमोद शिंदे, संतोष शिंदे, आदी लोकांनी रंगकाम केले. भराडणीचा बोर्ड प्रशांत भडेकरांच्या ब्रशाने झाला. हे सर्व श्री देव अंजनेश्वरच्या कृपेने झाले. सुवर्ण कलशाचे समारंभात श्री. संतोष पाटणकरांनी सपत्नीक पुढारपण घेऊन श्रीदेवी भराडणीला अंजनेश्वर दरबारी नऊन आणले. तो दिवस ना श्री देवी भराडीण विसरणार ना संतोष पाटणकर विसरणार. तो दिवस तिच्या भाग्याचा होता. वर्षानुवर्ष घनराईतली भराडीण नटूनथटून श्री देवाच्या दरबारात गेली होती, 'तो दिवस' बारापाचाची, मिठगवाणे गावची 'मालकीण' म्हणून. हिची नित्य पूजा श्रीदेवी मुहूर्ताईचे गांवकर कांबळी, मसुरकर घराण्याकडे आहे. यात हल्ली भर पडली ती मनोज परमारांची. गुजराथीमारवाडी हे 'परमार' सद्धा तिची नित्य पूजा मनोभावे करत आहेत. वर्षाला माडबनकरांची 'समाराधना'होते. अगदी हट्टाने वर्षानुवर्षे चालू आहे. कमी-जास्त प्रमाणात असेल, पण परंपरा चालू आहे. शिमग्यातले खेळ्यांना इथे दोन मिनिटांची तरी थाप मारूनच पुढे जावे लागते. लग्नाचा नवरदेव भराडणीला भेटल्याशिवाय पुढे जाणारच नाही. असे हे ठिकाण आहे. स्वयंभू देवस्थान आहे. भक्तांनो, वर्षातून कधी येणे झाले तर जरूर श्रीदेवी भराडणीचे दर्शन घ्यायला विसरू नका. मित्रांनो, हे सर्व कशासाठी लिहून ठेवायचे ?. हेतू काय? भक्तांनो, तुम्ही गावांत आल्यावर केवळ अंजनेश्वर, केवळ मुहूर्ताईला भेटून निघून जावू नये, श्री देवी भराडीण मंदीराला सुध्दा भेटून जावे , तुम्हाला विसर होऊ नये म्हणूनचा माझा प्रयत्न आहे. दुसरा हेतू स्थित्यंतर लक्षात यावे म्हणून आहे. तिसरा हेतू हे सर्व झाले कसे, कोण कोण होते...कोणी कोणी काय काय केलेले आहे ते कळावे म्हणूनचा आहे. परदेशात वास्तव्य करणाऱ्या आपल्या लोकांना इथले सर्व थेटपणे कळावे, कळत जावे म्हणूनचा हा उपद्व्याप आहे.

'गुणाते वाखाणि तोचि संत' गुणांची वाखाणणी झाली पाहिजे. 'तुझा विसर न व्हावा' म्हणूनचा प्रयत्न आहे. म्हणून प्रत्येक छोट्या मोठ्या कामाचे स्मरण केले आहे. दुसऱ्याने चांगले केलेले काम ते चांगलेच म्हटले पाहिजे, म्हणूनचे 'लिखाण केले आहे.'

'नको लोभ मान' 'नको लौकिक आगळा' हे लिखाण 'लोभ' धरून केलेले नाही, मला काही तरी मिळेल म्हणूनचे नाही, समाजात 'मान, सन्मान' मिळावा म्हणून तर मुळीच नाही. तो आपोआप नेहमीच मिळत असतो. आपला आगळावेगळा लौकिक वाढावा, म्हणून तर बिलकूल नाही. कधी काळी कोणी एक हे सर्व कागदी पुष्पमालेत गुंफू लागला, तर माझी थोडीशी पुष्पे त्यात गुंफली जातील, अगदीच गुंफली गेली नाहीत तरी कमीत कमी निर्माल्य बनून तरी रहातील, म्हणूनचा हा प्रयत्न करीत आहे. भराडणी कामाचा शुभारंभ दसऱ्याचे दिवशी नियोजनानुसार श्री भराडणी देवीच्या मंदिराच्या तटबंदीचा, दगडीफरसबंदीचा आणि पाण्यासाठीच्या आडाच्या कामाचा शुभारंभ झाला. अगदी ठीक वेळेवर संध्याकाळी ४.०० वाजता कामाचा शुभारंभ झाला. देवाचे जोशी उपस्थित होते. श्री. मधू जोशी

अगदी वेळेवर उपस्थित होते. माडबनचे खोत श्री.शामसुंदर गवाणकर उपस्थित होते. काजवे, कांबळी आदी सर्व उपस्थित होते. श्री. प्रकाश उपळकर यांनी भूमीपूजन केले. कै.जयराम सखाराम उपळकर यांचे पणतू. कै. जयराम उपळकर यांचा रहिवास या मंदिरात अनेक वर्ष होता आणि म्हणून श्री. प्रकाश उपळकर यांचे हस्ते भूमिपूजन केले होते. त्यानंतर श्री. विश्राम तांबे, श्री.पांडुरंग तांबे व श्री.पंकज उपळकर यांनी पिकाव मारून कामाची सुरुवात केली. अगदी २०/२५ मिनिटांमध्ये हा शुभारंभाचा कार्यक्रम दसऱ्याच्या दिवशी पार पडला.

**●सोने लुटण्याचा कार्यक्रम –**

सन २०२२ मधील दसऱ्यानिमित्त झालेला सोने लुटण्याचा कार्यक्रम अगदी उत्साहातआणि नियोजित वेळेत पार पडला.उपस्थिती लक्षणीय होती. सोने पूजनासाठी श्री.मधूभाऊ जोशी, (देवाचे जोशी) म्हणून उपस्थित होते व सोबतीला श्री. प्रकाश परांजपे उपस्थित होते. कै.जयंत शंकर जोशी यांची अनेक वर्षांनंतर घडलेली अनुपस्थिती. अनेक वर्षे अगदी वेळेपूर्वी तासभर उपस्थित राहून 'जोशीपण' बजावणारे कैलास निवासी जयंतराव आमच्यामध्ये नाही, ही टोचणी लावून गेली. परंतु 'काळ' कुणासाठी थांबत नाही, असे म्हणतात. स्वर्गीय जयंतरावांची जागा श्री.मधू जोशी यांनी घेतली व समर्थपणे चालवली. देवासाठी 'जोशी' लागतात ते उपस्थित होते, ते महत्वाचे आहे. कामकाज अडून राहिले नाही. स्वर्गीय जयंतराव सुद्धा हा कार्यक्रम पाहून खूष झाले असतील. असो. सोनेपूजनानंतर सोने लुटण्याचा कार्यक्रम अगदी थोडक्यात परंतु मजेशीर पार पडला. आरती झाल्या. त्यानंतर सर्वांचे ढोलताशांच्या गजरात श्री देवी मुहूर्ताईच्या मंदिराकडे प्रस्थान झाले.दसरा, विजयादशमी बाबत काही माहिती वाचनात आली ती इथे शेअर करीत आहे. 'विजयादशमी अर्थात दसरा' आज विजयादशमी अर्थात दसरा. साडे तीन मुहूर्तातील एक मुहूर्त. दशहरा या शब्दावरून दसरा हा शब्द आला आहे. दश म्हणजे दहा आणि हरा म्हणजे पराभूत करणे. दशमुखी रावणाला प्रभू श्रीरामांनी आजच्या दिवशी पराभूत केले या अर्थी तो दशहरा. दाशरथी राम आणि दशमुखी रावण. राम दाशरथी का ? आत्मानं रथिनं विद्धि शरीरं रथमेव तु बुद्धीं तु सारथी विद्धी मन: प्रग्रहमेवच मनुष्य शरीराला रथाची उपमा दिली आहे आणि आत्मा हा या रथाचा स्वामी आहे. बुद्धी या रथाची सारथी आहे आणि मन हे लगाम आहेत. आपले शरीर दशेंद्रियानी युक्त असून इंद्रियांना रथाच्या घोड्यांची उपमा दिली आहे. या *दहा इंद्रियांपैकी एकाच इंद्रियावर संयम दाखवणारा साधक एकरथी तर दशेंद्रियांवर संयम साधणारा दाशरथी तो प्रभू श्रीराम !* रावणाला दशग्रंथ अगदी मुखोद्गत होते म्हणून तो दशानन! परंतु आपल्या ज्ञानाचा त्याला गर्व झाला, अहंकार झाला , रामाने केलेला रावणाचा पराभव म्हणजे ज्ञान वा शक्तीमुळे गर्वमदान्वित झालेल्या साधकाच्या अहंकारी वृत्तीवर दाशरथी रामांनी मिळवलेला विजय होता. असुरीवृत्ती वरील विजय म्हणून विजयादशमी. षोडश मातृकामध्ये सहाव्या क्रमांकावर असणाऱ्या देवीच नाव विजया आहे. या देवीच्या नावाने साजरा केला जाणारा सण म्हणजे विजया दशमी !* शस्त्राने देशाच्या सीमांचे रक्षण करणारे किंवा शस्त्रांचा वापर इतर चांगल्या कामांसाठी करणारे या दिवशी शस्त्र पूजा करतात. शस्त्र हे प्राणांची रक्षा करतात आणि भरण पोषणाचे साधनही असतात. ( इथे शेतकऱ्यांचा संबंध येतो ) या शस्त्रांमध्ये विजया देवीचा वास आहे असे मानून त्याची पूजा केली जाते. दुर्गा मातेने ९ दिवस युद्ध करून महिषासुराचा वध केला तो दिवसही दसऱ्याचा. थोडक्यात अज्ञानावर ज्ञानाने, शत्रूवर पराक्रमाने, वैऱ्यावर प्रेमाने विजय मिळवायचा, आनंद, समाधान आणि संपदा मिळवून यश आणि कीर्ती प्राप्त करायची असा हा साडे तीन मुहूर्तातील एक मुहूर्त. आता जाता जाता दसऱ्याच्या दिवशी सोने म्हणून आपट्याची पाने लुटण्याची पद्धत का आहे ते पाहू. एका पौराणिक कथेनुसार वरतंतू नावाच्या ऋषींकडे विद्या ग्रहण करणाऱ्या कौत्स नावाच्या शिष्याने विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर गुरुदक्षिणा काय द्यावी अशी विचारणा केली. प्रथम गुरूंनी त्याला नकार दिला पण कौत्स आपला हट्ट सोडेना म्हणून गुरूंनी त्याची परीक्षा घेण्याचे ठरवले. ' मी तुला १४ विद्या शिकवल्या आहेत त्यामुळे १४ कोटी सुवर्णमुद्रा मला दे ' असे गुरुजींनी सांगितले. कौत्स रघुराजाकडे गेला आणि याचना केली परंतु राजाने नुकताच विश्वजित यज्ञ केला असल्याने खजिना रिता झाला होता , दारी आलेल्या याचकाला विन्मुख कसे पाठवायचे म्हणून राजाने तीन दिवसांची मुदत मागून घेतली आणि कुबेराला सुवर्णमुद्रा देण्याची विनंती केली. कुबेराकडून आपली मागणी पूर्ण होत नाही असे पाहून रघुराजाने इंद्रावर

स्वारी करण्याचे ठरवले. इंद्राला रघुराजाचा पराक्रम माहित होता म्हणून इंद्राने कुबेराला , रघुराजाच्या नगरीच्या वेशीवर असणाऱ्या आपट्याच्या झाडावर सुवर्ण मुद्रांचा पाऊस पाडण्याची आज्ञा दिली. राजाने त्या मुद्रा पहिल्या आणि कौत्साला त्या घेण्यास सांगितले मात्र कौत्सा ने गुरू दक्षिणे साठी आवश्यक तेवढ्याच मुद्रा घेतल्या आणि मग राजाने उरलेल्या मुद्रा आपल्या प्रजाजनांना वाटून टाकल्या, तेव्हा पासून दसऱ्याला आपट्याची पाने सोने म्हणून वाटण्याची पद्धत रूढ झाली. या कथेतून सुद्धा दातृत्व ,पराक्रम , आदर , मोहावर मिळवलेला विजय अशा दशेंद्रियांवर विजय मिळवण्याचाच संदेश मिळतो. म्हणून दाशरथी श्रीरामांचा आदर्श ठेवून , पराक्रम गाजवण्याच ध्येय बाळगून एकमेकांमध्ये प्रेम पूर्वक, सौहार्दाचे वातावरण निर्माण करणे हाच खरा दसऱ्याच्या दिवसाचा संकल्प आहे. दसऱ्याच्या दिवसाचे महत्त्व सर्वसामान्य लक्षात यावे म्हणून हा मजकूर इथे लिहिला आहे

दसऱ्याला रात्री श्रीदेवी भराडणी मंदिरामध्ये आरतीसाठी उपस्थिती जवळपास तीस पार करून झाली होती. उपस्थिती मध्ये दिवसागणिक वाढ झाल्यामुळे मंदिर अपुरे वाटू लागले. श्रीदेवीच्या मंदिरात संध्याकाळी ड्रॉपबॉक्स उघडून त्यातील जमा रक्कम मोजून एक जमापावती करण्यात आली. तसेच पावती पुस्तकाद्वारे मिळालेली रक्कम जमा करण्यात आली. जवळपास वीस हजार जमा झाले. श्री.नरेश कांबळी, श्री.अंकुश कांबळी, श्री.विश्वनाथ कांबळी, श्री.महेश कांबळी,श्री.अमोल कांबळी श्री.विजय परमार यांच्या उपस्थितीत हे मोजदादीचे काम झाले.. नेहमीप्रमाणे इशारतीचे ढोल वाजले. .इशारत, धुपारत झाली, पंचारत पाजळली. समाप्तीचे माझे 'दोन शब्द' झाले. श्रीसूक्ताचे पठण आणि उपस्थित अडिचशे पावणेतीनशेंचे श्रवण. धार्मिक कार्यक्रम करायचा असे गेल्या वर्षी ठरले होते परंतु ते प्रत्यक्षात घडले नाही म्हणून केलेली ही उपाययोजना होती. नेहमीप्रमाणे मोजक्याच आरती झाल्या. नेहमीप्रमाणे ते श्री.महेश कांबळी यांचे देवीकडे गऱ्हाणे झाले. चूकभूल माफ कर, हातापाया खाली संभाळ कर...हे ते सांगणे झाले. सर्वांना प्रसादाचे वाटप झाले.'जिलेबीप्रसादा'चे वाटप झाले. सौ.स्वराली नाटेकर , श्री भैराई देवी प्रासादिक भजन मंडळ,मोंड, गावठाण वाडी, देवगड यांचे भजन होते. उत्सवाची सांगता या भजनाने झाली.

आजरोजी सकाळी श्री.महेश कांबळी व श्री.मनोज परमार देवीचे दास्तान पोहोचते करून गेले. अशा पद्धतीने नवरात्र व्यवस्थित विनातक्रार विनाव्यत्यय पार पडला. या नवरात्र उत्सवामध्ये दोन तीन इनोव्हेटिव्ह गोष्टी घडल्या आणि ज्या परिणाम कारक होत्या. स्त्रियांची उपस्थिती लक्षणीय वाढली व त्या ही पुरुषमंडळीसोबत सोबत आरतीसाठी उपस्थित राहू लागल्या. यापूर्वी मंदिरातील देवीच्या बाजूच्या काहीशा अंधाऱ्या जागेत सर्व स्त्रिया आरतीसाठी उभ्या रहात असत. हे या वर्षीचे इनोव्हेशन झाले. दुसरे इनोव्हेटिव्ह म्हणजे देवीचा पंचारतधारी गांवकर पुजारी तयार सोवळ्यात आला. पूर्वी हे सर्व नेहमीच्या 'हाफपॅन्ट' मध्ये चालून जात होते. हे दुसरे इनोव्हेशन झाले. देणगीपावती पुस्तक ठेवून देणगी जमा होऊ लागली आणि गुप्त, ऐच्छिक देणगीसाठी 'ड्रॉपबॉक्स' ही संकल्पना पुढे आली.याबाबत कुणाच्याही मनात हरकतीचे विचार आले नाहीत. हे ते महत्त्वाचे इनोव्हेटिव्ह होते आणि ते सर्वात महत्त्वाचे होते.

**●जनरल मिटिंग कार्तिकी उत्सवापूर्वीची–**

सोमवार दि.३१ ऑक्टोबर २०२२ रोजी संध्याकाळी ७.०० वाजता सर्व खोतमंडळी,सेवेकरी, मानकरी, देणगीदार, हितचिंतक आदींना नोटीस काढून जनरल मिटिंग घेण्यात आली.या जनरल मिटिंग मध्ये एकूण ७५ उपस्थितांच्या नाव सह्या आहेत.बुधवार दि.२ नोव्हेंबर२०२२ रोजीच्या निशाणकाठी स्थापना समारंभाची माहिती आणि नियोजन सांगण्यात आले.तसेच गुरूवार दि.०३ नोव्हेंबर २०२२ ते सोमवार दि.७ नोव्हेंबर २०२२ या पाच दिवसांच्या कार्तिकी उत्सवामधील कार्यक्रमाची माहिती आणि एकूण नियोजन सांगण्यात आले. मिटिंग झाल्यावर उपस्थित सर्वांना लाडू आणि चहापान देण्यात आले.उपस्थितांना वार्षिक अहवालाची प्रत देण्यात आली.

**●कार्तिकी उत्सवाची निमंत्रणपत्रिका –**

कार्तिकोत्सव सुरू होण्यापूर्वी 'एक दिवस' म्हणजे बुधवार दिनांक ०२ नोव्हेंबर २०२२ रोजी 'निशाणकाठी स्थापना' कार्यक्रम होता..सुमारे ७७ वर्षांनंतर असा कार्यक्रम होणार होता. ''फाल्गुन शुद्ध १० शके १८६६ म्हणजे सन १९४५'' मध्ये पूर्वीची निशाणकाठी स्थापित झालेली होती. एकूण ७७ उन्हाळे-पावसाळे सोसून जीर्ण झालेल्या

निशाणकाठीचे विसर्जन करून त्या जागी नवीन निशाणकाठीची स्थापना सर्वांच्या उपस्थितीत करायची होती. श्रीदेवी मुहूर्ताई मंदिराजवळ श्री. नरेश कांबळींच्या घरानजीक नवीन निशाणकाठीचे सुतारकाम सुरू करून ते अंतिम टप्प्यात होते.येथून ही नवीन निशाणकाठी वाजतगाजत मिरवणूकीने श्रीदेवाच्या मंदिरात आणायची होती.यावेळी लहानथोर, आबालवृद्ध, स्त्री पुरुष, पुणेमुंबईकर मंडळी, आदी सर्वांना या दिवशी उपस्थित रहाता यावे म्हणून आगाऊ आमंत्रण दिले होते. 'निशाणकाठी स्थापने'च्या कार्यात सर्व साक्षीदार ठरावे, म्हणून सर्वांची उपस्थिती महत्वाची होती. बारा खोतांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम होणार होता त्यामुळे. सर्वांची उपस्थिती आवश्यक होती.स्वतंत्र आमंत्रण पत्रिका छापून घेतली होती. आपापल्या मित्रपरिवाराला, नातेवाईक मंडळींना, आप्तेष्टांना निशाणीकाठीचे आमंत्रण देता यावे म्हणून हे सर्व स्पेशल आमंत्रण पत्रिकेचे प्रयोजन केले होते. कार्तिकी उत्सवाबाबतची कार्यक्रमपत्रिका शेअर केली होती.. यामध्ये शुक्रवार दिनांक ०४ नोव्हेंबर २०२२ रोजी रात्री ८.०० वाजता तुळशी विवाह समारंभ होता. तसेच कीर्तनासाठी पखवाज वादक श्री.प्रथमेश तारळकर येणार होते. तसेच दि.०६ नोव्हेंबरच्या शोभायात्रेला तेली समाजाचे महाराष्ट्र प्रान्ताचे नेतृत्व भूषविणारे अनेक मान्यवर उपस्थित रहाणार होते. लोटांगण, पालखीला खांदा मारणाऱ्या उपासकरी भाविकांना दिवसभराचा उपास श्रीदेवाचा प्रसाद घेऊन सोडता येईल, अशी सोय केली होती, जेणेकरून घराकडून जेवणाचे डबे आणण्याची गरज पडणार नाही. हा एक कार्यक्रमातील भाग होता. रोज उपस्थित सर्व भाविक भक्तांना 'गरमागरम चहा' मिळण्याची सोय देवस्थान कडून केलेली होती. श्रीदेव अंजनेश्वर देवस्थान ट्रस्टला दि.१७ नोव्हेंबर २०२२ रोजी ७० वर्षे पूर्ण होणार आहेत.ट्रस्टचा अमृतमहोत्सव सन २०२७ मध्ये साजरा होणार आहे. त्यावेळी श्रीदेवासाठी चांदीची पालखी,चांदीचे सिंहासन व चांदीची प्रभावळ करायचा संकल्प केलेला होता. निशाण काठीचा संकल्प दि.०२ नोव्हेंबर रोजी पूर्णत्वास जाणार होते. या संकल्पामध्ये सर्वांचे योगदान असावे म्हणून 'अगदी एक रूपया' पासून देणगी स्वीकारण्याचे धोरण होते. दानपेट्यांमार्फत आपला ' एक रूपया' या कामी लावता येणार होता...एक रूपया पासून पुढे केवढीही रक्कम दानपेटी मार्फत मिळाल्यास देवस्थानला व देणाऱ्या भाविक भक्तांना टॅक्स भरावा लागणार नाही, हे सांगायचे होते. तसेच 'क्यूआर कोड'च्या सहाय्याने यासाठीची रक्कम थेटपणे देवस्थान बँक खात्याला ट्रान्स्फर करता येणार हे सांगायचे होते म्हणून कार्यक्रम पत्रिकेचे प्रयोजन होते तसेच चांदीच्या विटा देऊन ह्या संकल्पामध्ये आपले योगदान नोंदवता यावे म्हणून काही मार्गदर्शन केले होते. उत्सवामध्ये चांदीचा स्वीकार केला जाणार होता म्हणून सर्व काही छापून घेतले होते.

**● 'निशाणकाठी पूजन' एक सुवर्णाक्षरांनी नोंदण्यासारखा कार्यक्रम –**

बुधवार दिनांक २ नोव्हेंबर २०२२.म्हणजे 'निशाणकाठी स्थापना दिवस'. निशाणकाठी स्थापनेसाठी यजमान म्हणून 'श्रीदेवाचे सोनार' श्री.दत्ताराम जगन्नाथ पाटणकर व सौ.दिपीका दत्ताराम पाटणकर हे होते. सर्वश्री श्री. प्रसाद फडके, कुर्धे, श्री.विजय भुस्कुटे, मिठगवाणे, श्री.दिपक ताम्हनकर, कुवेशी आणि श्री.अमित निमकर या ब्राह्मणांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. सोबत श्री. मधू जोशी हे देवाचे जोशी म्हणून तर श्री.प्रकाश परांजपे सोबतीला होते..धार्मिक कार्यक्रम ठिक १२.३० वाजता पूर्ण झाला. त्यानंतर निशाणाचे अवरोहण आरोहण झाले. सर्व भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. निशाणकाठीचे आरोहण आणि अवरोहण श्री.रमेश भगवान काजवे यांच्या कल्पकतेने सुलभ झाले. अंजनेश्वर युट्यूब चॅनलला निशाणीकाठीच्या स्थापनेच्या वेळचे व्हिडिओ शेअर केलेले आहेत. तसेच या बाबत अंजनेश्वर फेसबुक पेजला सर्व काही सांगितले गेले आहे.

**●श्री.उदय कांबळे या शिक्षकाने त्रयस्थपणे केलेले समालोचन –**

मित्रांनो, श्री. उदय कांबळे, यांनी लिहिलेले समालोचन इथे शेअर केले आहे. एका शिक्षकाने शिक्षकाच्या नजरेतून केलेले समालोचन आहे.

'अलौकिक आणि अभूतपूर्व सोहळा' सोहळा निशाणकाठीचा..

अनंतकोटी ब्रह्मांडनायक श्री देव अंजनेश्वर महाराज की जय..ओम नमः शिवाय या मंत्रघोषानी अवघी मिठगवाणेपुरी दुमदुमली ..निमित्त होते ७७ वर्षानंतर श्री देव अंजनेश्वर मंदिरातील बदलल्या जाणाऱ्या निशाणकाठीचे. कार्तिक

शके १९४४ च्या कार्तिक नवमीला म्हणजेच बुधवार दि २ नोव्हेंबर २०२२ रोजी मोठ्या उत्साहात, भक्तीभावात आणि विधिवत पद्धतीने ही निशाण काठी मंदिरात स्थापित करण्यात आली.या ऐतिहासिक सोहळ्यासाठी संपूर्ण गाव रांगोळी आणि फुलांनी सजलेले होते तर आबालवृद्धांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता, कारण हे सर्वजण एका ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार बनणार होते. देवाचे मानकरी नरेश कांबळी यांच्या भव्य अंगणात नवीन निशाणकाठी फुलांनी सजवून ठेवण्यात आली होती तर दुसरीकडे कांचनवाडीच्या रायकर, भातडे, मेस्त्री आदी मंडळींनी आपल्या ढोलवादनाने वातावरणात वेगळाच जोश भरला होता .१० वाजता पंचक्रोशीतील असंख्य भाविक कांबळी यांच्या घराजवळ जमा झाले.सुवासिनींनी निशाण काठीचे औक्षण आणि पूजन केले आणि लगेचच श्री देव अंजनेश्वराच्या जयघोषात सेवेकरी आणि मानकरी मंडळींनी निशाणकाठी आपल्या खांद्यावर घेतली जणू निशाणकाठीच्या सेवेचे व्रतच आपल्या खांद्यावर घेतले आहे. मानकऱ्यांच्या खांद्यावर विराजमान झालेली ही निशाणकाठी मोठया रुबाबात मंदिराकडे चालली जणू तिलाही देवाच्या भेटीची ओढ लागली होती. जात, धर्म, पंथ सारे सारे भेद विसरून मंडळी श्री देवअंजनेश्वराच्या मंदिराकडे निघाली. आज सर्वजण एकाच रसात बुडाले होते तो रस होता भक्तीचा.निशाणकाठीचा संपूर्ण मार्ग रांगोळीने सुशोभित करण्यात आला होता अनेकांचे मोबाईल, कॅमेरे हा अलौकीक क्षण टिपण्यासाठी पुढे सरसावले होते. मंदिरात पोहचताच बुधवार सन १९४६ रोजी उभारलेल्या निशाणकाठीची विधिवत पूजा करून तिला खाली घेण्यात आले आणि ओम नमः शिवायच्या मंत्रोच्चारात विधिवत पूजा करून देवत्व प्राप्त झालेली नवीन निशाणकाठी देवाचे सोनार पाटणकर, देवाचे जोशी मधुकर जोशी सर्व सेवेकरी, मानकरी, खोत मंडळी, लिंगायत मंडळी, देवस्थानचे विश्वस्त आणि हजारो भाविकांच्या उपस्थितीत मंदिराच्या आवारात उभी करण्यात आली आणि संपूर्ण पिढी एका ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार बनलेली ऐतिहासिक पिढी बनली. आजच्या या पिढीला या अलौकिक क्षणाचे साक्षीदार बनण्याची संधी दिली ती, देवस्थानचे प्रमुख विश्वस्त मा श्री डॉ मिलिंद देसाई यांनी .त्यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे , दूरदृष्टीमुळे , आणि देवस्थानच्या प्रत्येक कार्यक्रमात लोकांना जास्तीतजास्त सहभागी करून घेण्याची तळमळ यामुळे आजचा हा सुवर्णक्षण सर्वांना 'याचि देही याचि डोळा' पाहता आला. निशाणकाठीच्या स्थापनेनंतर डॉ. देसाई यांनी भाविकांना मार्गदर्शन केले तसेच ३ तारखेपासून सुरू होणाऱ्या कार्तिकोत्सवाचे निमंत्रण दिले. शेवटी महाप्रसादानंतर या अलौकिक कार्यक्रमाची सांगता झाली.

**● कार्तिकी उत्सवातील दुसरा दिवस-**

कार्तिकी उत्सवाचा दुसरा दिवस महत्वाचा होता. श्री.पंकज देसाई,फलटण, सपत्नीक तुळशीविवाह समारंभाला यजमान म्हणून बसवीले होते. तुळशी विवाह समारंभाला लक्षणीय उपस्थिती होती. श्री.मधूभाऊ जोशी, देवाचे जोशीउपाध्ये व श्री. प्रकाश परांजपे, परांजपेउपाध्ये म्हणून उपस्थित होते. आरतीच्या वेळी कै.जयंत शंकर जोशी, कै.राजाराम मसुरकर, कै.सखाराम मसुरकर, कै.संतोष मसुरकर, कै.प्रशांत भडेकर, कै. शशिकांत जोशी, कै. दिनकर देसाई, कै.भीमाताई परीट, कै.शशिकांत शंकर जोशी यांच्या कार्याचा उल्लेख करून श्रध्दासुमने अर्पण केली होती. श्री. संतोष बाणे, सीईओ, श्रमिक पतपेढी साखर कोंबे यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला होता. रु.५०००/- चहापानासाठी देणगी दिली म्हणून तो सत्कार केला होता. केवळ प्रतिकात्मक सत्कार होता. तसेच पहिल्या दिवशीचे चहापान उपलब्ध करून देणारे देणगीदार श्री.अनिवृध्द जोशी पुणे यांचा उल्लेख केला होता.त्याबरोबर श्री.उमर नाईक यांचा उल्लेख केला होता. तो अशासाठी की पहिल्या दिवशीच्या चहापानाला रु.५००० ची देणगी श्री.उमर नाईक यांनी पुण्याचे श्री. अनिरुद्ध जोशी यांचेकडे संपर्क साधून मिळवली होती आणि म्हणून तो उल्लेख महत्वाचा होता. ह.भ.प.श्री.कैलास खरे यांचे 'राका कुंभाराचे चरित्र आख्यान' होते. साथीला श्री.उदय गोखलेसर ऑर्गन साथीसाठी आणि श्री.अमेय हर्डीकर तबला साथीसाठी होते. कार्तिकी उत्सवामधील पहिल्या दिवशी 'मच्छिंद्रनाथ गोरक्षनाथ' आख्यान सुध्दा रंजक झाले होते. यावेळी पखवाज वादक श्री.प्रथमेश तारळकर ह्याची पखवाजसाथ कीर्तनासाठी नव्याने होती. नाट्य संगीताने सजलेले कीर्तन होते. श्रोत्यांची उपस्थिती लक्षणीय होती. 'ग्वाल्हेर नंतर अशी लक्षणीय उपस्थिती अंजनेश्वर मंदिरात पाहायला मिळाली', हा ह.भ.प.कैलासबुवा खरेंनी

केलेला उल्लेख सुखावह वाटला आणि तितकाच मनस्वी वाटला. उत्सवाचा दुसरा दिवस रात्री साडेबाराला समाप्त झाला होता.

**●सत्कार समारंभ–**

उत्सवाच्या तिसऱ्या दिवशी विद्यार्थी सत्कार करण्यात आला. दहावी मध्ये साने गुरुजी विद्या मंदीर जानशी शाळेचे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्यांचा रक्कम रुपये १०००, ड्रेस सेट, फोटो, श्रीफळ देवून गौरव करण्यात आला. हा सत्कार देवस्थानचे लेखापरिक्षक श्री. निलेश पाटणकर व सौ.नम्रता निलेश पाटणकर यांच्या हस्ते करण्यात आला. तर या दोहोंचा सत्कार देवस्थान कडून करण्यात आला. सन २००७/०८ पासून ऑडिट अकाऊंटींगचे कामकाज केले व ते सर्व निःशुल्क, कोणतीही फी न घेता केले म्हणून त्यांचा तो सत्कार होता. तसेच देवस्थानची नोंदणी आयकर खात्याकडे रिलीजीअस ट्रस्ट म्हणून करण्यासाठी आणि करमाफी मिळवण्यासाठीचे सर्टिफिकेट मिळवून देण्यासाठी जो प्रयत्न त्यांच्या कडून झाला त्यासाठी तो सत्कार होता. श्री.निलेशजींचा शाल श्रीफळ देवून आणि सौ.नम्रता निलेश यांचा साडी खण देऊन सत्कार करण्यात आला. श्री.सदानंद तुकाराम लिंगायत यांच्या हस्ते सत्कार झाला.

**●लघुरुद्र स्वाहाकार–**

कार्तिकी उत्सवामध्ये रविवार दिनांक ०६.११.२०२२ रोजी लघुरुद्र स्वाहाकार झाला. या कार्तिकी उत्सवामधील लघुरूद्र स्वाहाकाराला दोन यजमान उपलब्ध झाले होते..श्री.निखिल दामले. हे देसाई कुटुंबीयांचे 'जावई' यजमान म्हणून लाभले होते. कै. नागेश वामन देसाई यांच्या कन्या सौ. चारू यांचे ते मिस्टर. कै.वामन सिताराम देसाई कै.सिताराम बाळकृष्ण देसाई यांच्या वंशव्यवस्थेमधील सौ.चारू दामले या 'माहेरवाशीण'. ट्रस्टचे संस्थापक कै.गणेश बाळकृष्ण देसाई यांच्या कुटुंबातील वंशवारस सौ.चारू दामले व त्यांचे मिस्टर श्री.निखिल दामले या दोहोंचा परिचय नीटपणे लिहून ठेवला की संभ्रम होत नाही, स्पष्टता येते. एखाद्या व्यक्तीला धार्मिक कार्यक्रमाचे यजमानपद देताना काहीतरी संदर्भ असावा लागतो. आणि म्हणून हे संदर्भाचे लिखाण करून ठेवले पाहिजे. यजमान म्हणून श्री.निखिल दामले व सौ.चारू दामले हे यजमान म्हणून लाभले होते. सौ.चारू दामले म्हणजे कै.नागेश वामन देसाई यांची द्वितीय कन्या. कै.वामन सिताराम देसाई यांची नात. मिठगवाण्याचे जावई म्हणून तो यजमानपदाचा मान मिळाला होता. सोबत श्री.गजानन त्रिंबक देसाई सपत्नीक सहयजमान म्हणून होते.अग्निस्थापनेसाठी म्हणून दुसरे यजमान आवश्यक होते. वैद्यराज कै. दत्तात्रय त्रिंबक देसाई यांचे पणतू (वैद्यराज कै.दत्तात्रय त्रिंबक देसाई यांनी सावंतवाडी संस्थानचे राजे भोसले यांच्या कडून सध्याची नंदी देवतेची मूर्ती घडवून मिळवली होती).

यज्ञसमारंभाला राजापूर, रत्नागिरी कुर्धेचे ब्राह्मण बोलावले होते. सर्वश्री श्री. प्रसाद फडके, जयंतराव अभ्यंकर, प्रथमेश फडके, शरदचंद्र नामजोशी, विश्वास परांजपे, संदीप जोशी,किरण जोशी, प्रदीप रायकर, ओमकार पाध्ये, मिलिंद बोरवणकर, अभिजित पाध्ये, प्रशांत शेवडे, स्थानिकांमधील दिपक ताम्हनकर, अमित निमकर, विजय भुस्कुटे आणि मधू जोशी. एकूण ब्राह्मण १६ होते. यज्ञसमारंभापूर्वी पुण्याहवाचन झाले. श्री. पंकज देसाई सपत्नीक हजर होते. त्यांनी मुख्य यजमानांना आहेर दिला.लघुरूद्र पठण आणि एकाचे हवन असा तो कार्यक्रम होता.तिळतूप हवन द्रव्य होते.पूर्णाहुती ठिक १ वाजता झाली. रत्नागिरीचे श्री.जयंतराव अभ्यंकर यांनी यज्ञाची माहिती, एकूण झालेला धार्मिक कार्यक्रम यांची माहिती, आणि फलश्रुती विस्ताराने सांगितली. जवळपास ४००/५०० भाविक भक्तांची उपस्थिती होती. सर्वांना यज्ञप्रसादाचे वाटप करण्यात आले. दुपारी दोन वाजता कार्यक्रमाची सांगता झाली.मसालेभात शिरा मूद आणि सोबत लोणचे, चटणी देण्यात आले.

**● 'कार्तिकोत्सवातील दीपोत्सव' 'शोभायात्रा '**

सन २०२२ मधील कार्तिकोत्सवातील चौथा दिवस खऱ्या अर्थाने तेली समाज बांधवांचा ठरला. रात्रीची शोभायात्रा अजूनही स्मृतीपटलावरून बाजूला सरत नाही. ५०० मशालींचा कार्यक्रम कायम स्मरणात राहील असा झाला..मनामनात वर्षभर प्रकाश राहील असा हा 'प्रकाश सोहळा' सर्वत्र 'तेलीयांचा प्रकाश' होता. कडूतेलाची

रोषणाई चिरंतन स्मरणात राहील असे झाले.पुन्हा असे कधी होईल ते माहित नाही. परंतु रविवार ०६ नोव्हेंबर २०२२ रोजी तेलीयांच्या प्रकाशात मिठगवाणे न्हाऊन निघाले. हे मिठगवाणे गावाच्या इतिहासात निश्चितपणे नोंदवले जाईल. त्याबद्दल गावातील समस्त तेली बांधवांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. 'असे कधीही झालेले नव्हते, असे हे पुन्हा पुन्हा व्हावे असे वाटते आहे. काहीतरी भव्यदिव्य झाल्यासारखे वाटले म्हणून हे 'दोन शब्द' लिहावेसे वाटत आहेत. यापूर्वी कधीही असा 'दिपोत्सव' कुणी पाहिलेला नव्हता म्हणून अक्षरबद्ध करून सारे सारे उजेडी आणून ठेवले पाहिजे आणि म्हणून हा 'लेखनदस्त' करून ठेवला आहे. रविवार दिनांक ०६ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या रात्रीला अंजनेश्वरचा परिसर ज्यांनी उजळून टाकला त्या समस्त तेलीयांना सलाम नव्हे तर साष्टांग दंडवत घालण्यासाठी म्हणून हे 'लिखाण' केले आहे. माता भगिनी अगदी सैराट होऊन त्या प्रकाशाच्या खेळामध्ये सहभागी झाल्या होत्या म्हणून त्यांना मनस्वी सलाम करण्यासाठी हे माझे 'शब्दांचे बुडबुडे'इथे उठवत आहे. ५०० मशाली तब्बल दोन तास हाती धरून तो प्रकाश सोहळा निर्विघ्नपणे पार पडला त्या सर्व स्थानिक तेली समाज पुढाऱ्यांना अगदी 'मानाचा मुजरा'केला पाहिजे.मशाल तयार करणे, जवळपास ५००/५५० मशाली तयार करणे इतकेच सोपे नव्हते. कताई केलेले लाकूड, त्यावर स्क्रूच्या सहाय्याने स्टील ग्लासची जोडणी, लिकेज होवू नये म्हणून एमसील, प्रत्येक मशालीमध्ये माजरपाठ कापडाचा बोळा, त्यात जाळण्यासाठी कडूतेल पाहिजे म्हणून केलेली कडूतेलाची जमवाजमव, कडूतेल प्रत्येक मशालीमध्ये नीटपणे ओतणारे व्हॉलेंटीयर्स, आणि ह्या मशाली जवळपास दोन तीनतास हाती धरणारे तेली समाज बांधव, माता भगिनी आणि पुरुष आणि हे सर्व शिस्तबद्ध संचलन ढोल ताशांच्या गजरात, पेटत्या मशाली घेऊन हळूवार चालणे, स्त्री असो अथवा पुरुष असो सारे सारे पारंपरिक वेशभूषेमध्ये. त्यामध्ये 'नृत्याविष्कार' हे दिसते इतके सोपे नव्हते आणि नाही. शोभायात्रेच्या मार्गामध्ये गावातील मुस्लिम समाज बांधवांनी 'शक्करपाणी' वाटप करून जे स्वागत केले ते सुद्धा तितकेच विलक्षण होते आणि उल्लेखनीय होते. अंजनेश्वर दरबारी आल्यानंतर नेहमीच्या उत्सवगर्दी मध्ये हे सर्व 'पेटते' सामावले होते हे ते विशेष होते.पेटत्या मशालींच्या प्रकाशात श्रीदेव अंजनेश्वर महाराज पालखी प्रदक्षिणेसाठी फिरले, फक्त तेलींयाच्या गीतांचा आस्वाद घेतला. 'करावके साँग' फक्त तेली बांधवाचे गीतगायन झाले होते आणि हे सर्व नेहमीच्या उत्सव गर्दीमध्ये निर्विघ्नपणे पार पडले.श्री.कर्डिले, श्री.शेलार यासारखे तेली समाजाचे पुढारी येथे आले होते. ते मनोमन खूष होऊन गेले होते.समस्त तेली बांधवांनी श्री देवाच्या पालखी सिंहासनासाठी एक किलो चांदीची रक्कम रू.६१ हजार देवस्थानकडे अर्पण केली. तर श्री देवी भराडणी मंदिरासाठी रू.१० हजारची देणगी दिली. सोबत दोन तीन तेली बांधवांनी वैयक्तिकरित्या आपापली चांदी पालखी सिंहासनासाठी देवस्थान कडे सुपुर्त केली. वयाची ८५ पार केलेले 'श्री.श्रीधरबाबू पावसकर शेवटपर्यंत थकले नाहीत. श्री.मधुकर गोपाळ दमले नाहीत की श्री.सितारामआप्पा डगमगले नाहीत. नवीनरक्ताचे तेली समाज बांधव तर सैराट झाले होते. त्यामध्ये माता भगिनी ह्या तर त्यापुढे होऊन गेल्या होत्या. प्रत्येकात 'संताजी' भिनला होता.म्हणून हे शक्य झाले. अशक्य ते शक्य झाले. तेलीबांधवांनी 'करून दाखवले!!!' श्री. गणेश श्रीधर असो की श्री.प्रकाश श्रीधर असो या दोहोंनी सर्वांना सोबत घेऊन अपार मेहनत घेतली. श्री.सुनील माळींनी ड्रोन शुटिंग करून त्या दिवशीचे सर्व विलोभनीय दृश्य सातासमुद्रापार नेले.दै.प्रहार,लोकमत, दै. तरुण भारत आदी दैनिकांनी या कार्यक्रमाची ठळकपणे दखल घेतली.मित्रांनो, कौतुक केले नाही तर श्रम वाया जातात आणि म्हणून हे कौतुकाचे दोन शब्द इथे अर्पण केले आहेत. सोमवार १५ ऑगस्ट २०२२ रोजी श्रावण दिंडी माडबनच्या बांदेश्वर मंदिराकडे जात असताना महामेरीवाडीच्या सार्वजनिक विहिरीवर 'निमंत्रणा'चे पत्र दिले होते. तत्पूर्वी थोडीशी प्राथमिक चर्चा श्री.श्रीधरकाकांसोबत झाली होती. १ सप्टेंबर रोजी म्हणजे ऋषीपंचमीच्या दिवशी महामेरीवाडीच्या सार्वजनिक विहिरीवर आणि सडेवाडी येथील तेली समाजसभागृहामध्ये सर्व तेली ग्रामस्थांशी विस्ताराने बोलणे झाले होते'शोभायात्रे'चे स्क्रिप्ट माझे असले तरी त्यांचे डायरेक्टर, गीतकार, संगीतकार,नेपथ्य, कलाकार सारें सारे तेली समाजातील लहान थोरांचे होते. त्यामुळे या शोभायात्रेचे 'संपूर्ण श्रेय' आणि त्याचे 'संपूर्ण पुण्य' हे येथील संपूर्ण तेली समाजाला जाते. 'एक दिवस तेलीयांचा' हे प्रकाश नाट्य या शोभायात्रेतून पहायला मिळाले, अनुभवायला मिळाले. परमेश्वर या सर्वांना उदंड निरामय आयुष्य देवो.आणि 'शेठकर' हे नाव पुन्हा स्थापित करण्यासाठी बळकटी देवो.

**●कार्तिकी उत्सवामधील त्रिपुरारी पौर्णिमेचा दिवस–**

कार्तिकी उत्सवाची सांगता त्रिपुरारी पौर्णिमेला होणार होती.दुपारचा महाप्रसाद मिळणार होता.बलीपूजन कार्यक्रम सकाळी साडे दहा वाजता सुरू झाला.कै.भास्कर भोगले–देसाई यांचे पणतू श्री.उदय भोगले–देसाई हे बलीपूजन समारंभाचे यजमान होते. भाविक भक्तांचे भोजन त्यांच्या घरी होते. दुपारी १२.३० ते २.३० या वेळेत महाप्रसाद तथा समाराधनेचा भोजन कार्यक्रम अगदी शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.प्रत्येक भक्ताच्या तृप्ततेसाठीचा महाप्रसाद सर्वांना अगदी वेळेवर मिळाला होता. रात्री ८.०० वा.त्रिपूरपूजन तथा त्रिपूरपाजळणी झाली.रात्री ठिक साडे अकरा वाजता श्री देवाच्या सिंहासनाचा आगमन सोहळा पार पडला.श्री.विकास मेस्त्रीने घडवून दिलेल्या शिशवी लाकडाच्या सिंहासनामध्ये विराजमान झालेले श्री देव अंजनेश्वर महाराज लळीताच्या कीर्तनाला सभास्थानी आसनस्थ झाले होते. 'अनंत कोटी ब्रम्हांडनायक राजाधिराज भगवान श्री देव अंजनेश्वर..' शिसम लाकडात कोरीव काम केलेले सिंहासन त्रिपुरारी पौर्णिमेच्या रात्री ठिक १२ वाजता वाजतगाजत पुष्पवृष्टी स्वीकारत सभामंडपी पोहोचले होते..सुतारवाडीतील स्त्रीया हाती ओवाळणी घेवून सोबत होत्या..कांबळी काजवे मंडळींनी हे सिंहासन वाजतगाजत सभामंडपात आणले. देवस्थानमार्फत श्री. विकास मेस्त्री यांचा सत्कार श्री. वसंतराव मोहिते यांचे शुभहस्ते करण्यात आला. शिसवी लाकडापासून घडवलेले सिंहासन मंदिरात मिरवणूकीने पोहोचते झाले होते ज्यावर चांदीच्या पत्र्याची चढाई केली जाणार आहे, त्या सिंहासनाचा आगमन सोहळा गावातील सुतार वंशजांचे उपस्थितीत पार पडला. कार्तिकी उत्सवामध्ये पौर्णिमेच्या रात्रीला सिंहासन छोटीशी मिरवणूक काढून आणण्यात आले. श्री.विकास मेस्त्रींने सुतारकाम केलेले होते व त्याला पॉलीशवर्क करण्यासाठी श्री.अनंत दिनकर मेस्त्रीं, श्री. समीर मेस्त्री यांची साथ मिळाली होती. शिसम लाकडात घडवलेले सिंहासन वर चांदीचापत्रा लागेपर्यंत श्रीदेव अंजनेश्वर या शिसवी सिंहासनामध्ये पुढील तीनचार वर्ष विराजमान होणार आहेत. एकदा वर चांदीचा पत्रा लागला की सुतारकी झाकोळली जाणार आहे. म्हणून किमान तीन चार वर्षे तरी घडवणाऱ्या कारागिरांना समाधान मिळेल. सर्व भाविक भक्तांना हे लाकडातील नक्षीकाम केलेले सिंहासन अनुभवता येईल. श्री.विकास मेस्त्री यांचे या कामामुळे प्रमोशन होईल. कलाकाराच्या कलेवर आपण सर्वांनी कौतुकाची झालर चढवली नाही तर कलाकाराच्या कलाकारीतेला साज चढत नाही..त्यामधला कलाकार रंजीस होतो. कौतुकाची थाप पडली की अवसान हत्तीचे येते आणि कलागुणांची नकळत वाढ होत जाते..३/४ वर्ष हे लाकडी सिंहासन दोन्ही उत्सवांचे वेळी लळीताचे किर्तनाचे वेळी उपयोगात येणार आहे.अंजनेश्वर या लाकडी शिसवी सिंहासनावर किमान ४/५ वर्ष तरी आसनस्थ होतील..हा आनंद आम्हा सर्वांना होईलच पण त्यापेक्षा जास्त त्या कारागीराला होईल ज्यांने त्याची घडावट केली आहे. 'चांदी अर्पणाचा' कार्यक्रम तेव्हाच पार पडला. ज्यांनी ज्यांनी श्रीदेवाच्या पालखी सिंहासनासाठी चांदी खरेदी केली होती चांदीच्या विटा खरेदी केल्या होत्या ,रोख रकमेच्या स्वरूपात अथवा चेक स्वरुपात ज्यांना चांदी द्यायची होती, त्यासाठीचा'अर्पण सोहळा' त्या वेळी पार पडला.दानपेट्यांमधून ज्यांना देवाच्या पालखी सिंहासनासाठी गुप्तदान द्यायचे होते, त्यांनी त्यांची रक्कम दानपेटीमध्येच अर्पण केली. सर्व उपासकरी मंडळींना 'देवाचा प्रसाद' मिळण्यासाठी नियोजन केले होते.देवाला भरभरून देण्याचा दिवस होता. लळीताच्या किर्तनातील 'तीर्थ चरणीचे शीतल आणि बेलपान' हाती पडण्याचा दिवस होता.

**●कार्तिकी उत्सवातील आकर्षण. चलचित्र–** ' श्री संत जगनाडे महाराज आणि कर्मसाधना..भक्तीसाधना' यांचा संगम, अशा आशयाचे चलचित्र होते. श्री.श्रीधर बाबु पावसकर तथा श्रीधरकाका यांच्या पुढाकाराने आणि संकल्पनेतून साकारलेले ते चलचित्र होते..तेली समाज बांधवांच्या सहकार्याने साकारलेले होते बाकी सर्व श्री श्रीधरकाका यांचेच होते.एक 'इनोव्हेटिव्ह' असे ते चलचित्र होते.

**● 'दानासाठी दानपेटी, त्याबद्दल सर्व काही' –**

भाविक भक्तांना अगदी सहजपणे दानाची रक्कम अर्पण करता यावी, श्रीदेवाला 'एक रूपया पासूनची देणगी' देता यावी, या हेतूने दानपेट्या मंदिरामध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.आपण दानपेटीमध्ये अर्पण केलेला 'एक रूपया' देवाच्या बँक खात्याला थेटपणे जमा होणार आहे. आणि हा अर्पण केलेला 'एक रूपया' देवस्थानच्या 'ऑडिट

अकाऊंटीग' मध्ये येणार आहे. श्रीदेवाच्या उत्सवातील महाप्रसादासाठी, धार्मिक कार्यक्रमांसाठी, श्रीदेवाच्या उत्सवांसाठी आणि चांदीची पालखी सिंहासन प्रभावळ करण्यासाठी हा दानपेटीतील निधी खर्च केला जाणार आहे. भक्ताला केवढीही मोठी रक्कम या दानपेटीतून देवासाठी देता येणार आहे. यासाठी कोणताही टॅक्स देवस्थान ट्रस्टला अथवा भक्ताला लागणार नाही.दानपेटीतील जमानिधी सेवेकरी मानकरी यांच्या उपस्थितीत राजापूर अर्बन बँकेच्या जानशीपठार शाखेचे बँकअधिकारी मोजदाद करतात व झालेला जमानिधी दानपेटी रजिस्टर मध्ये नोंद करून बँकेच्या मासिक मुदत ठेव योजनेचे सर्टिफिकेट करून जमा ठेवला जातो व त्यावरील व्याज देवस्थान बचत खात्याला घेतले जाते.वार्षिक ऑडिट अकाऊंटीग, टॅक्स ऑडिट होत असल्याने हा दानपेटीतील निधी अगदी सुरक्षित ठेवून त्याचा विनियोग सुध्दा केवळ वरील धार्मिक कामकाजासाठीच होणार आहे आणि होत आहे. 'दान देवासाठीच दिले जात असेल तर त्या दानाची सुरक्षा सुध्दा तितकीच महत्त्वाची आहे. तसेच भक्ताने दानपेटीमार्फत दिलेल्या दानाचा हिशोब देणे , हे सुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे. 'केवळ देवासाठीच' जे दान अर्पण करायचे असेल ते दानपेटीमध्येच अर्पण केले पाहिजे.

**●देवदिवाळीचा मुहूर्ताई चा उत्सव–**

देवदिवाळी हा सुद्धा एक महत्त्वाचा उत्सव असतो. श्रीदेवी मुहूर्ताईचा उत्सव असतो. देवीचे दास्तान अंजनेश्वर दरबारातून श्रीदेवीच्या मंदिरात जाते. चांदीचा मुखवटा, सोन्याची कर्णफुले.,बुगडी जोड, सोन्याची वज्रटीका,सतरा पुतळ्यांचे दोन हार, मंगळसूत्र,हरकोळ,वाघनखी,चांदीचा कमरपट्टा, चांदीची छत्री आदी..१० नवूवारी साड्या नग , ढोल आदी.. सर्व सर्व.. सोनार पाटणकर सर्व सोन्याचांदीचे घासकाम पॉलीश करतात..श्री.दत्ताराम जगन्नाथ ऊर्फ बाळू पाटणकर आज अनेक वर्षे हे कामकाज अगदी श्रद्धेने करीत आहेत. कोणतेही मानधन बिदागी न घेता करीत आहेत.गांवकर–कांबळी मंडळी देवीला नेसवतात.साजशृंगार चढवतात..आरती धुपारती होते. गांवकर लोक नैवेद्य दाखवतात. वर्षानुवर्षे हे चालू आहे हे विशेष आहे. कधीही खंड पडला नाही.

**●श्रीदेवी भराडणी कामकाज प्रगती –**

श्री देवी भराडणी मंदिरातील कामकाजाची प्रगती होत गेली. 'गती'ने प्रगती झाली श्री देवी भराडणीदेवीने खुद्द गतीने प्रगती करायचे ठरवले होते. विहीरीला पाणी लागले. १०/१२ फुटांवर पाणी लागले. भरपूर पाणी लागले. असे वाटते की हे पाणी कधीच आटणार नाही. इतके 'भर पूर' पाणी लागले. खोदाईचे काम श्री. प्रमोद उपळकर, प्रकाश उपळकर, पंकज मणचेकर,उदय नवलु ,शेखर भातडे,मंदार राणे,जगन्नाथ रायकर ,वैभव मढव,स्वप्निल राणे,मनोज लिंगायत, पांडुरंग तांबे यांनी विहिरीची खोदाई ध्यासाने केली. वय १८ ते २५ दर्म्यानचे हे सर्व होते. अगदी मजेमजेत हसतखेळत विहीर खोदाईचे काम केले. श्रीदेवीभराडणीलासुध्दा बहुदा पाझर फुटला असावा. पाणी इतके नजीक लागेल आणि इतके भरपूर लागेल असे वाटलेही नव्हते, पोरांनी श्रध्देनी घाव घातले होते म्हणून लवकर पाणी पडले. खूप आनंद झाला. हे सर्व श्रेय या सर्व नवतरुणांना जाते.केदार पाटणकर,पांडुरंग तांबे,कुळंबौशी राणे कंटुबातील नवीन मुले, कुळकर्णी,कांबळी , लिंगायतवाडीतील नवीन नवीन मुले यांनी अंगमेहनत करून हे पाणी पाडले.भराडणी प्रसन्न झाली. अखेरीस ३/४ फूट उंचीचे पाणीआले होते. विहीरीच्या तळाशी आरसीसी रिंगचे काम झाले. स्वप्निल सुतार, दिलीप वालकर यांनी आर सी सी काम केले. सहाय्याला नरेश कांबळी होतेच. श्री. प्रकाश राठोडने आपला जेसीबी आणि ट्रॅक्टर लावून आजूबाजूचा आवश्यक परिसर मातीगाळ काढून सपाट करून दिला. कमीत कमी ३५/४० हजार लागले असते ते जवळजवळ फुकटात झाले. भराडणीदेवीने करून घेतले असेच म्हणायचे. तटबंदी चे काम सुरू झाले. फाऊंडेशन, लेवलींग पूर्ण हाऊन जांभ्या दगडाची एक रांग संपूर्ण परिसराला फिरली. ४८ फूट रुंद आणि ७२ फूट लांब व सुमारे चार फूट उंच अशा आकाराची तटबंदी झाली. त्यावर सामान्यपणे १०/१० फूटावर लाईटचे गोल दिवे लावण्याची सोय झाली. तटबंदीला छोटेसे आरसीसी प्रवेशद्वार झाले. व या ४८ फूट रुंद आणि ७२ फूट लांब आकाराच्या क्षेत्राला दगडी फरस बसवणेचे काम झाले. अल्युमिनियम जाळीने बंदिस्त. दसऱ्याच्या दिवशी कामाच्या भूमीपूजनाचा सोपस्कार पार पाडला होता. पुढाकार घेतला आणि धाडसाने एखादे काम सुरू केले की परमेश्वर

पाठीमागे उभा रहातो तसेच काहीसे इथे घडताना दिसले' मिठगवाणे तेली समाज बांधवांनी श्री देवी भराडणी साठी रु. १० हजार ची देणगी दिली. श्री.रमेश आत्माराम उर्फ बाळू उपळकर यांनी रु.४० हजार देणगी दिली. डॉ.विराज गणेश गोखले, रु.२०००/-; रु.२०००/- सौ.अश्विनी अरुण जुवेकर; राजापूरचे माजी प्रान्ताधिकारी श्री.प्रविण खाडे रू.५००/-;.रु.५००/- दिलीपजी ठोसर; रु.१००१/- नंदकुमार विद्याधर मांजरेकर, रु.२०००/- आशुतोष वैद्य, ठाणे रु.५१०/- वसंत भास्कर मोहिते ; रु.५०१/- रुता निखील पाटणकर ; रु.११०१/-दिलीप मनोहर कुळकर्णी,; रु.५११/- भूषण शैलेश कुळकर्णी,; रु.५००/- कोमल बंडू राजापकर ,; रु.५५१/-पांडुरंग भिकाजी तांबे,रु.१०००/-यश विश्राम तांबे,; रु.५०१/- मनोहर ज.गोरे, कोल्हापूर; रु.२३४५/-प्रमोद प्रकाश उपळकर बंधू,; रु.२०००/- पंकज प्रकाश मणचेकर ,; रु.५०१/-पंढरीनाथ बापू अ. राणे,; रु.५०१/- किसन भिकाजी भोगले ; रु.५०१/- कार्तिक प्रकाश भोगले; रु.५०१/-देवीदास केशव रायकर,; रु.५०१/-मधुकर शंकर जोशी, आदींनी देणगी दिली. सर्व देणगी रक्कमेला अंजनेश्वर देवस्थानची देणगी पावती देण्यात आली. किर्द खतावणी मध्ये श्री देवी भराडणी मंदिर सुधारणा म्हणून स्पेशल हेड करून लेजर पेज स्वतंत्र करण्यात आले. जेणेकरून सर्व जमाखर्च स्वतंत्रपणे समजेल. दसऱ्याच्या दिवशी म्हणजे बुधवार ५ ऑक्टोबर २२ रोजी संध्याकाळी ठिक ४.०० वाजता भूमीपूजन आणि कामाची सुरूवात झाली. देवदिपावलीच्या दिवशी म्हणजे गुरुवार २४ नोव्हेंबर २०२२ रोजी झाली.श्री देवी भराडणी मंदिरासाठी दगडी तटबंदी, मंदिरासभोवताली दगडीफरस, पाण्यासाठी गोल विहीर तथा आड, २४०० जांभ्या चिऱ्यांचे काम झाले. प्रवेशद्वार म्हणून आरसीसी कमान, लोखंडी सरकता गेट दरवाजा, फुलझाडांची सोय, कोरफड, रूई, अडूळसा आदी औषधी झाडांची सोय, म्हाताऱ्यांना घटका दोनघटका सुशेगाद पाय ताणून बसता यावे म्हणून दोन सिमेंटची बाकड्यांची सोय, छोटासा पाण्याचा पंप, विहिरीवर बसेल इतक्याच आकाराची सिंटेक्स टाकी, त्यावर छोटेसे छप्पर, हातपाय धुऊन मंदिरात जाण्याची सोय झाली. तीन चार विजेचे बल्ब, टायमरच्या आदेशानुसार चालू बंद होणारे. दिवे चालू बंद करण्याची सोय नियमित वेळेवर व्हावी, संध्याकाळी ७.३० वा दिव्यांनी पेटले पाहिजे आणि सकाळी ५.३० वा. आपोआप विझले पाहिजे,अशी ती सोय झाली आहे. या मंदिराच्या बांधकामासाठी रु.५०१/- श्री.रूपेश श्रीपत गडगेकर, कसबा वाडी; रु.१०००/- श्री.मनोहर भिकाजी राणे,कुळंबौशीवाडी; श्री.१०००/-श्री.सतीष गंगाधर नाणारकर,कांचन वाडी, यांनी देणगी दिली.

सर्व कामकाज अंजनेश्वर देवस्थानमध्ये रक्कम जमा करून 'जमापावती' देऊन चालत आहे. खर्चाची व्हावचर बिले असतात. सर्व जमा आणि सर्व खर्च माझ्या एकट्याच्या सहीने होतों आहे. ट्रस्ट इन्स्ट्रुमेंट नुसार कामकाज करीत असल्यामुळे त्यामधील घालून दिलेले स्फेअर,कार्यकक्षा लक्षात घेऊन मी कामकाज करीत आहे. संदेह नसावा. रोजकिर्द आणि खतावणी मध्ये श्रीदेवी भराडणी मंदिर असा 'स्वतंत्र हेड' करून ठेवलेला आहे. माझ्या पश्चात जरी कुणी तोंड उचकटून बोलू लागला तरी ते दाखवता आले पाहिजे असे ते कामकाज करुन ठेवले आहे. बोलायला जागा ठेवलेली नाही. सर्व सर्व उजेडी ठेवले आहे. कधीही येऊन पहावे असे आहे. परमेश्वर तर नियमित पहात असतो फक्त तो 'बोलतो कमी' आणि 'करतो फार'. मित्रांनो, माझी सकाळ खऱ्या अर्थाने सातवाजता सुरू होते. अंजनेश्वर दरबारी ठेवलेल्या ज्ञानेश्वरीच्या एका पानाने आणि दासबोधाच्या अर्ध्या पानाने होते. पूर्ण पान वाचून हे समजणे आणि समजावणे अवघड जाते म्हणून दासबोधीचे अर्धेपान. आणि सायंकाळ नित्यपाठ हरिपाठात जाते. जे काही दिवसभरात कामकाज होईल ते 'त्या प्रकाशात' होते. मित्रांनो, बोलणारे बोलत रहातील,आपण करणारे करत राहूया. आणखीन ते काय बोलणार? भराडणी मंदिराचे कामकाज काम सामान्यपणे अंतिम टप्प्यात आले आहे.दगडी तटबंदीचे काम पूर्ण झाले आहे.मंदिरासभोवती चिऱ्यांची फरस बसवण्याचे काम पूर्ण झाले आहे.विहिरीची खोदाई करून दगडी चिऱ्यांनी विहिरीचे बांधकाम पूर्ण झाले आहे.एकूण सुमारे चार हजार जांभ्या चिऱ्यांचे बांधकाम जवळपास पूर्ण झाले आहे..थोडीथोडी फूलझाडे लागवड झाली आहे, थोडी औषधी वनस्पतीची लागवड झालेली आहे. विहिरीवर कौलारू छप्पराचे काम पूर्णत्वास गेले आहे. संध्याकाळी ठिक ७.०० वाजता लाईट लागावेत आणि सकाळी ठिक ५.०० वाजता ते आपोआप विझावेत म्हणून 'टायमर यंत्रणा' बसवून झाली आहे. मंदिराच्या समोरील बाजूला

आरसीसी प्रवेशद्वाराचे काम पूर्णत्वास गेले आहे. त्यापुढे मंदिरात प्रवेश करण्यासाठी दगडी पाखडीचे काम पूर्ण झाले आहे. मंदिर परिसर बंदिस्त असावा म्हणून नक्षीदार लोखंडी गेट बसवून झाला आहे. पायीच्या वहाणांनी, तथा चप्पलांनी मंदिराच्या बाहेरच थांबावे, म्हणून चप्पल स्टँड बांधून झाला आहे. काजऱ्याच्या झाडाला अर्धगोल दगडी पार बांधून घेतला आहे. आणि मंदिराचे समोरील आंजणीच्या झाडाला गोल पार बांधून झाला आहे. विहिरीवर अर्धा हॉर्स पॉवरचा पंप, पिण्याच्या पाण्याची टाकी आदी सर्व सुविधा झाल्या आहेत. हातपाय धुवून मंदिरात प्रवेशीत होण्यासाठी पायधुण्याची सोय हे सारे सारे काम झाले आहे. मंदिराची कौले उतरवून सर्व छप्पराच्या लाकूड सामानाचे पॉलीश पेपर ने घासकाम झाले आहे. सर्व लाकडाचे टिकाऊपण वाढावे म्हणून देसाई कोटींग अँड पेन्ट्सचे मालक श्री. नित्यानंद भोगले, औरंगाबाद यांनी वॉर्निश कोटींग पाठवून दिले होते.मंदिराचे काम सुरू असताना जमा झालेली देणगी पुढीलप्रमाणे–रु .१,२५,००१/–कै.सौ.गोदावरी महादेव आणि कै.श्री.महादेव(आप्पा) धोंडूशेठ पाटणकर मिठगवाणे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कुटुंबीयांकडून श्रीदेवी भराडणीसाठी मिळाले आहेत. रु. ५००/–सौ.लिलावती मंगेश राणे कुळंबौशीवाडी मिठगवाणे रु .४०,०००/– श्री.रमेश आत्माराम उपळकर,मिठगवाणे रु.५५५५/– कु.सिध्दी/समृध्दी दत्तप्रसाद कुळकर्णी, मिठगवाणे सर्व रक्कम श्री देव अंजनेश्वर बँक खात्याला जमा झाली आहे. जमा रक्कमेला देणगीची पावती दिली आहे. पैशाचा हिशोब वेळोवेळी प्रसिद्ध करून ठेवला की शंकेला जागा रहात नाहीं. श्रीदेवी भराडणी मंदिरामध्ये होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमांचे निमंत्रण सर्वांना व्हाटस् अप ग्रुप आणि फेसबुक माध्यमातून पाठवले होते. श्रीदेवी भराडणी मंदिरासाठी जमा झालेल्या देणगीचा तपशील दिला आहे आणि तेथे झालेल्या एकूण कामकाजाची माहिती अगदी थोडक्यात दिली आहे..उद्देश एवढाच की सर्व 'उजेडी' रहावे.माडबन निवासिनी श्रीदेवी भवानी(भगवती)' सुवर्णवाडी– कुळंबौशीमार्गे शुक्रवार दिनांक १७ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ठिक ७.०० देवी भराडणी मंदिरातील धार्मिक कार्यक्रमांमध्ये उपस्थित राहून त्यानंतर रात्रौ ठिक ९.०० वा. अंजनेश्वरच्या महाशिवरात्री उत्सवाला श्रीदेवी भराडणीला सोबत घेऊन हजेरी लावणार होती. तरी भाविक भक्तांनी या अपूर्व सोहळ्यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले होते.भराडणी मंदिर ते अंजनेश्वर मंदिर या पालखीमार्गावर सर्व माता भगीनींनी 'मार्गदीपक' दाखविण्यासाठी पणती/ निरांजन, ताम्हन/ताटली, तेल, वात आदीसह अगदी वेळेवर उपस्थित रहावे, यासाठी हे 'निमंत्रण' पुन्हा पाठवले होते.

**● वार्षिक जनरल सभा.. महाशिवरात्री उत्सवाची –**

सोमवार दिनांक १३ फेब्रुवारी २०२३ रोजी संध्याकाळी ७.१५ वाजता अंजनेश्वर देवस्थानची वार्षिक जनरल सभा पार पडली. एकूण ६२ उपस्थिती होती. चव्हाणवाडीचे खोत श्री. मधुकर चव्हाण हे त्यांच्या सहकाऱ्यांसह उपस्थित होते. माडबन, तिवरांबी गावातील खोतमंडळी सभेसाठी उपस्थित होती. गावपोलीस पाटील श्री.गजानन भोगले उपस्थित होते. श्री. समूशुद्दीन मिर, श्री. बाळूशेठ पाटणकर आदीं सह मानकरी सेवेकरी मंडळी अगदी वेळेवर उपस्थित होते. सभा संध्याकाळी ठीक ७.१५ वाजता सुरू झाली आणि ठीक ७.४५ वाजता समाप्त झाली. शुक्रवार दिनांक १७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या भराडणी मंदिरामधील धार्मिक कार्यक्रमांची रूपरेषा विस्ताराने सांगण्यात आली होती. या कार्यक्रमामध्ये माडबनची श्री देवी भवानी उपस्थित रहाणार असल्यामुळे त्या बाबतचे नियोजन सांगण्यात आले होते. भवानी आणि भराडणी देवींच्या पालखी सोहळ्याचे एकूण नियोजन विस्ताराने सांगण्यात आले. महाशिवरात्री उत्सवामधील नियोजन थोडक्यात विशद करण्यात आले होते. होळी उत्सव ६ आणि ७ मार्च २०२३ रोजी असल्याने त्या बाबत सर्व सूचना देण्यात आल्या होत्या. विशेषत: होळी खेळताना कोणकोणती काळजी खबरदारी घेतली पाहिजे याची माहिती देण्यात आली होती. होळीचा सर्व कार्यक्रम नगारखान्याचे बाहेर पार पाडला जातो. वर्षानुवर्षेही प्रथा सुरू आहे.गऱ्हाणी , होळी पूजा आदी सर्व नगारखान्याच्या बाहेर करण्याची पूर्वापारची प्रथा कायम राहिली पाहिजे.. होळीचा संपूर्ण उत्सव नगारखान्याबाहेर साजरा करण्याची प्रथा सर्वांनी पाळली पाहिजे, अशी विनंती वजा सूचना सर्वांना करण्यात आली होती.देवस्थान बचत खात्यामधील बँक बॅलन्स, एकूण मुदत ठेवी आणि त्याचे मिळणारे व्याज हे तपशीलवार सांगण्यात आले. 'पब्लिक ट्रस्ट असल्यामुळे सर्व पब्लिक असले पाहिजे.. कोणतीही गोष्ट लपवून रहाता नये.' हे ते

सूत्र सांगितले गेले होते. सर्व उजेडी ठेवले पाहिजे. शंका शक्यतेला जागा रहाता नये. सर्वांना चहापान देण्यात आले होते. सभा ठिक ७.४५ वाजता समाप्त झाली होती. सन २००८ पासून देवस्थान कारभार पहात असताना वर्षाला दोन जनरल सभा घेण्यात येत आहेत. .प्रतिवर्षी दोन जनरल सभा अगदी सभेची नोटीस बजावणी करून, यथायोग्य प्रसिद्धी करून केल्या जात आहेत. प्रत्येक सभेच्या वेळी एकूण जमा आणि खर्च याचा आढावा विस्ताराने घेण्यात येतो. आजपर्यंत ३४/३५ जनरल सभांचा अनुभव लक्षात घेतला तर देवस्थानच्या कामकाजाबाबत सारे सारे सांगून टाकायचे, कोणतीही गोष्ट सांगितली नाही असे झाले नाही. त्यामुळे या सर्व जनरल सभा म्हणजे 'देवस्थान कारभाराची सर्व च्या सर्व माहिती सर्वांना देणे आणि ती उपस्थित सर्वांनी नीटपणे ऐकून घेण' इतकाच कार्यक्रम दर सभेमध्ये होतो. त्यामुळे कामकाज करणे अगदी सोपे होवून जाते. सर्वांमध्ये विश्वास असतो की जे होईल ते ठरल्याप्रमाणे आणि ठरवल्या प्रमाणे होईल.मित्रांनो. या ट्रस्टमध्ये मिटिंग घेण्याची प्रोव्हीजन नसली तरी प्रतिवर्षी दोन जनरल सभा घेतल्यामुळे सर्व काही सुरळीत होवून जात आहे. 'बोलायला जागा रहात नाही'.

**● श्री देवी भराडणी मंदिरामधील धार्मिक कार्यक्रम –**

महाशिवरात्री उत्सवामध्ये पहिला दिवस श्रीदेवी भराडणी मंदिरामधला होता. दि.१७ फेब्रुवारी २०२३ माडबन निवासिनी श्रीदेवी भवानीची उपस्थिती होती. श्री देवी भराडणी मंदिरावरील कलशारोहण, पुण्याहवाचन, उदकशांती, नवचंडी पाठ, जलपूजन, आरती, श्रीदेवी भवानी देवीचे आगमन असे कार्यक्रम झाले. आरती,प्रसादवाटप. संबळाचे वादन झाले. शनिवार दिनांक १८ फेब्रुवारी २०२३ (महाशिवरात्र) रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.आबासाहेब पाटील यांनी उत्सवामध्ये आवर्जून उपस्थिती लावली आणि म्हणून त्यांचा शाल श्रीफळ श्रीदेवाची प्रतिमा दऊन गौरव आणि मिठगवाणे गावच्या लोकनियुक्त सरपंच सौ.आशाताई काजवे यांचा शाल श्रीफळ फोटो बेलपान देऊन सत्कार करण्यात आला. श्रीदेवी भराडणी मंदिरामध्ये जमा झालेल्या देणगीचा थोडक्यात तपशील सांगण्यात आला. गावातील मुख्य रस्त्यावर अंजनेश्वर देवस्थानच्या माध्यमातून फ्लड लाईट बसवण्याबद्दल थोडासा तपशील विशद केला. देवस्थानच्या एकूण जमा रक्कमेबाबतचा तपशील सांगितला. दानपेटी जमेबाबत तपशील सांगितला. उत्सव सुरू असताना असे सर्व काही थोडे थोडे सांगणे झाले होते. माहिती सर्वांना समजावी हा तो उद्देश होता. मित्रांनो, सन २०२३ च्या महाशिवरात्री उत्सवाची सुरुवात श्रीदेवी भराडणी मंदिरामधील धार्मिक कार्यक्रमांनी झाली होती. श्रीदेवी भराडणी मंदिरामध्ये दुरुस्ती आणि नवीनीकरणाची कामे झालेली असल्याने तसे प्रयोजन होते. त्यामुळे शुक्रवार दि.१७ रोजी धार्मिक कार्यक्रम क्रमवारीत धार्मिक कार्यक्रम झाले होते. पुण्याहवाचन, कलशारोहण, उदकशांती, नवचंडी पाठ, जलपूजन, आरती आदी कार्यक्रम झाले. श्री.दीपक ताम्हनकर, श्री.विजय भुस्कुटे, श्री. प्रसाद फडके, श्री.जयंत अभ्यंकर, श्री.अमित निमकर, श्री.अभ्यंकर, कुर्धे, श्री.मधुकर जोशी, श्री. प्रकाश परांजपे या ब्राह्मण मंडळींच्या उपस्थितीत सर्व धार्मिक कार्यक्रम पार पडले होते. पुण्याहवाचन उदकशांती श्री.प्रकाश परशुरामपंत गोखले, व सौ.प्रज्ञा प्रकाश गोखले कोल्हापूर यांच्या उपस्थितीत झाले होते. कलशपूजन, कलशारोहण हे श्री.प्रसाद नारायण कुळकर्णी आणि सौ.श्रध्दा प्रसाद कुलकर्णी यांच्या शुभहस्ते पार पडले होते. कलशारोहणाचे वेळी विश्वकर्माचे प्रतिनिधीत्व गावातील श्री.लक्ष्मीकांत जनार्दन पाटणकर व सर्व सोनार पाटणकर मंडळी उपस्थित होती तसेच विश्वकर्माचे दुसरे प्रतिनिधीत्व म्हणून गावातील सुतारमेस्त्री मंडळी उपस्थित होती. पंचक्रोशीतील सर्व वाडी गांवकर मंडळी, गावाचे पोलिस पाटील श्री. गजानन भोगले, देवीची गांवकर मंडळी, विजय गवाणकर, काजवे मंडळी, गवाणकर, माडबन खोत आदी सर्वांच्या उपस्थितीत हा देखणा कार्यक्रम पार पडला. आमचे वडील श्री.नारायण हरी तथा नाना देसाई ,श्री.मधूसुदन पटवर्धन आदी वयोवृद्ध मंडळींच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला म्हणून याचे महत्त्व विशेष होते..जे या कार्यक्रमाला उपस्थित होते ते भाग्यवंत म्हटले पाहिजे. कारण असे कार्यक्रम पुन्हा पुन्हा होत नाहीत. त्यामुळे भाग्य त्या क्षणापुरते मर्यादित होते. जलपूजन झाले. नवीन गोल विहीर बांधकाम नव्याने झाले होते म्हणून ती जलपूजा करण्यात आली. 'वरूण देवता पूजन' झाले होते. श्री लक्ष्मीकांत जनार्दन पाटणकर आणि सौ.सायली लक्ष्मीकांत पाटणकर यांच्या हस्ते जलपूजन झाले. शतचंडीपाठ श्री.लक्ष्मीकांत जनार्दन पाटणकर व सौ.सायली

लक्ष्मीकांत पाटणकर या सोनार दांपत्याच्या उपस्थितीत झाला होता. मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी एक लाख पंचवीस हजाराची रक्कम या पाटणकर सोनारांनी दिली होती. श्री.दत्ताराम जगन्नाथ पाटणकर यांनी धार्मिक कार्यक्रमांसाठी लागणारे सर्व साहित्य एकत्र खरेदी करून आणले आणि ते स्वखर्चाने आणले होते. कुठेही साहित्याची कमतरता पडली नाही... संध्याकाळी ठिक नियोजित वेळेनुसार माडबन निवासिनी श्री देवी भवानीचे आगमन झाले होते. ढोल ताशांच्या गजरात आणि फटाक्यांची आतीषबाजी करत देवीचे भराडणी मंदिरामध्ये आगमन झाले होते. सर्व माडबनकर लहान थोर त्यामध्ये सहभागी होता. आगमन अत्यंत रंजक झाले होते. सर्व माता भगिनी हाती ओवाळणीची निरांजने घेऊन उपस्थित होत्या. श्रीदेवी भवानी आल्यानंतर आरती सुरू झाल्या होत्या. त्यानंतर प्रसाद वाटप करण्यात आले होते. खिचडी आणि गोड शिरा मूद यांचे वाटप उपस्थित सर्वांना करण्यात आले होते. श्रीदेवी भवानीच्या भुत्यांनी संबळ वाजविण्यास सुरूवात केली. 'संबळवादन' हे ह्या दिवशीचे विशेष ठरले. त्यांनंतर श्रीदेवी भराडीण आणि श्री देवी भवानी या दोन्ही पालखीमध्ये बसून मंदिराबाहेर पडल्या. ठीक रात्री साडे आठ वाजता. सर्व उपस्थित माता भगिनी पालखी मार्गावर निरांजन ओवाळणी घेऊन प्रकाश दाखवण्यासाठी उभ्या होत्या. 'मार्गदीपक' म्हणून तो प्रकाश कामी आला होता. ढोल ताशांच्या गजरात दोन्ही पालख्या श्री देव अंजनेश्वर मंदिराच्या नगारखान्यापाशी पोहोचल्या.ठीक पावणे नऊ वाजता पोहोचल्या. पालख्यांवर नगारखाना यामध्ये पुष्पवृष्टी झाली. नेहमी प्रमाणे रात्रौ ९.०० ची धुपारती सुरू झाली.आरती झाली. पालखी प्रदक्षिणा श्रीदेवासह भवानी आणि भराडणी देवींची पण झाली. पालखी प्रदक्षिणेनंतर ओटी भरण्याचा कार्यक्रम झाला. सौ.गोखले, कोल्हापूर यांच्या हस्ते दोन्ही देवींच्या साडीचोळी नारळाने ओटी भरण्याचा कार्यक्रम झाला. चहापान झालेवर दोन्ही पालख्या मार्गस्थ झाल्या. अप्रतीम कार्यक्रम पार पडला. वर्षानुवर्षे हा कार्यक्रम आठवणीत रेंगाळत राहील. श्रीदेवाच्या दरबारी ह.भ.प. सौ.पाठक यांचे कीर्तन झाले. पहिला दिवस अशा पद्धतीने पार पडला. श्रीदेवी भराडणी मंदिरामध्ये झालेल्या कार्यक्रमातील क्षणचित्रे फेसबुक पेजला कायम स्वरुपी प्रिझर्व्ह राहतील म्हणून इथे पोस्ट करून ठेवली आहेत. श्री.पंकज मणचेकर याने मोबाईल द्वारे काढलेले फोटो शेअर करुन ठेवले आहेत.जसे माझ्याकडे हे सर्व उपलब्ध झाले तसे तसे ते आपल्यापर्यंत पाठवण्याचे काम मी केले आहे. अशामुळे कार्यक्रमाची उजळणी होते. जी भक्तमंडळी काही अडीअडचणीमुळे येऊ शकली नाही त्यांच्यासाठी ही सोय हाऊन जाते.

**●महाशिवरात्री उत्सव २०२३ ची सांगता –**

मित्रांनो, महाशिवरात्री उत्सव २०२३ ची सांगता लळीताच्या किर्तनाने झाली. सांगलीच्या ह.भ.प.सौ.संध्या पाठक यांची तीनही दिवस किर्तन सेवा घडली होती.कीर्तनाला श्री. मनोहर विष्णू गोखले तथा गोखले बुवा नाणार यांची ऑर्गन साथ आणि तबला साथीला श्री.आनंद ओळकर होते. श्रीदेवाची पालखी नवीन पालखी श्री.विकास मेस्त्री, मिठगवाणे यांनी घडवली होती. शिसमाच्या लाकडामध्ये ही पालखी घडवलेली आहे. या पालखीवर चांदीचा पत्रा लागणार आहे. सन २०२६ पर्यंत ही शिसवाच्या लाकडातील पालखी उत्सवामध्ये वापरली जाईल आणि त्या नंतर सन २०२७ मध्ये त्यावर चांदीचा पत्रा लावण्यात येईल. तोपर्यंत चांदी जमवणे, किंवा चांदीसाठी रक्कम स्वीकारणे हे चालू राहील. सुमारे १०० किलो चांदी पालखी, सिंहासन आणि प्रभावळीसाठी लागणार आहे. येत्या ३/४ वर्षात हे उद्दिष्ट नक्की साध्य होईल याबाबत शंका नाही. तीनही दिवस उपस्थित सर्व भक्तांना चहाचे वाटप करण्यात आले. ४/५ स्टील थर्मास असल्यामुळे चहा वाटप सोयीचे झाले. अबाल वृद्ध मंडळीनी चहाचा आनंद घेतला.या चहासाठी कै.गोविंद आपटे यांच्या स्मरणार्थ श्री.गणेश गोविंद आपटे ,धाऊलवल्ली यांनी रू.५०००/– ची देणगी दिली..हि देणगी श्री.उमर हसन नाईक यांनी मिळवून आणली म्हणून त्यांचा उल्लेख केला आहे. उत्सवामधील पहिल्या दिवशी भराडणी मंदिरामध्ये धार्मिक कार्यक्रम झाला. सर्वांना रात्री खिचडी प्रसाद व गोड शिरा मूद देण्यात आला. भराडणी मंदिरामधील .भवानीसह भराडणीची पालखी मंदिरात आली. दुसरा दिवस महाशिवरात्रीचा होता. यावर्षी महाशिवरात्रीच्या दिवशी लक्षणीय उपस्थिती होती. सहाय्यक पोलिस निरीक्षक श्री.आबासाहेब पाटील यांचा शाल श्रीफळ देऊन श्री.नरेश कांबळी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला आणि सरपंच सौ.आशा काजवे यांचा गौरव शाल श्रीफळ देऊन सौ.कला चेऊलकर पंगेरकर

यांच्या हस्ते करण्यात आला. शेवटच्या दिवशी सेवेकरी मानकरी खोतमंडळी आदी सर्वांचे आभार मानण्यात आले. दानपेटीमधून मिळालेल्या एकूण जमा रक्कमेबाबतचा तपशील सांगण्यात आला. बचत खात्यातील शिल्लक आणि एकूण मुदत ठेवी ची रक्कम सर्वांना सांगण्यात आली.गावामध्ये प्रकाश योजना करण्याबाबत च्या एकूण योजनेची माहिति देण्यात आली.श्री.जयदीप ढमढेरे पुणे यांनी त्यासाठी रु..५००००/- रक्कम दिली आहे. गावांमध्ये महत्वाच्या रस्त्यावर रात्रीच्या वेळी लख्ख प्रकाश असावा, भाविक भक्तांना उत्सवाला येताना रस्त्यावर लख्ख प्रकाश उपलब्ध असावा आणि नेहमीच्या वर्दावळीला संध्याकाळी ७.००ते रात्री ११.३० पर्यंत लख्ख प्रकाशाची सोय करण्याच्या उद्देशाने ती देणगी सत्कारणी लावण्यात येणार आहे.शिवाजी चौक, मुहूर्ताई मंदिर, परिटकोंड, श्रीदेव अंजनेश्वर मंदिरासमोर, भराडणी मंदिराच्या समोर, श्री.दत्ताराम जगन्नाथ तथा बाळू पाटणकर यांच्या घरासमोर, श्री.रमेश राणे यांच्या घरासमोर असे हायमास्क टॉवर उभारण्याचे काम झाले होते. अजून काही ठिकाणी असे हायमास्क टॉवर उभारण्यात येणार आहेत, पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप (PPP) अशा पद्धतीने हे टॉवर उभारण्याचे काम हाती घेतले आहे.काही ठिकाणी ग्रामस्थांचे सहकार्य घेण्यात आले आहे .त्याबद्दल वीज वापराऐवढी रक्कम त्यांच्या त्यांच्या बँक खात्याला ट्रान्स्फर करण्यात येणार आहे. देवस्थान मार्फत गावामध्ये रात्र प्रकाशाची सोय लावण्यासाठी ही योजना हाती घेण्यात आली आहे. या साठी टायमर यंत्रणा बसवून घेण्यात आली आहे. जेणेकरून संध्याकाळी ठिक ७.०० वा लाईट लागतील आणि रात्री ठिक ११.३० वाजता आपोआप बंद होतील. याकरिता आर्थिक तरतूद करून ठेवण्यात आली आहे. अर्थात ही योजना पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप PPP अशा पद्धतीने चालणार आहे. सर्वांच्या सहकार्यावर ही योजना यशस्वी होणार आहे. याबाबत विस्ताराने सांगण्यात आले. दिवंगतांबद्दल आठवणी जागवण्यात आल्या. ग्रामपंचायत मिठगवाणेचे आभार मानण्यात आले. लळीताच्या कीर्तनाला सुमारे दोन अडीचशे भाविक भक्तांची उपस्थिती होती.उपस्थित सर्वांना बुंदी लाडूचे वाटप समारोपाला करण्यात आले. एकूण महाशिवरात्री उत्सव आनंदात आणि उत्साहात पार पडला.

● **आयकरातून वजावट–**

श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे या ट्रस्टची नोंदणी आयकर विभागाकडे झाली आणि हा ट्रस्ट 'धार्मिक ट्रस्ट,१००% धार्मिक ट्रस्ट ठरवण्यात आला. या बाबतचे आदेश दि.२८ फेब्रुवारी २०२३ रोजी पारित करण्यात आले होते. यामुळे ट्रस्टसाठी कोणत्याही उत्पन्नावर यापुढे कोणताही आयकर द्यावा लागणार नाही, बँकामधील ठेवींवर परस्पर TDS कापला तरी तो पुन्हा रिफंड मिळवणे शक्य झाले आहे. एकूण व्याजासह एकूण वार्षिक उत्पन्नावर जो ३३% दराने आयकर तथा Income tax कापला गेला असता तो पूर्णतः वाचला आहे.भाविक भक्तांच्या देणगीवर ३३% Income tax द्यावा लागला असता तो देण्याची नौबत आत्ता राहिलेली नाही. श्री देव अंजनेश्वर ट्रस्ट सन १९५२ मध्ये कै.श्री.सदाशिव लक्ष्मण तथा बाबूराव देसाई व कै.गणेश बाळकृष्ण तथा आबा देसाई या दोघां देसाई महानुभावांनी आपल्या स्वाक्षऱ्या करून, जबाब नोंदवून हा ट्रस्ट नोंदला आहे. दि.१७.०५.१९५२ रोजी शेड्युल मध्ये विहित नमुन्यातील अर्ज कै.श्री.सदाशिव लक्ष्मण तथा बाबूराव देसाई आणि कै.गणेश बाळकृष्ण तथा आबा देसाई यांनी 'अर्जदार' म्हणून नोंदला आहे . यावर दि.१७.११.१९५२ रोजी मे.धर्मादाय आयुक्त कोल्हापूर यांची ऑर्डर झाली आहे आणि ती ऑर्डर म्हणजे ट्रस्टची स्किम होय. थोडक्यात ट्रस्ट चालविण्याचा 'परिपाठ आहे'. दोन देसाई कुटुंबीयांपैकी कुणीही कर्ता इसम असेल त्याने व्यवस्था पाहणेची आहे.'हे mode of succession for trusteesheep & maneger ship.मधील नोंद मला जास्त महत्वाची वाटते. 'Hereditary mode of succession' प्रत्येकाच्या कारभाराच्या कार्यकक्षा म्हणजे 'Resphectve shpeare' सुस्पष्ट केलेले आहेत. दोन देसाई यांच्या सोबत देवस्थान मालकीची जमीन असल्यामुळे जमीनी सांभाळून, वहिवाट करून त्याबदल्यात देवाची नित्य पूजा, नित्य झाडलोट, नित्य नैवेद्य करण्याचे नियोजन करण्यासाठी दोन लिंगायत मॅनेजर आणि अंजनेश्वरच्या जमीनी ताब्यात ठेऊन वर्षाला १२ पायली तांदूळ कार्तिकीच्या उत्सवामध्ये पुरवठा करणारे होळी गावचे गोखले ट्रस्टी असे तीन. असे एकूण पाच विश्वस्त असा हा ट्रस्ट आहे आणि हे सर्व ट्रस्टी वंशवारस पद्धतीने अधिकारावर येणार आहेत. थोडक्यात

'Heredatory mode of succession'अशी ट्रस्टी नेमणूकीची पध्दत आहे. देवाला नंदादीप लावण्यासाठी वर्षाला रु.२७/- मिळत आणि ती रक्कम दोन लिंगायत स्वीकारतात. ती रक्कम देवस्थानमध्ये जमा होत नव्हती. परस्पर तो तनखा, भत्ता म्हणजे ' Cash allowance ' तत्कालीन लिंगायत लोकांना राजापूरला तहसीलदार कचेरीत गेल्यावर सही करून मिळत असे. आणि ही नोंद ट्रस्टच्या दि.१७.११.१९५२ सालच्या धर्मादाय आयुक्तांच्या आदेशात स्पष्टपणे नमूद असल्याने आणि भातपिकाचे उत्पन्न लिंगायत लोकांना मिळते याची नोंद सन १९५२ च्या दस्तऐवजांमध्ये नोंदलेली असल्याने खूप लेखी स्पष्टीकरण आयकर आयुक्तांकडे द्यावें लागलें. कारण ट्रस्टी म्हटला की तो निस्वार्थीवृत्तीने कामकाज करणारा असावा, अशी अपेक्षा कायद्याला आहे. देवाच्या पुढ्यातील सर्वच्या सर्व रक्कम दानपेट्यांमधून जमा होत नाही.देवाच्या पुढ्यातील जमा होणाऱ्या रक्कमेचा हिशोब दानपेट्या बसविल्यामुळे होत आहे, ही बाब मे.आयकर आयुक्त, पुणे यांना लेखी म्हणणे सादर करून समजावून सांगावी लागली. तपशीलाने सांगावी लागली. कायद्याला अशी अपेक्षा आहे की देवाला मिळणाऱ्या संपत्तीमध्ये 'कुणीही व्यक्ती थेटपणे लाभ घेणारी, फायदा कमावणारी नसावी.आणि देवाच्या उत्पन्नामधील थेटपणे आर्थिक लाभ आणि फायदा घेतला जात असेल तर त्या देवस्थान ट्रस्टला आयकरामधून माफी, एक्झम्शन देताच येणार नाही, असे कायद्याचे म्हणणे होते आणि सदरहू आयकर आयुक्तांचे मत होते. त्यामुळे या बाबत लेखी म्हणणे थोडक्यात ' Return say' माझ्या एक मात्र सही शिक्क्याने फाईल करावा लागला. हे म्हणणे ऑनलाईन पद्धतीने माझ्याच आधार कार्ड पॅन कार्डच्या लॉग इन आयडी पासवर्डने आयकर आयुक्त, पुणे यांच्या कडे फाईल झाले. त्यासोबत सर्व देवस्थानचे मूळ धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडील रेकॉर्ड, मागील तीन वर्षांपासूनचे ऑडिट रिपोर्ट, टॅक्स ऑडिट रिपोर्ट, तीन वर्षांपासूनच्या देणगीदारांची यादी, तीन वर्षांत झालेले कार्यक्रमांचे फोटो आणि वृत्तांकन, तीन वर्षांपासूनचे वार्षिक अहवाल, दानपेट्यांबाबतचा तपशील, देवस्थान मालकीच्या जमीनींचा,इमारतींचा तपशील आदी सर्व पीडीएफ फाईल करून सादर करावे लागले..या कामी आमच्या देवस्थानचे लेखापरीक्षक श्री.निलेश पाटणकर (सीए)आणि त्यांच्या पत्नी सौ.नम्रता निलेश पाटणकर (सीए) यांनी या कामी निस्वार्थ बुध्दीने आणि कोणतेही शुल्क न आकारता परिश्रम घेतले.कोल्हापूरचे सीए श्री.संजय वनभाट्टे यांनी मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य केले..त्यामुळे त्यांचा उल्लेख केलाच पाहिजे..अगदी अल्पशुल्क घऊन मार्गदर्शन श्री.वनभाट्टे यांनी केले. देवस्थानचे वार्षिक लिखाण श्री.दत्तात्रय श्रीकृष्ण तथा दत्ताभाऊ रानडे यांनी सर्व देणगीदार आणि त्यांच्या पावत्या यांची पुन्हा कसून तपासणी केली. त्यामुळे या कामी सर्वांचेच थोड्या कमीअधिक प्रमाणात सहकार्य लाभले आहे.आणि या सर्वांच्या प्रयत्नांना श्रीदेवाचे बळ होते म्हणून १२AB चे सर्टिफिकेट थोडक्यात 'टॅक्स एक्झम्शन सर्टिफिकेट ' देवस्थान ट्रस्ट ला प्राप्त झाले आहे. माझ्या एक मात्र सही शिक्क्याने आणि एकट्याच्या सहीच्या अर्जाने,व एकट्याच्या सहीच्या म्हणण्याने हे टॅक्स एक्झम्शन सर्टिफिकेटचे काम मार्गी लागले म्हणून झालेला आनंद काही विलक्षण आहे. सन १९५२ साली धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे जशी ट्रस्टची नोंदणी झाली तशीच आयकर आयुक्त पुणे यांच्याकडे या ट्रस्टला नोंदणी मिळाली. नोंदणी क्रमांक मिळाला. आणि १००% करमाफीचे सर्टिफिकेट मिळाले. वर्षभरात मिळणारे मुदतठेवीचे व्याज आणि वर्षभरात मिळणारी एकूण देणगी रक्कम याचा विचार करता यावर जो ३३% आयकर, ( income tax ) भरावा लागला असता तो यापूर्वीचा वाचला आणि यापुढेही कायमचा माफ होणार आहे. १००% माफी आहे. थोडक्यात प्रतीवर्षीचे ४/५ लाख रुपये वाचले जाणार आहेत. मित्रांनो, सांगितले नाही तर समजत नाही. वेळच्या वेळी सांगितले नाही तर लक्षात सुद्धा येत नाही. उशिराने सांगीतले तर त्याची किंमत समजत नाही. अजिबात सांगितलेच नाही तर सत्य दडवून ठेवल्या सारखे होते. आजकाल खोटीनाणी जेव्हा समाजात भाव खाऊन जाताना दिसतात. सत्य कधीही सांगितले गेले नसल्यामुळे कोपऱ्यात बसते. अशा मंदियाळीत जे जे खरे आहे, सत्य आहे ते उघडपणे सांगायला काय हरकत आहे. 'सत्य उजेडी ठेवले पाहिजे, हे ते माझे तत्व आहे.' सत्य सांगून टाकले पाहिजे. कोण काय म्हणेल आणि कोण काय बोलेल म्हणून विचार करत रहाण्यात काही मतलब नाही. सत्य ठोकून सांगितले गेले पाहिजे.

**●होळी उत्सव–**

दि.०६ मार्च २०२३ रोजीचा 'होळीपौर्णिमेचा उत्सव' उत्साहात पार पडल .बारागावची होळी चव्हाणवाडीच्या चव्हाण खोतांकडे होती. गावातील होळी कुळंबौशीवाडी मधील धनावडे कुटुंबीयांकडे होती. हा सण वेगळ्या 'रंगाचा' आणि वेगळ्या 'ढंगाचा' असतो. म्हणून त्यांचे महत्त्व आणि जबाबदारी काहीशी वेगळी असते. असे जरी असले तरी सर्वांनी संयमाने, जबाबदारीची जाणीव ठेवून वागले पाहिजे. अंजनेश्वर देवस्थानच्या वतीने आजरोजी 'बटाटेवडा' खेळगड्यांना देण्यात येत असतो. यावर्षी भराडणी मंदिराचा जीर्णोद्धार झालेला असल्याने चव्हाणवाडीला जाण्याचा मार्ग भराडणी मंदिराकडून उपळकर घाटी रस्त्याने जायचा होता. भराडणी मंदिरामध्ये निशाणे १५/२० मिनिटे विसावतील, तासेढोल वाजतील आणि मग मार्गस्थ होता येईल, असे ते नियोजन केले होते.

भराडणी मंदिरामध्ये बटाटवडा वाटप करण्यात आले. येथील भराडणीच्या स्थानिक कारभारी मंडळी कडून चहापान देण्यात आले.निशाण पूजन झाले. यावर्षी उपळकर घाटी चढून गेल्यावर ट्रक, टेम्पो आदी वहातूकीची व्यवस्था केली होती. विविध प्रकारचे रंग, गुलालाचा वापर सुध्दा अगदी नाममात्र करण्यासाठी सांगितले होते. मदिरेचा अंमल या उत्सवामध्ये असतोच असतो. परंतु 'तो अंमल' बाहेर दिसून येईल इतका नसावा. बाकी मदिरेला तर खुद्द परमेश्वर सुध्दा रोखणार नाही. असे असले तरी माझा प्रयत्न आहे की सर्वांनी ती मदिरा होळीच्या होमामध्ये विसर्जित केली पाहिजे. अर्वाच्य बोंबा मारणे हे जवळपास इतिहास जमा झाले आहे. आजकाल तसे कुणीही अर्वाच्य बोंब मारण्याचे काम करत नाही. सर्वांनी सहकार्य करावे आणि या उत्सवाचा आनंद लुटावा, असे आवाहन केलेले होते. होळीपोर्णिमेचा उत्सव उत्साहात पार पडला. रात्री अंजनेश्वर मंदिरात ढोलताशांची सलामी होऊन सर्व खेळगडी श्रीदेवी मुहूर्ताई मंदिरात निघाले. श्री देवी मुहूर्ताईला सालाबादप्रमाणे गऱ्हाणे झाले. 'खेळगड्यांच्या हातापायाखाली संभाळ कर आणि उत्साहात होळीचा कार्यक्रम पार पडूदेत. श्री.महेश कांबळी (देवीचे गांवकर)चे खर्जातले गऱ्हाणे झाले. 'बोब रे बोब रे होळदेव' झाले. रात्री ठीक साडे दहा वाजता पुन्हा अंजनेश्वर मंदिरी परत येणे झाले. श्री.वसंत भास्कर मोहिते हे अनेक वर्षेही निशाण सेवा बजावण्यासाठी जामसंडे देवगड मधून येत असतात म्हणून हा त्यांचा विशेष उल्लेख करीत आहे. सोबत साथीला निशाणे घेणारा दुसरा सहसाथी श्री.नरेश प्रिंदावणकर हे होते. देविदास रायकरच्या ताशाच्या ठेक्यावर हा आजचा होळीचा कार्यक्रम होतो..पुन्हा गांवकर अन् लिंगायताचे जॉईंट गऱ्हाणे झाले. नगारखान्याच्या दरवाजातून गऱ्हाणे हे ते विशेष. तिथूनच गऱ्हाणे घालून देवाला मनवायचा रिवाज आहे. वर्षोवर्षींचा रिवाज आहे. पुन्हा तेच सांगणे. 'हातापायाखाली संभाळ कर.. आणि रक्षण कर'. यावर्षी देवाच्या घाटीमार्गे नजाता श्रीदेवी भराडणी मंदिराकडे जाणे झाले. तिथे बटाटवड्या सह लाडूचहाचे वाटप झाले. तांबे,उपळकर, मणचेकर, पाटणकर, कुळकर्णी आणि विलास चेऊलकर आदी मंडळींनी इथले सर्व नियोजन केले होते.अगदी हुरूपाने सर्व पार पडून श्रीदेवी भराडणी ला गऱ्हाणे झाले आणि उपळकर घाटी मार्गेसर्व खेळगडी मार्गस्थ झाले... सुमारे तीन चारशेची उपस्थिती होती. चव्हाणवाडीला जाण्यासाठी वहातूक व्यवस्था केलेली असल्यामुळे उपस्थिती वाढली. श्री. नरेश कांबळी यांनी वहातूक व्यवस्थेची सर्व जोडणी केली होती. श्री.संजय देसाई यांचा ट्रक, श्री.रमेश काजवे यांची बोलेरो पीकअप यासह १०/१५ फोर व्हीलर आणि २०/२५ टुव्हीलर हे सर्व तयारीत होते. त्यामुळे उपस्थितांची संख्या वाढली... सर्व टुव्हीलर फोर व्हीलर चव्हाणवाडी स्टॉप पाशी स्थिरावले. आत्ता पायी चालणे सुरू झाले होते. ढोल ताशांच्या गजरात चव्हाणवाडीच्या खोताचे घरी पोहोचलो ते रात्री साडे बारा वाजता. ही अगदी नियोजित वेळी पोहोचणे झाले. तिथे उत्स्फूर्त स्वागत झाले. श्री.मनोहर धुरी यांनी स्वागताचे दोन शब्द बोलून अगदी सहजपणे चव्हाणवाडीच्या खोतांकडून श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन आमचेही स्वागत झाले. श्री.मधू चव्हाण, चव्हाणवाडीचे खोत. वय वर्ष ७६. तरूणांना लाजवील असा मानसिक हुरूप होता. वयानुसार थोडे शरीर क्षीणलेले होते पण हुरूप कमी नव्हता. सगळ्यांना एकत्र ठेवणे, एक जीनसी ठेवणे हे वाटते इतके सोपे नसते.परंतु ते कौशल्य श्री.मधू चव्हाणांमध्ये आहे...सर्व चव्हाणवाडी ग्रामस्थांनी उत्स्फूर्त स्वागत केले... अल्पोपहार झाला..खोतांना श्रीफळ देण्याचा औपचारिक प्रथेचा कार्यक्रम झाला. मोहित्यांनी निशाणीची काठी लावली आणि होळीची पोफळ तुटली. पोफळीच्या होळीला आरती ओवाळणी झाली.

मुंबईकर चाकरमानी होळीसाठी आलेले होते. त्यामुळे आरती ओवाळणीचा कार्यक्रम वाडीतील दोन तीन ठिकाणी पार पडला. माताभगिनींचा उत्साहसुद्धा वाखाणण्या सारखा होता. पुन्हा परतीच्या वाटेवर निघाले. चव्हाणवाडीच्या खोताने होळीची पोफळ अगदी चव्हाणवाडीच्या वेशीपर्यंत आणून दिली...पुढे ट्रकातून होळीच्या पोफळीचा प्रवास झाला. अंजनेश्वर घाटीमार्गे चव्हाणवाडीच्या खोताकडील होळी अंजनेश्वर नगारखान्यापाशी आली. रात्रीचे तीन वाजले होते. वहातूक व्यवस्थेमुळे सर्व सुशेगाद झाले. तिथून गावातील होळी धनावडे कुटुंबीयांकडे असल्यामुळे तिथे जाणे झाले. ढोल ताशांच्या काहीशा हलक्या तालावर..थंड वारा सुटला होता. मदिरेचा अंमल थोडा कमी कमी झाल्यामुळे ढोलाचा ताल सुध्दा मंद झाला...'मदिरेतला मद कमी झाला की सर्व मंद हाऊन जाते ही ती अनुभूती. प्रत्यक्ष अनुभव नसला तरी निरिक्षणातून आलेला अनुभव हा संदर्भासाठी पुरेसा असतो. धनावडे कुटुंबीयांकडे आगत स्वागत झाले. गुळपाणी, खोबऱ्याची खिरापत झाली. पॅक बंद चिवडा आणि कडकडीत चहा असे तिथले नियोजन होते. संपूर्ण धनावडे कुटुंबीयांनी उत्साहात स्वागत केले. तेथील होळीची पोफळ तुटली. पुन्हा अंजनेश्वर मंदिराकडे जाणे झाले. लिंगायत गुरवाची सकाळची पूजा झाली. नगारखान्याच्या बाहेर येऊन दोन्ही होळींची पूजा झाली. श्री. सुधाकर लिंगायतने पूजा केली. शेंड्याचे मानकरी गवाणकर म्हणून त्यांच्या हाती मानाचे श्रीफळ दिले. श्री. विजय गवाणकरांनी ते मानाचे श्रीफळ स्वीकारले.होळीचा खड्डा काढायचा मान गडगेकर कुटुंबीयांना असतो. म्हणून एक मानाचे श्रीफळ श्री.अनंत गडगेकर यांच्या हाती दिले.'बोब रे बोब रे होळदेव' झाले. एक होळी होम करण्यासाठी नेमात गेली. होम झाला. प्रदक्षिणा झाली. 'वंदितासि सुरेंद्रेण. ' ही प्रार्थना झाली. गंधफूल होमात पडले. गेली अनेक वर्षेहे पुण्यदायी काम जणू काही माझ्या ललाटी कोरलेलेच होते अशा पद्धतीने झाले. इथे रात्रीच्या सर्व कार्यक्रमांची सांगता झाली. दुसरी देवीची होळी खाली गोलंदशीकडे निघाली. कार्यक्रम अगदी नियोजित वेळी म्हणजे पहाटे पावणे पाच वाजता समाप्त झाला. गऱ्हाणे घातल्याप्रमाणे सर्व काही झाले. हातापायाखाली सांभाळ करून सर्व झाले हे ते विशेष. कुठेच कोणती अडचण आली नाही. मित्रांनो, शब्दबध्द केले तर कधी काळी हे वाचून पहाता येईल. वहातूक व्यवस्थेमुळे उपस्थिती वाढली आणि ती लक्षणीय होती. भविष्यात सुध्दा लांबीच्या मकणाला वहातूक व्यवस्था केली तर फारसे गैर ठरणार नाही,असा एकूण अनुभव होता. आणि असा एकूण सर्वांचा सूर होता..थोडा बदल सर्वांनी स्वीकारलाच पाहिजे .अनेक वर्षे आपण पायी पायी चालत गेलो. तेव्हा रस्ते नव्हते. वहातूक साधने नव्हती.आत्ता बहुतांश सर्वांचे घरात टूव्हिलर असते. १०/१५ घरांमध्ये एखादी फोर व्हीलर असते. त्यामुळे असे फरक करायला हरकत नाही. काळानुसार बदलले पाहिजे. जुने जपून नवीन स्वीकारले पाहिजे. धुळवडीचा दिवस अगदी नेहमीच्या उत्साहात पार पडला होता. होळीचा शेंडा गावातील गवाणकर कुटुंबीयांकडून बांधणे, दुपारी होळी खेळवणे व दुपारी ठीक एकच्या ठोक्यावर होळी 'नेमात जाणे' हे अगदी शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले होते. 'नेमात जाणे' म्हणजे खोदलेल्या खड्ड्यात घालून होळी उभी करणे. जवळ कांबळी लोकांची रहाती घरे असल्यामुळे हे कार्य दिसते इतके सोपे नसते. कसबी लोक लागतात. त्यांच्या पुढारपणात करण्याचा हा कार्यक्रम आहे. देवीच्या मांडावर होळी उभी करणे याला खूप महत्त्व आहे. कारण पुढे होम करून नैवेद्य दाखवणे ही प्रक्रिया पार पडल्या शिवाय गावातील लोकांच्या घरात नैवेद्य सुद्धा दाखवला जात नाही. देवीच्या मांडावरील होळीचा कार्यक्रम नैवेद्य दाखवून पूर्ण झाला की गावातील लोकांनी सणाचा नैवेद्य आपापल्या घरात दाखवायचा अशी पूर्वापार चालत आलेली प्रथा अजूनही बिनबोभाट सुरू आहे. हे असे का म्हणून सुध्दा कुणी विचारत नाही. इतकी ही पद्धत निब्बर झालेली आहे. मांडावरचा वार्षिक कोरोभार पूर्ण झाल्यावर मग घरोघरी सण साजरा झाला. संध्याकाळी गऱ्हाणी कार्यक्रम सुध्दा अगदी नियत वेळेमध्ये म्हणजे ठीक ७.०० वाजता सुरू झाला आणि ८.०० वा समाप्त झाला. प्रथेप्रमाणे मुहुर्ताई मंदिरात नारळाचे घोट दोन घोट पाणी प्रत्येकाच्या मुखामध्ये आणि हातात नाराळाची कवड. गुळखोबऱ्याचा मनसोक्त प्रसाद. मजेशीर कार्यक्रम. वाजत गाजत निशाणे अंजनेश्वर मंदिराच्या नगारखान्यापाशी आली. देवाला पुन्हा सांगण्यासाठी की होळीचा उत्सव निर्विघ्नपणे पार पडला. आणि पुन्हा निशाणे मुहूर्ताच्या मंदिरात वाजत गाजत गेली. मित्रांनो, हे निरंतर सुरू होते म्हणून आजही सुरू आहे. फक्त सुसूत्रता आणली सर्व वेळेवर हापू लागले म्हणून उपस्थितीत कमालीची वाढ झाली. इतकेच काय ते महत्त्वाचे आहे.

**●व्यवस्थापन समिती –**

अंजनेश्वर कारोभार अजून गतीमान पध्दतीने व्हावा आणि दिवसेंदिवस कारभाराची व्याप्ती वाढत असल्यामुळे व्यवस्थापनसमिती असावी असे वाटू लागले आहे.. ट्रस्टच्या ढाच्याला धक्का न लावता अकरा सदस्यीय व्यवस्थापन समिती गठीत झाली तर दैनंदिन व्यवस्थापन, उत्सव व्यवस्थापन , आदी सर्व त्या व्यवस्थापन समिती मार्फत करण्यात कोणतीच अडचण येणार नाही. अर्थात या मध्ये खोतमंडळी, मानकरी, सेवेकरी, देणगीदार यांनी मनापासून आणि उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला पाहिजे..येत्या आर्थिक वर्षात म्हणजे एप्रिल २०२३ पासून ही 'व्यवस्थापन समिती' गठीत होऊन प्रत्यक्ष कामाला लागली तर कामाचा अनुभव येईल आणि अवाका पण लक्षात येईल. २/३ वर्ष या व्यवस्थापन समितीने चांगला कारोभार चालवला तर त्या व्यवस्थापन समितीला कायदेशीर मान्यता मिळवता येईल. काही अडचण येणार नाही. या बाबत सर्वांनी जरूर विचार करावा, असे आवाहन करण्यात आले होते. माझे कामकाज अखंडितपणे आणि अव्याहतपणे सुरू रहाणारच आहे.परंतु व्यवस्थापन समिती गठीत करण्याचा एक नवीन विचार आज रोजी आपल्या समोर ठेवला आहे. अंजनेश्वर देवस्थानमध्ये काम करण्याची ती एक संधी आहे. जरुर विचार केला पाहिजे.

**●दानपेटी मधील मोजदाद –**

सोमवार दिनांक २०.०३.२०२३ रोजी संध्याकाळी ७ .०० वाजता अंजनेश्वर मंदिरातील दानपेट्या उपस्थित सर्वांसमोर उघडण्यात आल्या.राजापूर अर्बन को. बँक लिमिटेड पठार शाखेचे कॅशीअर श्री.एस.व्हि.चव्हाण, बँक कर्मचारी श्री.उपेंद्र वाघधरे, श्री.जयेश जाधव व कु.किरण सुनील मांजरेकर ह्यांनी दानपेटीतील दानाची मोजदाद केली. रु.२९४५०/– रक्कम बँकेमध्ये जमा झाली 'Anonymous donation ' म्हणून नोंद झाली. राजापूर अर्बन बँक जानशी पठार शाखेकडे ही रक्कम जमा झाली. या जमा रकमेचे दहा वर्ष मुदतीचे मुदतठेव सर्टिफिकेट तयार होईल तर रू.२४२४८/– रक्कम तीस बंद लखोट्यांमधून प्राप्त झाली' Non anonymous donation '..नावे देणगी. या रक्कमेच्या त्या त्या देणगीदार लोकांची नावे पत्ता नोंदवून देणगीपावत्या ( पावती क्रमांक ८७१ ते पावती क्रमांक ९००) तयार केल्या आजरोजी प्रसाद अंगाऱ्यासह या देणगी पावत्या पोस्टाने पाठवण्यात आल्या आहेत.. एकूण दानपेटीतील जमा रु.५३६९८/–; यामध्ये रु.४६/– रक्कम मा.शाखाधिकारी श्री.बांधकर यांनी मागील दानपेटी मोजदादीमध्ये जादा रक्कम झाली होती ती दानपेटी मध्ये अर्पण केली होती. तसेच रु.१००/– ही रक्कम पाच डझन केळी विक्री तून मिळालेली रक्कम श्री.सदानंद तुकाराम लिंगायत यांनी दानपेटीमधील जमा केली. मित्रांनो दानपेट्यांचा उपयोग 'निनावी देणगी' साठी होतो आहे तसा 'नावेदेणगी' साठी सुद्धा होतो आहे. देणगीदारांना खात्री झाली आहे की दानपेट्यामधून पूर्णनाव–पूर्णपत्ता–मोबाईल क्रमांक–देणगीरक्कम–देणगीतपशील लिहून पाकीटबंद पध्दतीने अर्पण केलेल्या देणगी रक्कमेची पावती बनते. प्रसाद अंगारा पोस्टाने घरपोच येतो.देणगीदारांना ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे देणगी देण्यासाठी कुठेही चौकशी करण्याची आवश्यकता रहात नाही. श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे या ट्रस्टला १००% धार्मिक ट्रस्ट या सदराखाली टॅक्स एक्झम्शन सर्टिफिकेट (आयकर कायदा कलम१२AB खाली) मिळालेले असल्यामुळे देवस्थानच्या देणगी उत्पन्नामधून आयकर कपात होणे, टिडीएस कपात होणे असे कदापी होणार नाही.

**●व्यवस्थापन समिती तथा चालक समिती बाबत–**

मित्रांनो, दि.०६.०३.२०२३(होळीपौर्णिमा) रोजी व दि.१०.०३.२०२३ रोजी जाहीर नोटीस करून सन २०२३/२४ या आर्थिक वर्षासाठी व्यवस्थापनसमिती तथा चालकसमिती करण्यासाठी सांगितले होते. कमीत कमी अकरा सदस्यीय समिती असावी, अशी अपेक्षा आहे. जास्तीत जास्त कितीही सभासद चालतील. येथे कोणतीच अडचण नाही. उपस्थितांमध्ये या व्यवस्थापन समिती तथा चालकसमितीबाबत विस्ताराने सांगितले होते. व्यवस्थापन समितीची गरज विस्ताराने सांगितली होती. व्यवस्थापन समितीची आवश्यकता कशासाठी आहे, हे सर्व विस्ताराने सांगितले होते. श्री देव अंजनेश्वर सर्वांचा आहे. सर्वांना या देवस्थानच्या कामकाजा मध्ये भाग घेण्याची संधी उपलब्ध करून ठेवलेली आहे. जास्त लोकांचा सहभाग असला तर काम अधिक चांगल्या पद्धतीने होईल. कामांची विभागणी होईल. सर्वांना नवीन नवीन अनुभव येतील. एक मात्र नक्की की इथे व्यवस्थापनसमितीमध्ये कामकाज करताना

कोणताही पगार, वेतन, मानधन मिळायचे नाही आणि मिळणार नाही. यावर्षीपासून जमाखर्च टॅली सॉफ्टवेअरच्या सहाय्याने करायचे असल्याने ते काम सुध्दा रोजच्या रोज निरपेक्षवृत्तीने करावे लागेल. कामकाज करत असताना कमीजास्त येणारा वाईटपणा झेलावाच लागेल. श्रीदेव अंजनेश्वर समोर ठेवून कामकाज झाले की कोणतीही अडचण येणार नाही. व्यवस्थापनसमितीचे गठन झाले नसले तरी समिती गठीत करण्याचा विचार कायम ठेवला आहे अशा पद्धतीने कामकाज करण्यासाठी तयार असणाऱ्या इच्छुकांनी अवश्य संपर्क साधावा असे आवाहन केलेले आहे.

श्रीदेव अंजनेश्वर देवस्थानचे कामकाज उजेडी ठेवणे, समस्त देणगीदारांना माहिती देणे हे एक माझे कर्तव्य ठरते. या मध्ये मोठेपणा मिरवीण्याचा अजिबात विचार नाही. व तशी गरज मजला सुध्दा नाही.,.श्री देव अंजनेश्वर देवस्थानबाबतचे हिशोब,ऑडिट रिपोर्ट, वार्षिक अहवाल हे सारे सारे प्रसिद्ध करून मोकळे झाले की शंका शक्यतेला जागा रहात नाही.. पब्लिक ट्रस्ट आहे त्यामुळे प्रत्येक गोष्ट पब्लिक झाली पाहिजे. दडवून ठेवण्यासारखे इथे कांहीच असता नये. व्यवस्थापन समिती अशासाठी की या समितीमधील व्यक्तींना देवस्थानच्या दैनंदिन कामाची, सर्व उत्सवामधील कामांची आणि त्यामधील अडचणींची सांगोपांग माहिती होईल. आणि 'हे इतके सोपे नाही', हे त्यांच्याही लक्षात येईल..व्यवस्थापन समितीमध्ये कामकाज करणाऱ्यांना ३/४ वर्षांचा अनुभव आला की पुढील धोरण ठरवता येईल.शिस्तबद्ध पद्धतीने कामकाज करणे म्हणजे 'हुकुमशाही' 'मनमानी' असे फालतू शब्दप्रयोग कुणी एखाददुसरा करीत असेल तर त्याच्या कडे फार लक्ष देण्याची गरज रहात नाही. आपण निरपेक्ष भावनेने काम करत राहिले पाहिजे, एवढेच मला समजते. जो तो आपापल्या ठिकाणी बरोबर आहे,असे मी समजतो.. जास्त काय सांगणार!!!

**●धर्मशाळेच्या वरील मजल्यावरील गॅलरी दुरूस्ती –**

मित्रांनो, मागील धर्मशाळेच्या वरील मजल्यावरील गॅलरीची दुरुस्ती करून घेतली आहे. मंदिराच्या मागील धर्मशाळेच्या वरील मजल्यावर लावलेले लोखंडी पत्रे आणि त्याखालील लोखंडी सामान जवळपास २० वर्षांचे उनपाऊस खाऊन गंजले होते. पावसाळी झडीचे पाणी सभोवतालच्या गॅलरीमध्ये येऊ नये म्हणून धर्मशाळेच्या वरील मजल्याच्या तीन बाजूंनी हे लोखंडी पत्रे बसवलेले होते. सन २००३/०४ मध्ये मिठगवाणे ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असताना झालेले ते काम होते. 'कोकण पॅकेज' मधून धर्मशाळेचा वरील मजला बांधून मिळाला होता आणि त्या वेळी तीन बाजूंनी हे लोखंडी पत्र्याचे काम झाले होते. प्लॅन इस्टीमेट मध्ये नसताना त्यावेळी केवळ सलोख्याचे संबंध असल्यामुळे श्री. गनी हसन मुलाणी या कॉन्ट्रॅक्टर यांनी ते लोखंडी पत्र्याचे काम करून दिले होते. सर्व साहित्य गंजल्यामुळे बदलावे लागले. जवळपास ११० फूट लांब आणि ६ फूट रूंद आकारमानाची पत्राशेड तीनही बाजूंनी झाली आहे. यामध्ये श्री.नवनाथ आडिवरेकर यांनी सर्व वेल्डिंगचे काम केले. सोबत श्री.नरेश कांबळी, श्री.अनंत गडगेकर, श्री.दीपक नाटेकर सहाय्यक म्हणून होते. तसेच श्री.दत्ताराम जगन्नाथ ऊर्फ बाळू पाटणकर यांची निस्वार्थी देखरेख होती ..सर्व काम ४/५ दिवसांत झाले..दिवसातून दोनतीन वेळा जाणे व्हायचे. सर्व साहित्य साहिल ट्रेडर्स,नाटे आणि अनाजी ट्रेडर्स, चिरेखणी मिठगवाणे यांच्या कडून खरेदी करून आणलेले होते. खर्चाची सर्व अदाई क्रॉस चेक द्वारे झाली आहे. हजेरीपटावर सर्व मजूरीची नोंद केली होती. त्यामुळे शंका शक्यतेला जागा नाही. 'एका सहीशिक्याने सर्व कामकाज व्यवस्थापन चालते' म्हणून हे असे सर्व सर्वांना कळवून ठेवलेले बरे वाटते. शंकेला जागा नको म्हणून.

**●वज्रलेपन–**

'वज्रलेपन करायचे आहे.' त्यासाठी एक धार्मिक प्रथेचा भाग म्हणून श्रीदेवाचा होकार तथा हूकुम घेण्याचे ठरले आहे. त्यासाठी एक जाहीर पत्र करून सर्वांना कळकळविले होते. 'श्रध्देचा भाग' असल्यामुळे श्रद्धेच्या मार्गातील सर्व पूर्तता आपण केली पाहिजे. ज्यांना ज्यांना शक्य असेल त्यांनी अवश्य येण्याचे करावे, असे आवाहन करण्यात आले होते. १५/२० मिनिटांचा कार्यक्रम असला तरी सर्व उपस्थितांच्या साक्षीने व्हायला पाहिजे, असा तो हट्ट होता. सर्वांना समजलेले असले पाहिजे आणि त्याबाबत सर्वांची मान्यता असली पाहिजे म्हणून पत्राचे प्रयोजन केले होते. 'झीज भरून काढणे', हा वज्रलेपन करण्यामागचा प्रमुख हेतू आहे. परंतु हे सर्व सर्वांच्या मान्यतेने झाले पाहिजे, अनेकांच्या उपस्थितीत झाले पाहिजे म्हणून हे पत्र प्रयोजन आहे.

मित्रांनो, काल सोमवार दिनांक ०३.०४.२०२३ रोजी संध्याकाळी ७.०० वा.आरती झाल्यानंतर श्रीदेव अंजनेश्वर आणि श्रीदेव कालभैरव यांच्या पिंडीवर 'वज्रलेपन' करण्याबाबत विस्ताराने सांगण्यात आले. यावेळी निवेली गावचे खोत श्री. शशिकांत विठ्ठल तथा राजाभाऊ परांजपे, माडबन गावचे खोत श्री. समीर गवाणकर, बाकाळे गावचे खोत श्री. पवन बाळाजी परांजपे तिवरांबी गावाचे खोत श्री. मधुकर शंकर जोशी, गावचे पोलिस पाटील श्री. गजानन गोपाळ भोगले देवस्थानचे माजी विश्वस्त श्री. नारायण हरी तथा नाना देसाई , श्री. दत्ताराम जगन्नाथ तथा बाळू पाटणकर, तसेच कुळकर्णी भुस्कुटे आदी मानकरी मंडळी, काजवे, कांबळी, मटकरी, प्रिंदावणकर, लिंगायत आदी सेवेकरी मंडळी माडबन गावचे भाविक भक्त , आरती साठी उपस्थित सर्व मंडळी तसेच गोव्यातील भुस्कुटे परिवारातील सदस्य, आदींच्या उपस्थितीत मंडळींना वज्रलेपनाबाबत विस्ताराने सर्व काही सांगून झाले. वज्रलेपना साठी देवाची आज्ञा घेणे, हुकुम घेणे हा कार्यक्रम झाला. वज्रलेपना साठी 'देवाचा होकार' सर्वांना सांगण्यात आला. यासाठी उपस्थित असलेल्या सर्वांच्या नावासह स्वाक्षऱ्या प्रोसिडिंग मध्ये घेण्यात आल्या. एकूण उपस्थित असलेल्यांपैकी ४१ उपस्थितांनी प्रोसिडिंग मध्ये आपापले नाव नोंदवून स्वाक्षऱ्या केल्या. उपस्थित सर्वांचे फोटो काढून ठेवण्यात आले. वज्रलेपन करण्यासाठीचे कारागीर शोधणे हे पुढील कारवाई सुरू करण्यात आली आहे. वज्रलेपनाबाबत कुणाच्या काही विशेष सूचना, अभिप्राय अथवा अनुभव असतील तर त्यांनी ते लेखी पत्र स्वरूपात आगामी पंधरा दिवसांत कळण्यास हरकत नाही. निश्चितपणे विचार होईल. हे वज्रलेपनाचे कामकाज घाईगडबडीत करायचे नाही, असे पक्के ठरविले आहे. त्यामुळे वज्रलेपन करण्यापूर्वी सर्वांना लेखी सूचना अथवा लेखी अनुभव सांगण्याची सोय ठेवलेली आहे. कोणतेही महत्त्वाचे कामकाज करत असताना सामुदायिक निर्णय महत्त्वाचा असतो. तसेच दैवी आज्ञा सुद्धा महत्त्वाची असते. मागाहून सूचना उपयोगी ठरत नाहीत. कामकाज सुरू असताना किंवा ऐखादे कामकाज सुरू करण्यापूर्वी सूचना अथवा अभिप्राय समजले तर कामकाजामध्ये दुरुस्ती अथवा बदल करता येतात. एकदा कामकाजाची निश्चिती झाली की त्यामध्ये बदल करणे अवघड होऊन जाते. त्यामुळे या वज्रलेपनाबाबत कुणाच्या काही सूचना असतील, अनुभव असतील अथवा काही महत्त्वाचे अभिप्राय असतील तर त्यांनी जरूर ते लेखी स्वरूपात पाठवावेत. 'श्रद्धेची कामकाजे श्रद्धेच्या मार्गाने झाली पाहिजेत'. 'श्रद्धेमधील संबोध लक्षात घेऊन सर्व काही झाले पाहिजे.' तसेच करण्याचा विचार आहे, असे सांगितले होते. वज्रलेपनाबाबत श्रीदेवाचा होकार मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही सुरू केली होती. पुणे येथील प्रसिद्ध वज्रलेपनाचे कामकाज परंपरेने करणारे कारागीर श्री.प्रसाद चंद्रकांत परब यांना बोलावले होते. सोमवार दिनांक १७ रोजी संध्याकाळी ४ वाजता मंदिरात येऊन श्रीदेव अंजनेश्वर आणि श्री देव कालभैरव येथे वज्रलेपन करण्यासाठीची पहाणी, तपासणी ते करणार होते. त्या नंतर संध्याकाळी ७ च्या आरती झाल्यावर ते उपस्थित सर्वांना वज्रलेपनाबाबत सविस्तर माहिती देणार होते. यासाठी सर्व संबंधितांना नोटीस करून बोलाविण्यात आले होते. 'वज्रलेपन' हा उपचार सर्वांच्या उपस्थितीत विस्ताराने लक्षात आणून देणे, त्या बाबत योग्य मार्गदर्शन मिळविणे आणि वज्रलेपन कधी करायचे या बाबतचा निर्णय घेणे आदी चर्चा विमर्श होणार होता. तरी सर्वांना उपस्थित रहाता यावे म्हणून नोटीस प्रसिद्ध केली होती. 'वज्रलेपन' हा उपचार होत असताना कुणाला कळवले नाही, परस्पर घिसाडघाईने कामकाज उरकून टाकले असे होऊ नये म्हणून हे लेखी कळविले होते. श्रध्देचा भाग असल्यामुळे कोणत्याही स्वरूपाची घाई गडबड होणे योग्य नाही. सर्व सहमतीने व्हायला पाहिजे, असा तो विचार होता. एवढे सर्व करून भविष्यात 'कुणी एखादा उपसला' त्याची जबाबदारी सामुहिक रहाते, एकट्याची रहात नाही, उत्तरदायित्व सामुदायिक रहाते. म्हणून हे सर्व करणे आवश्यक होते. 'हुकुमशाही, मनमानी' असले शब्दप्रयोग करण्यासाठी जागा उपलब्ध होऊ नये म्हणून हे सर्व काही केले होते. सोमवार दिनांक १७ रोजी वज्रलेपनाबाबत पुनश्च चर्चा विमर्श करण्यात आला होता. खोत सेवेकरी मानकरी देणगीदार यांच्या उपस्थित ही चर्चा पार पडली होती. वज्रलेपनाबाबत देवाची आज्ञा सोमवार दिनांक ०३ एप्रिल २३ रोजी घेतली होती आणि सोमवार दिनांक १७ एप्रिल २३ रोजी हे चर्चा विमर्श करण्याचे प्रयोजन केले होते. दोन्ही वेळेस सोमप्रदोषाचा मुहूर्त साधला गेला. यावेळी पुण्याचे प्रसिद्ध शिल्पकार श्री.प्रसाद चंद्रकांत परब यांना निमंत्रित करण्यात आले होते. अंजनेश्वर

आणि कालभैरव मंदिरामध्ये वज्रलेपन प्रक्रियेबाबतची विस्तृत माहिती आणि त्याबाबतचे मार्गदर्शन त्यांनी केले होते. वज्रलेपनासाठी एकूण कालावधी किती दिवसांचा असेल याबाबतची माहिती दिली होती. त्यांनी आपला बायोडाटा दिला होता. त्यांच्या सोबत आलेल्या श्री. सिन्नरकर गुरूजींनी वज्रलेपनापूर्वीचा धार्मिक कार्यक्रम आणि वज्रलेपनानंतरचा धार्मिक विधी कशा पद्धतीने केला जातो याची माहिती दिली होती. श्रध्देचा भाग असल्यामुळे वज्रलेपन प्रक्रियेबाबत विस्तृत माहिती सर्वांना देणे, धार्मिक उपचारांची माहिती देणे हा त्यामागचा हेतू होता. सर्वांना 'शंका निरसन' करण्याची संधी दिली होती. जेणेकरून मागावून अकारण कुणीही बोल लावू नये, दोष काढू नये. सामान्यपणे खर्चाचा तपशील त्यांच्या कडून लक्षात घेतला होता. प्रत्यक्ष वज्रलेपन आणि धार्मिक कार्यक्रम याच्या एकूण खर्चाचा अंदाज आला. होता. श्री देव अंजनेश्वर देवस्थान हा पब्लिक ट्रस्ट असल्यामुळे सर्व काही सर्वांना समजले पाहिजे, हे सूत्र त्यामधील महत्वाचे होते. सर्वांना पुणे येथील प्रसिद्ध शिल्पकार, वज्रलेपन करणारे कारागीर श्री.प्रसाद चंद्रकांत परब यांचा उपलब्ध बायोडाटा शेअर केला आहे होता. श्री. भिकाजी यशवंत लिंगायत यांनी वज्रलेपनास विरोध नोंदविलेला आहे. बाकी कुणीही विरोध दर्शविलेला नाही.

**● श्री देव अंजनेश्वर पथदीप योजना –**

रामनवमी दि.३० मार्च २०२३ च्या मुहुर्तावर श्री देव अंजनेश्वर देवस्थानमार्फत मिठगवाणे गावच्या महत्त्वाच्या रस्त्यावर संध्याकाळी ७.०० ते रात्री १२ पर्यंत पाच तासांसाठी नियमितपणे लख्ख प्रकाश असावा या हेतूने 'पथदीपयोजना' उभारणी चे काम सुरू केले आहे पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप (PPP) च्या धरतीवर ही पथदीप योजना श्रीदेव अंजनेश्वर देवस्थान मार्फत सुरू करण्यात आली असून मे महिन्या पर्यंत एकूण १९ छोटे छोटे हायमास्क सारखे टॉवर उभारून संध्याकाळी ठीक ७.०० वाजता पथदीप नियमितपणे सुरू झाले आहेत आणि रात्री ठीक १२.०० वाजता बंद होत आहेत. प्रत्येक ठिकाणी सामान्यपणे १०० वॅट चे दोन एल ए डी लँप पॅनल, एका १०/१२ फूट उंचीच्या स्टील स्केअर बारला जोडले आहेत.याला प्रत्येक ठिकाणी 'टायमर यंत्रणा' बसवण्यात आल्यामुळे लाईट नियमित वेळेवर सुरू होणे आणि वेळेवर बंद होणे शक्य झाले आहे. सर्व मटेरियल दोन वर्षं वॉरेंटीचे घेतले आहे. ह्या पथदीपांसाठी लाईट सप्लाय उपलब्ध घरा घरातून घेतलेला आहे. चांगल्या दर्जाची केबल वापरून हा सप्लाय घेतला आहे. त्या त्या ठिकाणच्या ग्रामस्थांनी विज सप्लाय देण्याचे सहकार्य केले म्हणून हे शक्य झाले आहे. पथदीपांसाठीवीज पुरवठा करणाऱ्यांना रोजचे एक युनिटचे विज भाडे लक्षात घेऊन मासिक वीजभाडे ,'अंजनेश्वर पथदीप मानधन' म्हणून देण्यात यत आहे. सामान्यपणे प्रतिमहाचे ''पथदीप मानधन' वीजपुरवठा करणाऱ्यांच्या बँक खात्याला नियमितपणे ट्रान्स्फर होण्याची व्यवस्था केली आहे. आणि हे मानधन नियमितपणे आणि अखंडितपणे देता यावे म्हणून तशी पुरेशी तरतूद करून ठेवली आहे. प्रत्येक पथदीप वीजपुरवठा करणाऱ्याच्या कंपाऊंडच्या आत उभा करून प्रकाश रस्त्यावर लख्खपणे पडेल अशी सोय केली आहे. आवश्यक झाडी तोडून हे सर्व केलेले आहे. श्रीदेव अंजनेश्वर देवस्थानमार्फत ही पथदीप योजना अगदी धाडसाने राबवलेली आहे. त्यामुळे ह्या मध्ये आपणा सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. दानशूर देणगीदारांनी या पथदीप योजनेसाठी देणगी दिली आहे..ती रक्कम मुदतठेव मध्ये गुंतवणूक करून त्याचे फक्त व्याज यासाठी वापरण्यात आले आहे. मंदिराकडे येणारे प्रमुख रहदारीचे रस्त्यावर हे पथदीप टॉवर उभारून झाल्यावर गावातील वाडी वाडी मध्ये सुद्धा एक दोन पथदीप टॉवर उभारण्याचे नियोजन आहे. यामध्ये देणगीदारांनी अजून देणगी दिली तर या योजनेचा विस्तार बारा वाड्यामध्ये क्रमाक्रमाने करण्याचा विचार आहे अर्थात हे सर्व 'जुगाड' पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीपच्या माध्यमातून करायचे असल्यामुळे लोकसहभाग आणि सहकार्य महत्त्वाचे आहे. घरगुती विजपुरवठा (Domastic supply) उपलब्ध करून देणे व उभारणीसाठी सहकार्य करणे ही बाब अंजनेश्वर श्रद्धेपोटी झाली तर या पथदीप योजनेचा विस्तार निश्चितपणे करता येईल. अर्थात मेंटेनन्स आदी सर्वांचा विचार करून विस्तार क्रमाक्रमाने करता येईल 'अंजनेश्वर पथदीप योजना' म्हणून देणगीदारांची देणगी स्वीकारली की योजना नीटपणे राबवणे एक मोठी जबाबदारी तयार होते. विद्युत मंडळाची तक्रार यऊ नये म्हणून सर्व काही शक्यतोवर नियमात करावे लागत आहे.अभिनव योजना आहे.चुका झाल्या तर दुरूस्त करता येतील.

देवस्थानमार्फत धाडसाने एखादा उपक्रम अथवा योजना राबवताना लोकांची साथ, लोकसहभाग आणि मनस्वी सहकार्य महत्त्वाचा असतोच असतो. अंजनेश्वर देवस्थान यामध्ये संपूर्ण खर्च करणार असल्यामुळे त्याची उचित प्रसिद्धी करणे हे एक कर्तव्य आहे. त्यामुळे प्रत्येक पथदीपाच्या टॉवरवर 'श्रीदेव अंजनेश्वर देवस्थानच्या सौजन्याने' असा छोटा फलक लावण्यात येणार आहे. थोडक्यात ही पथदीप योजना शासनाची, ग्रामपंचायतीची समजण्यात येऊ नये. देवस्थान स्वनिधीतून ही योजना सुरू करण्यात आली आहे आणि त्यामुळे आवश्यक प्रसिद्धी देणे बंधनकारक आहे. पथदीप योजना उभारणी मजुरी खर्च देऊन केलेली असली तरी अनेकांनी या मध्ये मेहनत घेतली आहे. श्री.गिरीष धनावडे, श्री.नरेश विठ्ठल कांबळी, श्री.सय्यद हसोळकर, श्री.नवनाथ आडिवरेकर, श्री.अनंत गडगेकर, सुवर्णवाडीतील युवक मित्रांनी मनस्वी मेहनत घेतली आहे. मित्रांनो, अंजनेश्वर देवस्थानमार्फत रस्त्यावर पथदीप योजना राबविणे हे काहीसे धाडसाचे आहे. म्हणून तर पथदीप योजनेचे एकूण स्वरूप विस्ताराने लिहिले आहे. एक एल ए डी पॅनल सामान्यपणे रु.२२००/– पर्यंत खर्चाचे आहे. एका ठिकाणी दोन एल ए डी पॅनल बसवून केबल आणि टायमर यंत्रणा बसवून स्केअर बार मजूरीसह एक लाईट टॉवर उभारणी सामान्यपणे रु.९/१० हजार पर्यंत जाते आणि त्यासाठी मासिक विजभाडे द्यायचे आहे. हे सर्व सांगितले की 'अंजनेश्वर पथदीप योजना' कशा पद्धतीने राबवली जात आहे आणि त्याचा खर्चाचा अवाका लक्षात येईल. आणि हे सर्व रकान्यात बसवून केलेले आहे. सर्व खर्च क्रॉस चेक द्वारे आणि बँक ट्रान्स्फर द्वारे होणार असल्याने फार कुठे जास्त समजावण्याची गरज पडणार नाही. धाडसाने, पुढाकाराने आणि शिस्तबद्ध पद्धतीने कामकाज करणे म्हणजे 'हुकुमशाही' नाही आणि 'मनमानी' तर नाहीच नाही. हे सर्व अंजनेश्वर चरणापाशी रुजू आहे. बरे वाईट त्यांनी ठरवले पाहिजे.

**●प्रवेशद्वार भूमिपूजन–**

अक्षय्यतृतीयेच्या मुहूर्तावर अंजनेश्वर मंदिराकडे येणाऱ्या मार्गावर आरसीसी प्रवेशद्वार उभारण्यासाठीचा शुभारंभ करायचे ठरवले होते. तसेच अंजनेश्वर जमीन मालमत्तेला 'संरक्षक कंपाऊंड वॉल' उभारणी करायचे ठरवले आहे. चाफा स्टॉप ते अंजनेश्वर घाटी हा रस्ता क्रॉंक्रीटचा करून घ्यायचा आहे. मुबलक पाण्यासाठी दोन मोठ्या विहिरी खोदाई करून बांधकाम करायचे आहे. एकूण ४५ हेक्टर ( ११२ एकर) देवस्थान जमिनीपैकी बरीचशी जमीन लागवडीखाली नाही, पडीत आहे. संरक्षण कंपाऊंड वॉल आणि पाण्याच्या विहिरी केल्या तर जमीन लागवडीखाली येईल. अर्थात हे सर्व शासकीय अनुदानातून आणि देवस्थान स्वनिधीतून होऊ शकेल. यासाठी अक्षय्यतृतीयेचा शुभ मुहूर्त निवडला होतो आणि त्याचे निमंत्रण या सोबत दिले होते. या कामांचा शुभारंभ मान्यवर मंडळींच्या प्रमुख उपस्थितीत करायचा होता. तसेच निमंत्रित मान्यवरांचे सहकार्य घ्यायचे आहे. संरक्षक कंपाऊंड वॉल झाली तर 'सोलर ग्रीड 'ची सुद्धा उभारणी करता येईल. की जी योजना देवस्थानसाठी उत्पन्नाचे साधन होईल. धाडसाने, पुढाकाराने केले पाहिजे आणि सर्वांचे सहकार्य मिळाले तर ते अधिक गतीने होईल. मजबुतीचे प्रयत्न तर करणार आहेच. यशस्वी होणे परमेश्वराने ठरवायचे. चांगल्या कामाला सुद्धा विरोध होत असतो. निरपेक्ष भावनेने केलेले काम सद्धाा विरोधाची झालर घऊन येते. आपली 'निरपेक्षता' आणि 'समर्पण' अभंग ठेवले की विरोधी विरोध करत रहातात व आपल्याला पुढे पुढे जाता येते. अंजनेश्वर जमिनीचा ८ अ खाते स्वतंत्र झाला आहे.एकूण ३२४ सर्व्हेनंबर आहेत. ४५ हेक्टर म्हणजे ११२ एकर जमीन आहे. रु.४९०.९५ जमीन दस्त अंजनेश्वर देवस्थान मार्फत भरणा होतो आहे. जमीन देवस्थान इनाम वर्ग ३ ची आहे. तशी नोंद गाव दप्तरी झालेली आहे. राजापूरचे माजी प्रांताधिकारी श्री. प्रविण खाडे साहेब यांनी ह्यासाठी लेखनदोष दुरुस्ती तहसीलदार राजापूर यांच्या कडून करून घेऊन सर्व जमिनींच्या नोंदी देवस्थान इनाम वर्ग ३ मध्ये करून घेतल्या आहेत. श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे या ट्रस्टचे नाव भोगवाटदार रकान्यात नोंदलेले आहे. मातीची जमीन वर्षानुवर्षे पडक्षेत्र ठेवणे योग्य नाही म्हणून पुढाकार घेऊन सुरु वातीला संपूर्ण जमीन क्षेत्राला संरक्षक कंपाऊंड वॉल आणि पाण्याच्या विहिरी करण्याचे नियोजन केले आहे. सन २०२७ मध्ये अंजनेश्वर देवस्थान ट्रस्ट ला ७५ वर्ष पूर्ण होणार आहेत. त्यामुळे २०२३ ते २०२७ या कालावधीत हे मार्गी लागले तर हे काम देवस्थान इतिहासात लँडमार्क ठरेल.

प्रवेशद्वार भूमिपूजन कार्यक्रम–शनिवार २२ एप्रिल २०२३ रोजी अक्षय्यतृतीयेच्या शुभमुहूर्तावर चाफा बसस्टॉपजवळ आरसीसी प्रवेशद्वार बांधकाम करण्याचा शुभारंभ करण्यात आला. श्री. दत्ताराम जगन्नाथ ऊर्फ बाळू पाटणकर यांच्या शुभहस्ते भूमिपूजन समारंभ संध्याकाळी ६.०० वाजता संपन्न झाले. श्रीदेवाच्या मंदिरामध्ये श्रीदेवाला सांगून तासेवाजंत्री घेऊन उपस्थित सर्व सेवेकरी मानकरी खोतमंडळी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. अंजनेश्वर जमीन क्षेत्राला दगडी चिऱ्यांचे कंपाऊंड वॉल आणि पाण्यासाठी दोन विहिरी खोदाई करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. सुमारे ४५ हेक्टर क्षेत्र म्हणजे जवळपास ११२ एकर जमीन क्षेत्र लागवडीखाली आणण्यासाठी, उपजावू करण्याचा हा 'संकल्प' आहे. नारळ, सुपारी, काजू, आंबा, केळी मसाला पिके, आर्दीसह चिकू, लिंबू, अननस अशी पिके. तसेच दूधी, भोपळे, कलिंगड अशा तऱ्हेच्या उत्पादनासाठी ही जमीन जागा उपलब्ध होणार आहे. गोंडा, गुलाब, जरबेरा सारखी फूलपिके इथे शक्य आहेत. जमीन जागा मुबलक पाण्याची आणि विस्ताराने मोठ्या प्रमाणात असल्याने कांहीच अशक्य नाही. सर्व शक्य आहे. फक्त 'इच्छाशक्ती' पाहिजे. या जमीनीमध्ये सर्व काही शक्य होणार आहे अशक्य असे काहीच नाही. सोलर ग्रीड उभारून वीज उत्पादन करण्यासाठी सुध्दा हे ठिकाण मोक्याचे आहे. सर्व शक्य आहे. अशक्य नाही. 'सहकार्य, समर्पण आणि खंबीर विश्वास' ठेवला तर सर्व काही शक्य आहे. येथे अशक्य असे काहीच नाही. रोहयो योजना, ठिबक सिंचन योजना, मुख्यमंत्री सोलर ग्रीड योजना आदी सर्व शक्य आहे. गरज आहे ती 'मजबूत पाठबळाची' 'अंजनेश्वर' या नावात प्रचंड उर्जा भरलेली आहे. त्यावर निष्ठा आणि श्रद्धा ठेऊन हे काहीसे अवघड काम हाती घेतलेले आहे. वर्षानुवर्षेपडक्षेत्र ठरलेली अंजनेश्वरची जमीन जागा उपजावू करणे ही बाब वाटते इतकी सोपी नाही आणि सहज नाही. खूप दगडधोंडे आहेत!!!. हे सर्व बाजूला सारून काम करायचे आहे. मित्रांनो... हे काम श्री देव अंजनेश्वरच्या समग्र इतिहासातील 'लँडमार्क' कामकाज होईल. अनेक योजना, अनेक इनोव्हेटिव्ह उपक्रम इथे राबवता येतील. अनेकांना कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध होईल. या उपक्रमाचे भविष्य उज्ज्वल आहे आणि दैदिप्यमान आहे. फक्त गरज आहे 'संपूर्ण सहकार्याची'. गरज आहे 'दृढ विश्वासाची' दगडधोंडे भरपूर आहेत. परंतु ते सर्व निश्चितपणे बाजूला सारून हे सर्व काही होईल. ईश्वर इच्छाच तशी आहे. 'मागे वळून पाहू नकोस. मी काय ते पाहून घेईन, काम करत रहा', असे तो त्यांचा शब्द आहे... मित्रांनो... तुम्हाला सांगून काम सुरू केले आहे. सर्व काही उजेडी ठेवले आहे.

**● दानपेटी स्थापना मुहूर्ताई मंदिरी –**

अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर म्हणजे शनिवार दिनांक २२ एप्रिल २०२३ रोजीच्या सुमुहूर्तावर श्रीदेवी मुहूर्ताई मंदिरात दानपेटी बसविण्यात आली आहे. 'देव तेथे दान आणि दान तिथे दानपेटी' हे ते सूत्र. भक्त वर्गाला निनावीदेणगी(Anonymous donation) देण्याची सोय म्हणजे दानपेटी. कितीही रक्कम दानपेटीमधून देता येते आणि यासाठी कोणतीही कायदेशीर अडचण येत नाही. म्हणून दानपेटी बसवण्याचे प्रयोजन केले आहे. श्री देव अंजनेश्वर मंदिरात दानपेट्या बसवण्यात आल्या, श्रीदेवी भराडणी मंदिरामध्ये दानपेटी बसवण्यात आली. आणि श्रीदेवी मुहूर्ताई मंदिरात दानपेटीची सुविधा नव्हती ती भक्तांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. देणगीपावतीने नावे देणगी देता येते परंतु ज्या भक्तांना निनावी देणगी देण्याची इच्छा असते ती दानपेटी शिवाय पूर्ण होऊशकत नाही. आणि म्हणून ते बसवण्याचे प्रयोजन आहे. एका ठिकाणी दानपेटी बसविली आणि दुसऱ्या ठिकाणी बसवली नाही तर अकारण शंका शक्यतेला जागा तयार होते. म्हणून समानतेचे सूत्र.' principal of parity' लक्षात घेऊन दानपेटी बसवण्यात आली आहे. दानपेटी जमा रक्कम नियमितपणे बँक खात्याला जमा होत राहील. आणि ते वेळोवेळी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले जाईल. हा दानपेटी निधी स्वतंत्रपणे ठेऊन त्या निधीचा विनियोग केवळ धार्मिक कार्यक्रम करण्यासाठीच केला जाईल. दानपेटीची घडावट मे. गोखले ब्रदर्स कोल्हापूर यांच्या मार्फत करून घेतली आहे. प्यूअर स्टिल मध्ये दाक्षिणात्य मंदिरातील दानपेटी सारखी ही घडावट आहे. दानपेटी पोस्टाच्या पेटीसारखी असून तीन कुलुपांची सुविधा आहे. सीसीटीव्ही कॅमेरा बसवण्याचे नियोजन केले आहे. जेणेकरून ती दानपेटी अधिक सुरक्षित होईल. श्रीदेवी मुहूर्ताईचा वार्षिक नवरात्र उत्सव प्रतिवर्षी मोठ्या उत्साहाने साजरा होत आहे. खर्चाचे रकान्यात वाढ होत आहे. स्वतंत्र ट्रस्ट करणे हे काहीसे अडचणीचे होते. श्रीदेवीचे सोन्याचांदीचे दास्तान अंजनेश्वर दरबारी सुरक्षित असते.वीजबिलापासूनचा सर्व

दैनंदिन खर्च अंजनेश्वर देवस्थान मार्फत होत असतो. ५/६ वर्षामागे मंदिराची दुरु स्ती सुद्धा अंजनेश्वर देवस्थान मार्फत झाली आहे. त्यामुळे जमाखर्चाचा मेळ घालायचा असेल आणि त्या त्या मंदिरांची ऊर्जितावस्था टिकवून ठेवायची असेल तर त्या त्या मंदिराच्या ठिकाणी दानपेटी बसवणे हे अपरिहार्य ठरते. आणि म्हणून हे दानपेटीचे प्रयोजन आहे. या दानपेटीच्या माध्यमातून नावे देणगी देता येईल. देणगीची रक्कम पाकीटबंद करून संपूर्ण नाव पत्ता, पिनकोड, फोन लिहून दानपेटी मध्ये जमा केली तर देणगीपावती यथावकाश पाठवली जाईल. मित्रांनो,. दानपेटी बसवताना पुजारी वर्गाचा अकारण रोष ओढवून येतो. परंतु तो निरर्थक असतो. परंपरागत जी व्यवस्था असते ती बंद करण्याचा विचार सुद्धा नसतो. प्रगतीमध्ये, उंबरठ्यावर, देवतेच्या पुढ्यात जे उघड्यावर दान ठेवले जाते ते पुजारीच उचलतो. हे सर्व ठिकाणी प्रचलित आहे. ते ट्रस्ट मध्ये कधीच जमा होत नाही. ऑडिट अकाऊंटीगच्या वेळी मंदिरात दानपेटी बसवली आहे अगर कसे हे विचारले जाते. दानपेटी बसवली नाही तर का बसविली नाही हा प्रश्न विचारला जातो. त्यापेक्षा महत्त्वाचा मुद्दा असा की भक्तांना निनावी देणगी (Anonymous donation ) देण्याची सोय उपलब्ध करून दिली आहे की नाही हा आहे. निनावी दान देणे हा भक्ताचा अधिकार आहे आणि ते निनावी दान कायदेशीर पद्धतीने स्वीकारणे हे ट्रस्टींचे कर्तव्य बनते. एखाद्या भक्तांने रु. ५/१० लाख निनावी देणगी रोखीने द्यावयाची ठरवली तर दानपेटी शिवाय अन्य कोणताही राजमार्ग नाही. तसेच एखाद्या भक्ताला २/५ रूपये द्यायचे आहेत, ५० रूपयांच्या आत देणगी रक्कम द्यायची आहे, त्याला देणगीपावती देणे ट्रस्टला शक्य होत नाही. अशांसाठीही दानपेटी हाच सर्वोत्तम पर्याय ठरतो. आयकर कायदा लक्षात घेतला तर निनावी देणगी (Anonymous donation) स्वीकारण्यासाठी दानपेटी अपरिहार्य आहे, हे ही लक्षात घेतले पाहिजे. सुदैवाने श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे हा ट्रस्ट १००% धार्मिक ट्रस्ट म्हणून आयकर विभागाकडे नोंदला गेला आहे आणि त्यामुळे सर्व जमा आयकर मुक्त आहे. दानपेटीमधून रोखीने झालेली सर्व जमा रक्कम आयकर मुक्त झालेली आहे. येथे विशेषतः हे नमूद केले पाहिजे की श्रीदेवी मुहूर्ताईच्या पूजाऱ्यांकडून कोणताही विरोध झालेला नाही अथवा कोणतीही हरकत आलेली नाही. समजूतदारपणा अंगी असला की विरोध होत नाही. मित्रांना, दानपेटी बसवणे हा एक धाडसी निर्णय आहे. अंजनेश्वर, मुहूर्ताई आणि भराडणी या तीनही मंदिरात दानपेट्या बसवण्यात आल्या आहेत. दानपेटी मधील सर्व जमा रक्कम ऑडिट अकाऊंटींग मध्ये येणार आहे. वेळोवेळी तपशील कळवला जाईल. दानपेटी मधील जमा दानाचा कारभार प्रामाणिक आणि पारदर्शक कारभार होत राहील. मित्रांनो, सर्व काही तुम्हाला कळवले की मला हलके हलके वाटते. भार हलका होतो. जबाबदारी वजनदार होत नाही, हलकी फुलकी होऊन जाते. म्हणून सारे सारे सांगून टाकायचे. 'उजेडी ठेवायचे' बाकी काही नाही.

● **दोन काचेच्या शोकेस–** श्रीदेव अंजनेश्वर मंदिराच्या मुकशाळेच्या भागामध्ये दोन काचेच्या शोकेस करून त्यामध्ये नव्याने बनविण्यात आलेले देवाचे सिंहासन आणि देवाची पालखी ठेवण्यात आली आहे.. महाराष्ट्र दिनाच्या दिवशी म्हणजे सोमवार १ मे २०२३ रोजी हे काचेच्या शोकेसचे काम पूर्ण झाले आणि त्या दिवसापासून पालखी सिंहासन ठेवण्यात आले आहे. सन २०२७ मध्ये या पालखी सिंहासनावर चांदीचा पत्रा लागणार आहे. त्यावेळी चांदीचे सिंहासन आणि पालखी ठेवायला योग्य जागा असली पाहिजे म्हणून अगोदरच ती सोय केली आहे. सध्या शिसवी लाकडातील पालखी सिंहासन त्या शोकेस मध्ये राहील जेणेकरून सर्वांच्या नजरेसमोर राहील. यासाठी घराघरांतून आर्थिक परिस्थितीनुसार, आर्थिक कुवतीनुसार निधी संकलन करता यावे म्हणून 'क्यूआर कोड' ची सोय करण्यात आली आहे. भाविक भक्तांना या क्यूआर कोड वरून पालखी सिंहासनासाठी लागणाऱ्या चांदीसाठी आपापली देणगी अगदी सहजपणे देता येईल. थोडक्यात हे पालखी सिंहासनासाठीचे हे 'प्रमोशन' आहे. सन २०२७ मध्ये जे चांदीचे सिंहासन आणि पालखी होणार आहे ती कशी असेल, त्याला किती चांदी लागेल याची ढोबळमानाने कल्पना यावी म्हणून हे प्रमोशन केले आहे. भविष्यात चांदीची पालखी सिंहासन बनल्या नंतर भाविक भक्तांना मंदिरात आल्यावर त्याचे सहजपणे दर्शन घेता येईल. बंदिस्त जागेत चांदीचे सिंहासन आणि पालखी ठेवण्यात येऊ नये म्हणून ही सोय अँडव्हान्स मध्ये केली आहे. या काचेच्या शोकेसचे डिझाईन तयार करून याची घडावट गावातील श्री. विकास मेस्त्री आणि श्री. समिर मेस्त्री यांनी केली आहे. पॉलीश कामासाठी अजून श्री. अनंत मेस्त्री यांची जोड मिळाली आहे.

लाकूड संपूर्ण सागवानी असून त्या मध्ये ट्रॉली व्यवस्था आहे की जेणेकरून पालखी सिंहासन सहजपणे बाहेर काढता येईल. वरील ग्लास वर्कचे काम 'धनलक्ष्मी ग्लास आर्ट, रत्नागिरी' यांनी केले आहे. दोन्ही शोकेस मध्ये एल ए डी लाईट लावून उजेडाची सोय केली आहे. जेणेकरून रात्री, उत्सव कालावधीत हे सिंहासन आणि पालखी ठळकपणे नजरेत येईल. मुकशाळेच्या खांबामध्ये या दोन्ही शोकेस बसल्यामुळे सुरक्षित झाल्या आहेत आणि दैनंदिन वावराला अडचण होईल अशा ठरणार नाहीत. मित्रांना, सन २०२७ मध्ये म्हणजे देवस्थान ट्रस्ट च्या ७५व्या वर्षी श्रीदेव अंजनेश्वर महाराजांना चांदीच्या पालखीतून फिरवायचे आहे आणि चांदीच्या सिंहासनावर विराजमान झालेले पहायचे आहे. यासाठी श्रीदेवाच्या बारावाड्यातील घराघरांतून शक्तीकुवतीनुसार निधी गोळा करण्याचे नियोजन आहे. रु. १०० पासून पुढे कितीही निधी या कामासाठी देता येईल. त्या निधीला देणगीपावती देता येईल. ज्यांना निनावी देणगी 'Anonymous donation' द्यावयाची असेल त्यांचेसाठी दानपेट्या आहेतच. ज्यांना चांदीच द्यायची असेल त्यांचेकडून चांदीची वीट स्वीकारली जाईल. फक्त चांदी देताना त्या चांदीची खरेदी पावती द्यावी लागेल. म्हणजे त्या आधाराने चांदीची देणगी पावती वस्तुरूप देणगी पावती करता येईल. सन २०२३ ते सन २०२६ च्या अखेर पर्यंत या साठीची देणगी स्वीकारता येईल. सन २०२७ मधील कार्तिकोत्सवामध्ये चांदीचे पालखी आणि सिंहासन वापरात येईल असे सामान्य पणे नियोजन आहे. २०२७ हे ट्रस्ट स्थापनेचे 'अमृतमहोत्सवी वष' आहे.. त्यानिमित्ताने आपणा सर्वांच्या उपस्थितीत पुन्हा मोठा कार्यक्रम होईल. सुवर्ण कलशारोहण कार्यक्रम जसा झाला त्यापेक्षाही थोडा 'अधिक उंच कार्यक्रम' करायचा बेत आहे. अर्थात हे नियोजन आहे. अंजनेश्वर ठरवील तसे होईल. या कामासाठी एकूण '१०० किलो चांदीचा संकल्प' आहे. देणगी रक्कम क्यूआर कोडच्या मदतीने बँकेत ट्रान्स्फर केल्यावर ९८२३२७७३२६ या मोबाईल नंबर ला पेमेंट स्क्रिनशॉट नाव गाव पत्ता लिहून पाठवला पाहिजे म्हणजे देणगीपावती बनवता येईल. मित्रांनो, सुवर्ण कलशाचे वेळी काहींना देणगी देण्याची इच्छा होती परंतु ती पूर्ण होवू शकली नव्हती. कारण कलशारोहण कार्यक्रम झाल्यानंतर सुवर्ण कळसासाठी देणगी स्वीकारणे योग्य ठरलें नसते आणि त्यामुळे त्या भाविकांची रक्कम स्वीकारता आली नाही. ते लक्षात घेवून चांदी जमवण्यासाठी अगदी दोन तीन वर्षांचे मार्जिन ठेवले आहे. जेणेकरून देणगी द्यायची इच्छा होती परंतु देता आली नाही, असे होणार नाही. मित्रांनो, सर्व सांगून टाकायचे म्हणजे मागे सांगायचे शिल्लक रहात नाही. असे झाले की 'मनमानी', 'हुकूमशाही' या शब्दांना थारा रहात नाही. कोणत्याही कामाचे पूर्वनियोजन झाले आणि ते सांगून टाकले की कुणाची सूचना असेल तर ती वेळीच आपल्यापर्यंत पोहोचेल. काही दुरुस्ती करणे उचित असेल तर करता येईल. याउपर कुणी महाभाग 'मनमानी हुकुमशाही' म्हणत असेल तर त्याचा अर्थ त्या महाभागाकडून समजाऊन घेतला पाहिजे.

**देणगी देण्यासाठी क्यूआर कोड :**

टिप– श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे
A/c no143710100000001
IFSC code- BKID0001437
MICR code 416013549

**BHIM BOI UPI QR**
**SCAN HERE TO PAY**
**WITH ANY BHIM UPI APP**

SHRI DEV ANJANESHWAR KASBA MITHGAVANE
boism-7038785001@boi
UPI | BHIM
Payment Through Any UPI App Accepted Here

हे बँक डिटेल्स दिले आहेत. या सहाय्याने एन ई एफ टी आदी सर्व काही शक्य आहे.

**● श्री देवी भराडणी दर्शनी बाजूची फरसबंदी आणि रेलिंग –**

मित्रांनो, श्री देवी भराडणी मंदिराचे रंगरूप हळूहळू बदलत आहे. अंजनेश्वर भेटीचे वेळी श्रीदेवी भराडणी मंदिराला अवश्य भेट दिली पाहिजे. सोमवार १५ मे २०२३ रोजी पासून मंदिराच्या आवाराच्या दर्शनी बाजूला दगडी फरस बसवण्याचे काम हाती घेतले होते.. ते पूर्णत्वास गेले आहे. सुमारे १२०० जांभा चिऱ्यांचे काम झाले. ६०/६५ रूपयांमध्ये रेती, +सिमेंट, +वाळू, +मजुरी, + जांभाचिरा इतके होते. सामान्यपणे गेल्या आठदहा दिवसात झालेल्या कामाचा ढोबळ अंदाज आपणा सर्वांना यावा. श्री. नरेश विठ्ठल कांबळी, श्री. संतोष दिनकर शिंदे, श्री. रामदास केशव रायकर, श्री. अनंत हरिश्चंद्र गडगेकर, श्री. राजाराम राणे, श्री. दिपक केशव नाटेकर, श्री. प्रमोद रघुनाथ शिंदे यांनी मजुरीने काम केले असले तरी ते अगदी मनापासून केले आहे. म्हणून त्यांच्या नावाचा उल्लेख रहावा म्हणून केला आहे. चिरे पुरवठा श्री. राजन कुवेसकर यांच्या कडून आणि सिमेंट रेती खडी पुरवठा श्री. भुषण शिवाजी जैतापकर याचे कडून झाला. यांचा उल्लेख अशा साठी की सर्व वाजवी किमतीत सर्व साहित्य पुरवले म्हणून. यामध्ये श्री. नरेश कांबळी यांची देखरेख विशेष उल्लेख करून सांगितली पाहिजे. तसेच श्री. दत्ताराम जगन्नाथ तथा बाळूशेठ पाटणकर यांची रोजची देखरेख होती. कुठे कमतरता राहिली तर ती दुरुस्त करून घेणे हे त्यांचे काम होते. हे सर्व अंजनेश्वर माध्यमातून चालू आहे, हेही सर्वांच्या कानोकानी असावे. फुलझाडे लागवड करता यावी म्हणून दगडी फरशी मध्ये जागा ठेवली आहे. रोजची झाडलोट करायला सुलभ व्हावे म्हणून सर्व काही केले आहे. मंदिरात एक सीसीटीव्ही कॅमेरा बसवला आहे. भाविक भक्तांना दानाची रक्कम अर्पण करता यावी म्हणून दानपेटी बसवली आहे. नित्य झाडलोट झाली पाहिजे म्हणून काही व्यवस्था केली आहे. मंदिर झाले इतक्यावर थांबता येत नाही. त्या मंदिराची नित्य देखभाल, झाडलोट, साफसफाई, दिवाबत्ती आदी सर्व काही झाले पाहिजे. श्री. प्रमोद उपळकर यांच्या कुटुंबीयांनी मनस्वी पुढाकार घेतला आहे. आणि त्यामुळे रोजची साफसफाई, झाडलोट शक्य होत आहे. विहिरीची खोदाई सुद्धा श्री. प्रमोद उपळकर, श्री. प्रकाश उपळकर, श्री. मनोज लिंगायत, श्री. पांडुरंग तांबे यांनी जिद्दीने कोणताही मजुरी खर्च न घेता पूर्ण केली आहे. या मे महिन्याच्या अखेरीला २ फूट पाणी झाले होते. मुबलक पाणी झाले होते. विहिरीची खोली जवळपास २० फुटापर्यंत झाली आहे. दर मंगळवारी भराडणी मंदिरात आरती सुरू आहे. संध्याकाळी ७.१५ ते ७.३० पर्यंत आरती असतात. २०/२२ची उपस्थिती असते. मंगळवार दिनांक ३० मे २०२३ रोजी या आरती मंडळामार्फत सत्यनारायण पूजेचे आयोजन केले होते. सोबत महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम संध्याकाळी ठिक साडेसहा वाजता सुरू होणार होता. भराडणी मंदिरामध्ये दानपेटी बसवली आहे. तसेच श्री देवी भराडणीसाठी द्यावयाची रक्कम अंजनेश्वरच्या बँक खात्याला ट्रान्स्फर करता येईल. क्यूआर कोडच्या मदतीने रक्कम ट्रान्स्फर करता येईल. सर्व जमा आणि सर्व खर्च श्रीदेव अंजनेश्वर देवस्थान मार्फत होत आहेत. रोखीने देणगी देण्यापेक्षा थेटपणे ऑनलाईन पद्धतीने रक्कम ट्रान्स्फर झाली तर ते जास्त भरौसेमंद होते. सर्व खर्च चेक द्वारे होतो. त्यामुळे कुणालाही बोलायला फारशी जागा रहात नाही. सर्व ऑडिट अकाऊंटीग खाली येते. मित्रांना, थोडेफार लिहून ठेवले तर ते फुकट जात नाही. लिहिलेले बंदिस्त न ठेवता ते वेळोवेळी ‘उघडे’ करून ठेवले तर ते भविष्यात उपयोगाचे ठरते. आत्ता जरी कुणी वाचले नाही तरी असे लिखाण आपल्याला वाचवते. आणि म्हणून असे लिहिणे मजला श्रेयस्कर वाटते. कधी कधी वाटते की आपण आपल्या कार्याची प्रसिद्धी करणे योग्य नाही. अशा मुळे पुण्य हरपते. पुण्याची गणना होत नाही. परंतु दुसरी बाजू लक्षात घेतली तर असे वाटते की एक वेळ पुण्य गाठी पडले नाही तरी चालेल, कुणी आत्मप्रौढी म्हटले तरी चालेल परंतु आपण वेळोवेळी झालेल्या कामाचा, कार्यक्रमाचा तपशील लिहून ठेवला पाहिजे असेच वाटते. लिखाण भविष्यात उपयोगी ठरते, कागद उपयोगी पडतात, माणसे उपयोगात येत नाहीत. कामकाजामध्ये सहभागी होणाऱ्या लोकांचे त्या त्या वेळचे संदर्भ लिखाणामुळे जिवंत रहातात. ‘नायबा... नकळेबा’ असे होत नाही. इतिवृत्त, प्रोसिडिंग लिहिले गेले की १५/२० वर्षानंतरही सर्व पुन्हा जिवंत करता येते. ठणकावून सांगता येते. म्हणून हे सर्व काही. मग कुणी काही म्हणो.

**● भराडणी देवी व्हाटस्अप ग्रुप –**

मित्रांना, ‘श्री भराडीण देवी’नावाचा व्हाटस्अप ग्रुप करण्यात आला आहे. श्री. प्रमोद शांताराम उपळकर (मोबा.

नंबर ९४०४०१७७०५) या व्हाटस्अप ग्रुप चे एडमिन आहेत. देवीच्या मंदिरातील कार्यक्रम सर्वांपर्यंत कळावेत हा तो हेतू आहे. भराडणी मंदिराचा नावलौकिक वाढावा म्हणून हे सर्व काही केलेले आहे. श्री देवी भराडणी मंदिरामध्ये सत्यनारायण पूजा, हळदीकुंकू आणि महाआरतीचा कार्यक्रम झाला. सामान्यपणे एकूण ५००/६०० भाविकांनी तीर्थप्रसादाचा लाभ घेतला. संध्याकाळच्या ७.०० वाजताच्या 'महाआरती'ला सुमारे ३००/३५० भाविकांची उपस्थिती होती. सत्यनारायण पूजेला श्री. प्रमोद उपळकर सपत्नीक बसले होते. निमकर गुरूजींनी सत्यनारायणची पूजा सांगितली. 'नातिसंक्षेप नातिविस्तार', असे सर्व होते. महाआरती संध्याकाळी ठिक ७.०० ते ७.३० पर्यंत. कंटाळवाणे असे काही नाही. गिरीश धनावडे यांनी मंदिराच्या आवारात रोषणाई केली होती. ध्वनीव्यवस्था ही केली होती. सर्व भाविकांना तीर्थप्रसाद वाटप आणि चहापान होते. रात्री अकरा साडेअकरा पर्यंत भजनसेवा झाली. एकूण छोटेखानी कार्यक्रम झाला, सुटसुटीत झाला, नियोजनबद्ध झाला. सत्यनारायण पूजेमधील जमा दान देवीच्या दानपेटीमध्ये जमा झाले. मित्रांनो, श्री देवी भराडणी मंदिरामध्ये या वर्षी सर्व सुधारणा झाल्या. मंदिर दुरुस्ती, रंगरंगोटी झाली. गोल आडाची (विहिर) खोदाई झाली. पाणीयोजना झाली. तटबंदी, फरसबंदी आदी सुमारे ६००० जांभ्या चिऱ्यांचे बांधकाम झाले. मंदिराच्या बाहेर सुद्धा दगडी फरसबंदी झाली. मंदिर आणि मंदिर परिसर लख्ख प्रकाशात राहील या साठी एल ए डी लँप पॅनल बसविण्यात आले. प्रवेशद्वार, बागबगीचा, औषधी वनस्पतींची लागवड, फूलझाड लागवड, केळी, सुपारी, अननस आदींची लागवड झाली. साध्या साध्या आजारपणात उपयोगी पडणाऱ्या वनस्पती तिथे लावण्याचे धोरण आहे. सर्व तऱ्हेची फूलझाडे लावण्याचे काम सुरू आहे. मित्रांनो, सर्वांनी हे पाहिले की न कळत 'सोशल ऑडिट' होवून जाते. शंकाशक्यतेला जागा रहात नाही. सर्व नजरेसमोर आणून दिले की आपोआप त्या बाबत अभिप्राय समजतात. काही चुका उणीवा असतील तर दुरुस्त करता येते. निंदा माणसाला जागे करते असे म्हणतात. एखादा निंदक निंदा करून गेला तरी वाईट वाटून घेण्यासारखे नसते. त्यामुळे आपण जागृत होवून जातो. हे असे सोशल ऑडिट माझ्यासाठी आवश्यक असते. आणि म्हणून हे असे कार्यक्रम होत रहाणे मला आवश्यक वाटत रहाते. नवीन नवीन साथीदार मिळतात. नवीन नवीन आयडिया आकलनात येतात. नवीन नवीन सोबत्यांना घेऊन कामकाज कसे करायचे याचा अनुभव येतो. जेव्हा आपण धिटाईने सार्वजनिक खर्च करतो त्यावेळी असे सर्व उघडे उघडे करून सांगितले की ते भार हलके करणारे होते. मित्रांनो, १/२ वर्षात श्री देवी भराडणी मंदिर नावारूपाला आणण्यासाठी थोडी धडपड आहे. आपणा सर्वांचे सहकार्य, सहभाग आवश्यक आहे. मंदिरे ही समाजाला केंद्रीत करणारी व्यवस्था आहे. सर्व जातीधर्माचा समाज एकसंघ बांधण्याची मंदिर ही एक जागा आहे. गाव एकत्र करण्यासाठी मंदिर हे 'शक्तीकेंद्र' आहे. आपण सर्वांनी अशा मंदिरांचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे. या मंदिराच्या ठिकाणी येऊन १२ सूर्यनमस्कार घालण्याची सवय लावली गेली तर ही मंदिरे 'आरोग्य केंद्र', 'स्वास्थ्य केन्द्र' म्हणून लौकिक मिळवतील. मॉर्निंग वॉक किंवा इव्हीनिंग वॉक करणाऱ्यांना श्री देवी भराडणी पर्यंत यायला अगदी सोयीचे आणि सोपे आहे. कुणीतरी असा उपक्रम हाती घेतला पाहिजे. समाज निरोगी राखण्यासाठी हे आवश्यक आहे. मित्रांनो, मिठगवाणे येथील 'श्रीदेवी भराडणी मंदिर' आणि 'मंदिरासभोवतालचा परिसर' याची एक छोटीशी व्हिडिओ क्लिप फेसबुक पेजला शेअर केली आहे. श्री. सुवेध कुळकर्णी याने ही व्हिडिओ क्लिप तयार केली आहे. यामुळे मंदिराचा आणि मंदिर परिसराचा अवाका लक्षात येतो. गेल्या चारपाच महिन्यांच्या कालावधीत श्री देवी भराडणी मंदिर आणि सभोवतालचा परिसर बदलून गेला आहे.

**● दानपेटी भराडणीची –**

मित्रांनो, १७ फेब्रुवारी २०२३ रोजी श्रीदेवी भराडणी मंदिरामध्ये दानपेटी बसवण्यात आली. मंदिर जीर्णोद्धार, परिसर सुधारणा झाली म्हणून कलशारोहण, उदकशांती आदी कार्यक्रम संपन्न झाले आणि त्याच दिवशी श्री देवी भराडणी मंदिरात दानपेटीची स्थापना करण्यात आली. श्री देवी भराडणी मंदिराला आर्थिक स्वयंपूर्णता यावी हा मुख्य हेतू.

रू.३३६१/– (दि.२१.०२.२०२३); रू.१३०५/–(दि.०४.०४.२०२३); रू.५०२७/–(दि.०६.०६.२०२३) दानपेटी मधून रक्कम जमा झाली. थोडक्यात एकूण ९६९३/– दानपेटी मधून आजपर्यंत जमा झाले आहेत. ही सर्व रक्कम प्रत्येक वेळी लगतच्या दुसऱ्या दिवशी श्री देव अंजनेश्वरच्या बँक खात्याला जमा करण्यात आली आहे. थोडक्यात,

हाती ठेवण्यात आलेली नाही. मित्रांनो, श्री देवी भराडणी साठी देणगीपावती द्वारे वस्तुरूप देणगी आणि नावे देणगी द्वारे जमा देणगी जवळपास तीन लाखांचे आसपास जमा झाली आहे. त्याच्या देणगीपावत्या त्या त्या देणगीदारापर्यंत वेळोवेळी पोहोचत्या झाल्या आहेत. अंजनेश्वरच्या रोजकीर्दीला आणि खतावणीला ह्या श्री देवी भराडणी मंदिरामधील देणगीची नोंद होते आहे. श्री देवी भराडणी मंदिरामधील 'दानपेटी' मधून एकूण जमा झालेली रक्कम सुध्दा सर्वांना समजली पाहिजे. 'Anonymous donation' 'गुप्तदान'... 'निनावी देणगी' ही दिवसेंदिवस वाढत जाईल. नावे देणगी देणगीपावती द्वारे जमा होत असते. निनावी देणगीची 'दानपेटी जमा' अशी एकच जमा पावती तयार होते. वेळोवेळी ही जमा रक्कम समजली की दानपेटी विषयी खात्री तयार होते, विश्वास तयार होतो. दानपेटीजमा मंदिरातील धार्मिक कार्यक्रमांमध्ये, नित्य तेलवाती साठीच खर्च करण्याचे 'सामान्य धोरण' आहे. श्री देवी भराडणी मंदिर स्वयंपूर्ण व्हावे हा तो 'एक विचार' आहे. दानपेटीतील जमा रक्कम सुध्दा सर्वांना समजली पाहिजे, हा तो घालून दिलेला परिपाठ आहे. सर्व काही 'उजेडी' राहिले पाहिजे हा तो एक हट्ट आहे.

'दातव्यमिती यद्दान्नं दीयतेअनुपकारणे, देशे काले च पात्रे च यदान्नं सात्विकं स्मृतम्' भ. गीता

दि. ०५/०६/२०२३ रोजी संध्याकाळी ७.०० वाजता श्री अंजनेश्वर दरबारीच्या दानपेट्या उघडण्यात आल्या. तसेच श्रीदेवी मुहुर्ताई मंदिरातील दानपेटीही उघडण्यात आली. दानाची मोजदाद करण्यासाठी राजापूर अर्बन बँकेच्या पठार शाखेतील कर्मचारी वर्ग उपस्थित होते. सेवेकरी मानकरी लोकांच्या उपस्थितीत दानपेट्या मधील दानाची मोजदाद करण्यात आली. दानाची रक्कम मोजदाद करून ती जमा रक्कम मासिकप्राप्तीचे मुदतठेव सर्टिफिकेट करून ठेवली जाते. जेणेकरून सर्वांना वर्षाच्या अखेरीस समजावे की भक्तांनी अर्पण केलेल्या दानाची एकूण रक्कम किती झाली याचा हिशोब सर्वांना समजेल. मुदतठेव सर्टिफिकेट एवढ्यासाठी करायचे की ही दानपेटीतील एकूण रक्कम एक 'संचितनिधी' म्हणून जमा होत राहील. दानपेटीची रक्कम अर्बन बँकेच्या स्टाफ कडून मोजून घ्यायची आणि ती सर्व उपस्थितांच्या समोर आणि साक्षीने घ्यायची हेतू इतकाच की ती एक कायम स्वरुपी पध्दत होवून जावी शंकेला तसूभरही जागा नको म्हणून हे सारे सारे करायचे. दानपेटी रजिस्टर मध्ये दानाची तपशीलवार नोंद केली जाते. बँकेकडील जमाचलन रजिस्टरच्या एका कागदावर चिकटवून ठेवले जाते. उपस्थितांच्या सह्या घेतल्या जातात. हे सर्व कशासाठी तर आम्ही उपस्थित होतो, हे उपस्थित रहाणाऱ्या व्यक्तीला कधीकाळी सांगता यावे. मोजमाप पूर्ण झाले की रिकाम्या दानपेटीवर कागदी सील लावून पुन्हा कुलूपबंद केली जाते. त्या सीलवर शिक्का सही करून दानपेटी बंद केल्याची तारीख वेळ घातली जाते. जेणेकरून दानपेटी पुन्हा उघडताना ते सील सर्वांनी बघून घ्यावे. मध्येच दानपेटी उघडली जावू नये म्हणूनची ती व्यवस्था आहे. प्रत्येक दानपेटीला दोन दोन कुलुपे आणि दोन दोन चाव्या आहेत. सर्वांकडून चाव्या मिळाल्या शिवाय दानपेटी उघडणार नाही आणि ती ती माणसे उपस्थित झाल्याशिवाय दानाची रक्कम मोजली जाणार नाही, अशी ती प्रोव्हीजन आहे प्रसिद्धपत्रक काढून दानपेटीमधील दानाची प्रसिध्दी करायची. हेतू इतकाच की भाविक भक्तांना या दानपेटीबाबत विश्वास तयार व्हावा. आपण अर्पण केलेला 'एक रूपया' सुध्दा येथे सुरक्षित रहातो ही हमी त्यांच्या मनात तयार व्हावी. केवढीही मोठी रक्कम येथे अर्पण झाली तरी ती सुरक्षित रहाते, हिशोबात येते आणि संचित निधी म्हणून जमा रहाते आणि त्या रक्कमेच्या व्याजातून धार्मिक कार्यक्रम होत रहातात. थोडक्यात आपण अर्पण केलेला एक रुपया थेटपणे खर्च न होता, त्या एक रुपया वरील व्याजाची रक्कम तुमचा सहभाग म्हणून श्रीदेवाच्या, श्रीदेवी च्या धार्मिक कार्यक्रमामध्ये खर्चीली जाते. थोडक्यात अर्पण केलेल्या रूपयाचे पुण्य वर्षानुवर्षे भक्ताच्या ठायी राहील, अशी ती व्यवस्था केली आहे. ऑडिट अकाऊंटीग मध्ये 'दानपेटी जमा' हा स्वतंत्र रकाना रोजकीर्दीला असतो आणि खतावणीला असतो. थोडक्यात दानपेटीमधील जमा रक्कम सर्वच्या सर्व हिशोबात येते. दानपेटीमधून 'नावे देणगीची बंद पाकिटे' स्वीकारण्याची सुविधा असल्यामुळे त्या त्या देणगीदारापर्यंत पावती प्रसाद अंगारा पोस्टाने पाठवण्याची सोय केली आहे. थोडक्यात दानपेटी म्हणजे देवाच्या पुढ्यातील 'धनपेटी' आहे. सर्व दानपेट्यांसमोर सीसीटीव्ही कॅमेरा असल्यामुळे त्या पूर्ण पणे सुरक्षित आहेत. या ठिकाणी रात्र प्रकाशाची स्वयंचलित सुविधा केलेली असल्याने या दानपेट्या रात्री प्रकाशात रहातात. त्यामुळे सर्व दानपेट्या पूर्णपणे सुरक्षित आहेत. कधी कधी वाटते हे नेहमी कशाला

सांगत बसायचे. परंतु दुसऱ्या बाजूने विचार येतो की हे 'पब्लिक ट्रस्ट' चे कामकाज आहे. येथील सारे सारे पब्लिक झाले पाहिजे, प्रायव्हेट रहाता नये. गुलदस्त्यात रहाता नये. एका सहीने व्यवहार सुरू असताना सारे सारे तुमच्या पर्यंत पोहोचते केले पाहिजे असे वाटते. म्हणून लिहीते रहायचे. उघडे उघडे करून ठेवले पाहिजे. वेळोवेळी सारे सारे उजेडात आणून ठेवले पाहिजे. इतके करून एखादा कुणी 'हुकुमशहा' अथवा 'मनमानी कारभार' म्हणाला तर मग फारसा भार आपल्यावर रहात नाही. याचे उत्तर ज्याला त्याला खुद्द परमेश्वर देऊन मोकळा होतो. माझा 'त्याचेवर' अपूर्व विश्वास आहे. बाकी ते काय सांगणार.

**● ग्रामपंचायत कडे रस्ता कामासाठी पत्रव्यवहार –**

चिरेखणी उपळघाटीमार्गे अंजनेश्वर हा गावातील महत्वाचा जोडरस्ता मुख्यमंत्री सडक योजनेतून, मनरेगा योजनेतून, जनसुविधा योजनेतून अथवा राज्य बजेट मधून मार्गी लागला पाहिजे. सागरी महामार्गाला जोडणारा रस्ता आहे. सामान्य पणे पावणे दोन कि. मी. लांबीचा रस्ता असल्याने दीडदोन कोटी खर्चाचा आहे. परंतु पाठपुरावा केला तर निधी नक्की मिळणार आहे. कारण तो रस्ता कोस्टल हायवेला जोडणारा आहे. आणि महत्वाचे म्हणजे ग्रामीण यात्रा स्थळ अंजनेश्वर जोडणारा रस्ता आहे. सततचा पत्रव्यवहार आणि प्रत्यक्ष पाठपुरावा केल्या शिवाय पर्याय नाही. अणुऊर्जा कंपनीचा निधी घेतला तर हा रस्ता प्राधान्याने होईल कारण श्री देव अंजनेश्वर देवस्थान हे एक लाभार्थी देवस्थान आहे. त्यामुळे रस्ता सुविधा उपलब्ध करून देणे हे करारनाम्यानुसार एक कंपनी चे कर्तव्य आहे. मिठगवाणे ग्रामपंचायतीमधून पाठपुरावा झाला तर हे शक्य आहे, अशक्य असे काहीच नाही. जैतापूर शाळेसाठी, साखर शाळेसाठी कोटीत रुपयांचा निधी अणुऊर्जा कंपनीकडून उपलब्ध करून देण्यात आला आहे. आपण पाठीमागे राहून चालणार नाही. मित्रांनो, पटले तर घ्या नाहीतर सोडून द्या, हे मी आज काल नेहमीच सांगतो. कारण एखादी चांगली सूचना सुध्दा कधी कधी रूचत नाही, पटत नाही. 'मनमानी, हुकुमशाही, रिमोट कंट्रोल' असले शब्द प्रयोग केले जातात. बरेच वेळा कोणताही विचार न करता अशा शब्दांना लाईक्स सुद्धा मिळतात. काय करणार आपण??? तो त्यांचा मार्ग समजायचा. आपण सूचना करीत राहिले पाहिजे, हे मात्र नक्की.

**● आधार अपडेशन कँप –**

'आधार अपडेट कँप' अंजनेश्वर मंदिराच्या शेजारच्या हॉलमध्ये लावण्यात होता. दोन्ही हातांच्या बोटांचे ठसे आणि दोन्ही डोळे बायोमेट्रिकसाठी आवश्यक असतात. आधार कार्डमध्ये मोबाईल नंबरची नोंदणी महत्वाची असते. थोडक्यात, आधार कार्ड मोबाईल नंबरला जोडणे महत्वाचे असते. रेशन दुकान, बँकेची कामे, पीएम किसान आदी शासकीय कामे करताना आधार अपडेट म्हणजे अद्ययावत असणे आवश्यक असते. नावात, पत्त्यामध्ये, जन्म तारखेमध्ये दुरुस्ती करून घेणे आवश्यक असते. या नोंदी आधार कार्ड मध्ये चुकीच्या होणे अडचणीचे होते. आधार कार्ड घेऊन १० वर्ष उलटून गेलेल्यांसाठी किंवा नजिकच्या काळात आधार कार्डाला १० वर्ष पूर्ण होत असलेल्यांनी आधार कार्ड अपडेट करून घेतले पाहिजे. तसे शासनाने परिपत्रक काढून सांगितले आहे. श्री. प्रशांतजी गांवकर, अणसुरे यांच्या मुळे आधार कार्ड अपडेशन कँप घेणे शक्य झाले आहे. परवा सहजपणे त्यांच्याशी संपर्क साधला. बोलणे झाले. त्यांनी सोमवारी अंजनेश्वर मंदिराजवळ आधार कार्ड अपडेट कँप लावण्याचे कबूल केले. आणि म्हणून ७ ऑगस्ट २०२३ रोजी अपडेशन कँप सुरू आहे. सर्वांनी आधार कार्ड अपडेट करून घ्यावीत. गावातील श्री. हमीद हसोळकर, मोबाईल नंबर ७७४१८९१९८४ यांचा पुढाकार सुद्धा महत्वाचा आहे. श्री देव अंजनेश्वर मंदिरात कँप असल्यामुळे श्री. नरेश कांबळी, श्री. राजा लिंगायत यांनी लागणारी प्राथमिक तयारी केली आहे. आधार अपडेशन कँप बुधवार, गुरूवार असा दोन दिवस झाला. लाईट, इन्व्हर्टर बॅकअप दिलेला होता. त्यामुळे लाईट नसेल तरी अपडेशन कामकाज अडले नाही. भरपूर लोकांनी अपडेशनचा लाभ घेतला. आधार अपडेशन होणे हे महत्त्वाचे. थांबलेल्या सर्वांचे बायोमेट्रिक्स सह मोबाईल लिंक, नाव–पत्ता दुरूस्ती आदी आधार संबंधी कामे झाली. आधार अपडेशन हे एक राष्ट्रीय काम आहे. यासोबत 'आयुष्यमान भारत कार्ड' तथा 'आभा कार्ड', 'ईश्रम कार्ड' हे सुध्दा सर्वांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करायचा आहे. आपण सर्वांनी सहकार्य देऊन ते केले पाहिजे.

● **श्री देव अंजनेश्वर पथदीप योजना–**

मित्रांनो, माडबन मध्ये श्रीदेवी भगवती मंदिर, बांदेश्वर मंदिर, गवाणकर स्तंभ, विजय तथा बाप्पल गवाणकर, वाघधरे घराजवळ, माडबन ग्रामपंचायतीचे जवळ, दांडेकरांचे घराजवळ असे ७/८ ठिकाणी अंजनेश्वर देवस्थान मार्फत १०० व्हॅट चे एल ए डी फ्लूड लाईट बसवून झाले. टायमर यंत्रणा बसवल्यामुळे संध्याकाळी ७ ते रात्री १२ पर्यंत हा अंजनेश्वर मार्फतचा लख्ख प्रकाश ग्रामस्थांना उपलब्ध होईल. त्यापूर्वी भंडारसाखरी मधील भवानी मंदिराजवळ आणि साखरकर स्तंभाजवळ असे दोन आणि सडेवाडी मध्ये दोन फ्लूड लाईट टॉवर उभारून झाले. अंजनेश्वर मंदिरामार्फत भाविकभक्तांना लख्ख प्रकाशाची सोय झाली. 'देवाकडून भक्तांची सेवा' असे काही हे केलेले आहे. यापूर्वी मिठगवाणे गावात एकूण २४/२५ टॉवर उभारून लख्ख प्रकाशाची सोय महामेरीवाडी पासून झाली आहे. श्री देव माणेश्वरला सुध्दा हा श्री देव अंजनेश्वरचा प्रकाशाचा उजेड दिलेला आहे. मित्रांनो, देणगीदाराने सहज आणि स्वाभाविक बोलण्यातून देणगी दिली. त्यामुळे हे सर्व झाले आहे. हे सर्व श्री देव अंजनेश्वरचे आहे असे समजून ही व्यवस्था नीटपणे चालू राहील ह्याकडे सर्वांनी लक्ष दिले पाहिजे. अजूनही काही करता येईल. मित्रांनो, एक १०/१२ फुटी गॅव्हनाईज स्क्वेअर बार, दोन एल ए डी फ्लूड लाईट १०० व्हॅटचे, टायमर, केबल, वेल्डिंग आदी मजुरी खर्च हे सामान्यपणे ८/९ हजार खर्चात जाते. अधिक प्रती महिना रू. १५०/– घराघरांतून लाईट कनेक्शन घेतलेले आहे म्हणून अंजनेश्वर देवस्थानच्या बँक खात्यातून स्टँडींग इन्स्ट्रक्शननुसार अदाई करण्यात येत आहे. लाईट कनेक्शन दिलेल्या व्यक्तीच्या बँक खात्याला जमा केले जातात. सर्व मटेरियल स्थानिक हार्डवेअर मधून. फ्लूड लाईट साहील ट्रेडर्स, नाटे यांच्या कडून बाकी साहित्य अनाजी हार्डवेअर मधून आणि सचिन मेस्त्री यांच्या स्टोअर मधून घेतले आहे. हे सारे सारे क्रॉस चेक द्वारे पेमेंट करून झाले आहे. मजुरी आदी रक्कम सुध्दा क्रॉस चेक द्वारे दिलेली आहे. बोलायला शक्यतो वर जागा राहू नये. हे सर्व अंजनेश्वर साठी समर्पित आहे. सांगून एवढ्यासाठीच ठेवायचे की सर्व सर्व उजेडी रहावे.

● **'चाफा स्टॉप जवळील श्रीदेवाचे प्रवेशद्वार'–**

अक्षय्य तृतियेच्या मुहूर्तावर भूमिपूजन कार्यक्रम करून काम सुरू करण्यात आले होते. ७५००/– मजुरीत श्री. गणेश महादेव काकनूर यांनी ४×४×४ चे कातळात दोन खड्डे मारून दिले होते. रू. २०००/– मजुरीत श्री. विलास धारू राठोड यांच्या जेसीबी मशीनकडून साफसफाई करण्यात आली होती. रू. १०८००/– तीन ब्रास वाळू आणून मिळाली. आणि रू. २००००/– तीन ब्रास खडी श्री. दत्ताराम हरिश्चंद्र वरदक यांच्या कडून घेतली. या कामासाठी ७० चिरे भराडणी मंदिराचे दिले. ७०×रू३० प्रमाणे =२१००/– चिऱ्यांचे झाले. अधिक वाहतुकीसाठी रू. ४००/– गडी मजुरी लागली. श्री. प्रमोद वसंत गुरव, कात्रादेवी, सागवे यांनी कमानीचे आरसीसी व प्लास्टिकचे काम केले. रू. २० हजार + रू. १लाख + रू. ८० हजार + रू. १७हजार ७०० असे मिळून एकूण रू.२लाख १७ हजार ७०० एन ई एफ टी करून दिलेले आहेत. श्री. रमेश काजवे आणि श्री. नरेश कांबळी यांच्या देखरेखीखाली पाण्याची टाकी देऊन पाणीपुरवठा झाला. उंची १३/१४ फूट आणि रूंदी १४/१५ फूट. एक दोन दिवसांपूर्वी व्हाईट सिमेंटचे दोन कोटींग लावण्यात आले. हे सर्व श्री. नरेश विठ्ठल कांबळी यांच्या देखरेखीखाली झाले. अजून रंगकाम होणे बाकी आहे. कार्तिकी उत्सवापूर्वी ते रंगकाम होवून जाईल. श्री देव अंजनेश्वरचे कामकाज करीत असताना अनेक तऱ्हेचे अनुभव मिळाले. त्या कामकाजामध्ये मजला जो आनंद मिळतो तो विलक्षण मिळतो. माझ्या 'एकमात्र सहीशिक्क्याने' हे श्रीदेवाचे कामकाज चालते तेव्हा ते खूप काळजीपूर्वक मला करावे लागते. श्रीदेव अंजनेश्वरचे बाबतीत कोणतेही कामकाज केले तरी ते सर्वांपर्यंत वेळोवेळी घेऊन जायचे, ही एक पध्दत लावून घेतलेली आहे. त्यातील जमाखर्चाचे रकाने सर्वांच्या समोर ठेवून द्यायचे. कामकाज करतांना एक आदर्श तयार करून ठेवायचा, तो असा की, जे जे करायचे ते तुमच्यापर्यंत थेटपणे पोहोचवायचे. जे जे कामकाज करायचे ते ते श्रीदेवाला प्रत्यक्ष सांगून करायचे. त्याला सांगितल्याशिवाय काहीच करायचे नाही, हा तो आदर्श. सर्व खर्च करायचा क्रॉस चेक द्वारे किंवा एनईएफटी किंवा आरटीजीएस करूनच करायचा. सर्व तपशील नीटपणे नोंदवून आणि चेक क्रमांक नोंद करून खर्चाची व्हावचर करायची. सर्व जमा खर्चाचे तपशील कीर्द खतावणी मध्ये वेळीवेळी नीटपणे नोंदवून घेतले की फारशी अडचण रहात नाही. गेल्यावर्षीपासूनचा सर्व हिशोब 'टॅली लायसन कॉपी' घेऊन करायचे ठरवल्यामुळे फारशी अडचण येत नाही. आणि एवढे सर्व करून रेग्युलर ऑडिट आणि

टॅक्स ऑडिट होत असले तरी तुम्हाला सांगितल्या शिवाय मला कामकाजाची पूर्तता वाटत नाही. म्हणून सारे सारे सांगून टाकायचे. आपण रोजच्या रोज सर्व सांगून मोकळे व्हायचे. भविष्यात पुढच्यासाठी कामकाज करण्यासाठीचे आपले आदर्श निर्माण करून ठेवायचे. जेणेकरून पुढे येणारा ट्रस्टी तथा विश्वस्त चुकीच्या वाटेने हे श्रीदेवाचे कामकाज रेटून करणार नाही. एक धोपट रस्ता करून ठेवला की पुढे येणारा ट्रस्टी तथा विश्वस्त दुसऱ्या चुकीच्या मार्गाने चालणार नाही. पब्लिक ट्रस्ट म्हटल्यावर हिशोब देणे आणि ते हिशोब सार्वजनिक करून टाकणे ही मेहरबानी नसते तर ते एक कर्तव्य असते, याची पक्की जाणीव तयार होवून राहील. मित्रांनो, आपण इतके जरी केले तरी 'एखाद दुसरा महाभाग' शिल्लक रहातोच रहातो. तो पाठीमागून काय वाटेल ते बोलत रहातो. सर्व सर्व असे पब्लिक करून मोकळे झाले की त्या एखाद दुसऱ्या महाभागाला समजावणे ही आपली जबाबदारी रहात नाही. त्याला परस्पर 'त्याच्या'कडून समजावले जाते आणि 'त्याच्या'बाबत माझ्या मनात पक्की खात्री आणि अपूर्व श्रध्दा आहे.

**● धर्मशाळा विस्तारीकरण भूमिपूजन –**

सोमवार ४ सप्टेंबर २०२३ रोजी धर्मशाळा विस्तारीकरण इमारतीचे प्रातिनिधिक भूमिपूजन कार्यक्रम झाला. श्री. नरेश विठ्ठल कांबळी यांच्या हस्ते भूमिपूजन झाले. सरपंच सौ. आशाताई काजवे, पोलिस पाटील श्री. गजानन भोगले सर्व भाविक भक्तांच्या उपस्थितीत भूमिपूजन कार्यक्रम प्रातिनिधिक स्वरूपात पार पडला. ब्राह्मण म्हणून श्री. प्रकाश परांजपे हे होते. तत्पूर्वी सर्वांच्या उपस्थितीत या विस्तारीकरण कामाबाबत सर्व काही माईक स्पीकर घेऊन सांगण्यात आले. श्रीदेवाच्या समोर सर्व भाविक भक्तांना उभे करून सोबत साक्षीदार श्री. सुधाकर लिंगायत या पुजारी गुरवाला सोबत ठेवून जे सांगणे होते ते अगदी विस्ताराने सांगितले. संचित टॅक्स ची रक्कम लवकरात लवकर खर्ची पडावी आणि डिपीडीसी मार्फत ३०/३५ लाख रुपयांचा निधी मिळवता आला तर पहावा या दूरदृष्टी ने हा भूमिपूजनाचा घाट घातलेला आहे, हे सर्व विस्ताराने सांगितले. 'प्रयत्नांना यश येणे, यश प्राप्त होणे हे आपल्या हाती नसते'. प्रयत्न करणे हे आपले कर्तव्य असते. ते कर्तव्य जाणीवपूर्वक पार पाडणे हे आपले दायित्व असते. हे सर्व श्रीदेवाच्या समोर उभे राहून सांगणे झाले. थोडक्यात एखाद्या व्यक्तीला समजावून सांगावे आणि त्या व्यक्तीने सर्व काही न बोलता समजून घ्यावे असा तो कार्यक्रम झाला. त्यामुळे भूमिपूजन हे केवळ आणि केवळ नाममात्र आणि प्रतिनिधिक होते. आर्किटेक्ट श्री. जोशी, सिव्हिल इंजिनिअर श्री. जगदीश ठोसर यांचा उल्लेख करण्यात आला. श्री. प्रमोद गुरव, कात्रादेवी सागवे हे या इमारतींचे स्लॅब पर्यंत चे काम करणार असल्यामुळे त्यांना प्रत्यक्ष बोलावले होते आणि ते अगदी नियत वेळेपूर्वी हजर होते. थोडक्यात सर्वच्या सर्व उजेडी रहावे, उघडे रहावे हा त्यामागील हेतू होता. बाकी काही नव्हते. मित्रांनो, 'तू पुढे हो... मागे वळून पाहू नकोस... मी काय ते पाहून घेईन सर्व काही' अशी जेव्हा साद मिळते तेव्हा प्रतिसाद म्हणून मला गप्प बसवत नाही. मी धीटाईने कामाला लागतो. आणि त्यात सहकारी लोकांची, खोत, सेवेकरी, मानकरी, देणगीदार, ग्रामपंचायत यांची भरभक्कम साथ पाठीमागे उभी ठाकल्यावर फार वेळ घालवणे योग्यही वाटत नाही. फक्त सर्व काही कायद्याच्या चौकटीत राहून करायचे. बेकायदेशीर असे काही करायचे नाही. आणि जे जे दृष्यस्वरूपात केलेले असेल ते ते सर्व तुम्हां सर्वांपर्यंत वेळोवेळी पोहोचविणे हे सुद्धा तितकेच मला महत्त्वाचे वाटते. म्हणून हे सर्व काही सांगून मोकळे व्हायचे.

**● श्रावण दिंडी सन २०२३ मधील –**

४ सप्टेंबर २०२३ रोजी श्रावण दिंडीचा वार्षिक कार्यक्रम नीटपणे आणि निर्विघ्नपणे पार पडला. पठार मार्गे दिंडी जात असताना ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. पठार तिवरांबीमध्ये श्री. मंदार परांजपे यांनी कोकम सरबत आणि अजून अल्पोपहार वाटप केला. पुरकेश्वर मंदिरात दिंडी नियोजित वेळेत म्हणजे ठिक दुपारी १२.०० वाजता पोहोचली. तेथे पुरकेश्वर महाराजांना धोतर उपरणे आणि देवदक्षिणेचे पाकीट ठेवण्यात आले. पुरकेश्वर मंदिरात सर्वांना खिचडीप्रसाद, केळी आदी वाटप करण्यात आले. भाविक भक्तांमधील उत्साह लक्षात घेण्यासारखा होता. गोपाळकृष्ण मंदिरात सुध्दा सर्व काही मजेशीर झाले. तेथेही गोपाळकृष्णांची धोतर उपरणे आणि देवदक्षिणेचे पाकीट देऊन पूजा झाली. तेथील सर्व कार्यक्रम आटोपून दिंडी नाटी देवीच्या दर्शनासाठी निघाली. नाटी देवीच्या दर्शनासाठी

दिंडी अगदी नियोजित वेळेत पोहोचली. सर्व दिंडी कार्यक्रमामध्ये भगिनीवर्गाचा उत्साह विलक्षण होता. संध्याकाळी ठिक ४.००वा दिंडी अंजनेश्वर मंदिरात पोहोचली. उन्हाची तीव्रता होती. परंतु प्रत्येकामधील उत्साह इतका होता की त्या उन्हाच्या झळा फारशा जाणवल्या नाहीत. दिंडीचे स्वागत केल्याबद्दल आभाराचे पत्र रवाना केले. मित्रांनो, थोडे थोडे लिहून ठेवलेले असले तर कधी काळी उपयोग होतो. लिहून ठेवलेले 'शब्द' फुकट जात नाहीत. लिहून ठेवलेले शब्द कधी काळी साथीदार बनून सहाय्यकर्ते ठरतात. म्हणून हे सर्व प्रयत्नपूर्वक सारें सारे शब्दांमध्ये बांधून ठेवायचे. बाकी काही नाही.

**● ट्रस्ट नोंदणी –**

मित्रांना, इथे श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे या ट्रस्टच्या नोंदणीच्या वेळचा मूळ अर्ज आणि त्यामध्ये मुद्दा क्रमांक २(ii) मध्ये नोंदलेले मोड ऑफ सक्सेशन फॉर ट्रस्टीशीप एण्ड मॅनेजरशीप या रकान्यातील महत्वाची नोंद महत्त्वाची आहे. **'आमच्या पाठीमागे आमच्या कुटुंबापैकी कुणीही कर्ता इसम असेल त्याने ही व्यवस्था पाहणेची आहे' कुणीही कर्ता इसम असेल त्याने पाहायची आहे. थोडक्यात दोन देसाई कुटुंबातील कुणीही कर्ता इसम या देवस्थानचा सर्व कारभार एकट्याच्या सही शिक्क्याने राजरोसपणे चालवू शकतो.** हे मोड ऑफ सक्सेशन फॉर ट्रस्टीशीप एण्ड मॅनेजरशीप मधील नोटींग आहे. सन १९५२ सालातील आहे.. दि. १७.०५.१९५२ रोजी केलेले हे ट्रस्ट नोंदणीसाठीचे एप्लिकेशन आहे. दोन देसाई महानुभाव व्यक्तींच्या पूर्ण नावाने केलेले हे एप्लिकेशन आहे. कै. सदाशिव लक्ष्मण देसाई आणि कै. गणेश बाळकृष्ण देसाई यांनी केलेले एप्लिकेशन आहे. श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे हा ट्रस्ट धार्मिक पब्लिक ट्रस्ट म्हणून धर्मादाय दप्तरामध्ये नोंदण्यासाठी केला हा शेड्युल दोन मधील विहीत नमुन्यातील अर्ज आहे. या मधील प्रत्येक अक्षराला खूप खूप किंमत आहे. कायद्याच्या नजरेत खूप खूप महत्व आहे. या एप्लिकेशन ची गुगल लिंक अंजनेश्वर फेसबुक पेजला अपलोड केलेली आहे.

**● सन १९५२ मधील धर्मादाय आदेश–**

मित्रांनो, श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे या ट्रस्टची नोंदणी धार्मिक पब्लिक ट्रस्ट म्हणून ट्रस्ट रजिस्ट्रेशन नंबर – ६७ अशा क्रमांकाने झाली. त्यावेळी मे धर्मादाय आयुक्त कोल्हापूर यांनी केलेले आदेश महत्वाचे आहेत. देवस्थान ट्रस्टमध्ये देसाई ट्रस्टीसाठी अधिकार मर्यादा ज्या घालून दिलेल्या आहेत त्या नीटपणे समजून घेतल्या तर लक्षात येईल की या **अंजनेश्वर ट्रस्ट मध्ये जनरल अफेअरचे सर्व च्या सर्व अधिकार देसाई ट्रस्टीसाठी दिलेले आहेत आणि ते खुद्द धर्मादाय आयुक्तांनी दिलेले आहेत** 'All general affairs' **देवस्थान चा सर्वसाधारण व्यवहार आणि** 'All movable properties' **हाताळण्याचे अधिकार 'देसाई ट्रस्टीपैंकी जो कुणी कर्ता इसम असेल त्याला दिलेले आहेत.'** याबाबतची गुगल लिंक शेअर करून ठेवली आहे. 'Respected sphere' थोडक्यात अधिकारांची कार्यकक्षा आखून दिलेली आहे. या आदेशामध्ये देवस्थानचे सर्व कामकाज Respected sphere मध्ये करण्याचे आदेश त्या वेळी मे. धर्मादाय आयुक्त कोल्हापूर यांनी दिलेले आहेत. हे 'Respected sphere' हे शब्द महत्त्वाचे आहेत.

**● चेंज रिपोर्ट –**

मित्रांनो, कै. भरत बलवंत गोखले यांचा मृत्यू दाखला श्री देव अंजनेश्वर चे बँक खात्याला हजर करायला लागला. मृत्यू दाखला हजर केल्यामुळे त्यांचे नाव बँक खात्यावरून कमी झाले तर त्यांच्यासाठीचा चेंज रिपोर्ट मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त रत्नागिरी आणि मे. धर्मादाय सह आयुक्त कोल्हापूर यांच्या निर्देशानुसार दि. ०९.०३.२०२२ रोजी मला फाईल करावा लागला आहे. मित्रांनो, चेंज रिपोर्ट फाईल करणे हे ट्रस्टीचे कर्तव्य आहे आणि वरिष्ठांचे म्हणजे धर्मादाय आयुक्तांचे आदेश पालन करण्याचे बंधन कायद्याने रहाते म्हणून तसे करावे लागते. वास्तविक हा ट्रस्ट हेरीडेटरी मोड ऑफ सक्सेशन चा असल्यामुळे चेंज रिपोर्ट फाईल करणे अथवा न करणे ही जबाबदारी अथवा बंधन ज्याचे त्याचे वारसांचे असते. परंतु येथे धर्मादाय आयुक्तांनीच मला स्पेसिफिक निर्देश दिले. पालन करावेच लागले. बरेच वेळा

एखादी गोष्ट समजून न घेता काही तरी चुकीचे माहितीच्या आधारे मत बनवले जाते. परंतु ते कायद्याच्या नजरेत योग्य आणि अचूक ठरत नाही. देवस्थानचे विश्वस्त कै. भरत बलवंत गोखले यांच्यासाठी चेंज रिपोर्ट फाईल केलेला आहे व त्या चेंज रिपोर्टची पीडीएफ कॉपी अंजनेश्वर फेसबुक पेजला आणि अंजनेश्वर वेबसाईट ला अपलोड केली आहे. तसेच श्री. बाळकृष्ण गोविंद देसाई यांचे साठीचा चेंज रिपोर्ट दि. ०९.०३.२०२२ रोजी मी फाईल केला आहे. मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त रत्नागिरी आणि मे. धर्मादाय सह आयुक्त कोल्हापूर यांच्या लेखी निर्देशानुसार हा चेंज रिपोर्ट फाईल करण्याचे काम मला नाईलाजाने करावे लागले आहे. हा ट्रस्ट हेरीडेटरी मोड ऑफ सक्सेशन चा आहे. वारस रेकॉर्ड वर आणणे ही जबाबदारी ज्याची त्याची आहे. परंतु तसा चेंज रिपोर्ट राजीनामा पत्र/डिस्चार्ज लेटर/व्हॉलेटंरी रिटायर्डमेंट लेटर श्री. बाळकृष्ण गोविंद देसाई यांनी दि. ०६.०२.२००८ नंतर म्हणजे कार्यमुक्त झाल्यानंतर केलेला नाही. त्यामुळे दोन्ही धर्मादाय आयुक्तांच्या लेखी निर्देशानुसार मलाच तो चेंज रिपोर्ट फाईल करावा लागला. या संपूर्ण चेंज रिपोर्टची पीडीएफ कॉपी अंजनेश्वर फेसबुक पेजला व अंजनेश्वर वेबसाईटला अपलोड केली आहे. सारे सारे उजेडी ठवले आहे.

**● मुदत ठेव सर्टिफिकेट –**

मित्रांना, श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणेची एकूण १३ मुदत ठेव सर्टिफिकेट आहेत. अजून एखाद दुसरे राहिले असेल ते तुम्हाला शेअर करीनच. मित्रांनो. अंजनेश्वरची मुदत ठेव सर्टिफिकेट आहेत, माझी वैयक्तिक नाहीत. श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे हा धार्मिक पब्लिक ट्रस्ट असल्यामुळे सर्व सर्व पब्लिक झाले म्हणून मला अडचणीचे असे काहीच नाही. मित्रांनो, या सर्व मुदतठेव सर्टिफिकेटचे मासिक व्याज श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे या बँक ऑफ इंडिया मिठगवाणे शाखेच्या बचत खाते क्रमांक १४३७१०१००००००१ला येत आहे. प्रति महिना सुमारे सव्वा लाख रुपयांपेक्षा जास्त व्याजाची रक्कम अंजनेश्वर देवस्थानला राजापूर अर्बन बँक नीटपणे ट्रान्स्फर करीत आहे. या सर्व मुदतठेवीचे वेळी सही शिक्का माझा आहे. त्यामुळे या मुदतठेवीची सुरक्षेची जबाबदारी मी घेतली आहे. यामुळे सुमारे ३.५% जादाचे व्याज अंजनेश्वरला मिळत आहे. शिवाय प्रतिवर्षी राजापूर अर्बन बँक 'माझ्या स्मरणपत्राने' रू.१५०००/– अंजनेश्वर कार्तिकी उत्सवाला नियमितपणे देत आहे. 'बँकेचा चारीटी फंड म्हणून' देत आहे. या १३ सर्टिफिकेट मध्ये अंजनेश्वर दानपेटी जमेची रक्कम मुदतठेव सर्टिफिकेट करून ठेवली आहेत. तसेच श्री देवी भराडणी दानपेटीतील रक्कम मुदतठेव सर्टिफिकेट करून ठेवली आहे. श्री देवी मुहुर्ताई मंदिरातील दानपेटीची रक्कम मुदतठेव सर्टिफिकेट करून ठेवली आहे. कै. गोपाळ वासुदेव देसाई यांच्या स्मरणार्थ मिळालेली रू. ५ लाख रक्कम मुदतठेव सर्टिफिकेट करून ठेवले आहे. या व्यतिरिक्त श्री. नंदकुमार मधूसुदन परांजपे यांनी रु. २ लाख रुपये कै. गो. बा. देसाई यांच्या ठिकाणातील सागवान विक्री उत्पन्नाचे ठेवले आहेत. त्याशिवाय श्री. सतीश गोपाळ देवधर, श्री. बावकर, श्री. नेने, श्री. अतुल भोगले–देसाई, श्री. नारायण हरी देसाई, श्री. मकरंद मिलिंद देसाई यांनी आपापल्या वैयक्तिक मुदतठेवीचे व्याज श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे या बचत खात्यामध्ये नियमितपणे वळते केले आहे.

**● सनद पुजारी वर्गासाठी –**

मित्रांनो, श्री देव अंजनेश्वरच्या पुजारी वर्गाची आणि श्री देवी मुहुर्ताई मंदिराच्या पुजारी वर्गाला अन्य नामवंत देवस्थान प्रमाणे सनद तथा तनखा तथा कॅश अलाऊंस सुरू करावा म्हणून मी वैयक्तिक पत्रव्यवहाराचा पाठलाग केला आहे. यश येणे माझ्या हातात नक्कीच नाही परंतु मजबूतीने प्रयत्न केले आहेत. मित्रांनो, यासाठी पुजारी वर्गाने मला तसे प्रयत्न करायला सांगितलेलेही नाही. कारण त्यांच्या मनी त्याचे महत्त्वही नाही. त्यांना महत्त्व समजत नाही म्हणून मी प्रयत्न करायचे नाही अथवा त्यांनी मला सांगितले नाही म्हणून मला करण्याची गरज नाही, असले विचार मी करत बसत नाही. जे जे चांगले आहे ते ते करायचे. समजून घेणारे कुणी असेल तर समजून सांगायचे अन्यथा आपण एकला चलो म्हणत कामाला लागायचे. मित्रांनो, अशा माझ्या एकूण स्वभावामुळे म्हणा किंवा माझ्या प्रयत्नांच्या प्रामाणिकपणाची कदर वाटत असेल असे म्हणा. माझ्या प्रयत्नांना कधीही अपयश येत नाही. श्रीदेव अंजनेश्वर मंदिर आणि श्रीदेवी मुहूर्ताई मंदिराच्या पुजारीवर्गासाठी सनद सुरू करण्यासाठीचा पाठपुरावा केला आहे. तहसीलदार राजापूर, जिल्हाधिकारी रत्नागिरी आणि कोकण आयुक्त कार्यालयाकडे पाठपुरावा केला आहे. यापूर्वी 'सनद' सुरू होण्यासाठी असे प्रयत्न

कुणी केले नव्हते. दोन्ही मंदिराच्या पुजारीवर्गासाठी हे मानाचे समजले जायचे. सनद ही कॅश अलाऊंस स्वरूपात मिळायची. सध्या मिळत नाही. त्यासाठी प्रयत्न आणि पाठपुरावा सुरू केला आहे. प्रयत्न यशस्वी होणे आपल्या हाती नाही. प्रयत्न करणे आपल्या हाती आहे.

**● लेखन दोष दुरूस्ती –**

मित्रांनो, श्री देव अंजनेश्वरची जमीन जवळपास ४२.१३.५० हेक्टर आर. श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे अशा नावाने नवीन खाते क्रमांक मिठगवाणे तलाठी दप्तरी तयार झाला. एकूण ३२४ सातबारावर श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे हे नाव लागले. लेखन दोष दुरूस्ती महसूल विभागाने अतिशय श्रद्धेने आणि जाणीवपूर्वक केली. त्यामुळे त्या सर्वांचा उल्लेख इथे राहिला पाहिजे. तत्कालीन प्रान्ताधिकारी श्री. प्रविण खाडेसाहेब, तत्कालीन तहसीलदार श्रीम. वराळे मॅडम, आणि तलाठी श्री. युवराज कुंडलीक पवार यांनी अगदी मनापासून आणि कायद्याच्या कक्षेत राहून कामकाज केले. थोडक्यात जमिनीचे टायटल क्लिअर झाले. जमीन श्री देव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे या ट्रस्ट च्या नावाची झाली आहे. मला या कामाच्या बदल्यात काय मिळाले??? लिंगायत पुजारी लोकांचे नाहक शिव्याशाप मिळाले. आत्ता ही सर्व जमीन मालमत्ता रजिस्टरमध्ये नोंदली आहे. नजीकच्या काही महिन्यांत ही सर्व जमीन मालमत्ता अंजनेश्वर देवस्थान च्या पीटीआर मध्ये नोंदण्यासाठी प्रयत्न करणार आहे. अंजनेश्वरने हे सर्व कामकाज माझेकडून पूर्ण करून घ्यायचेच ठरवले आहे. त्यामुळे मलाही तो स्वस्थ बसू देत नाही. तो म्हणतो, 'तु पुढे हो... मागे वळून मजकडे पाहू नकोस... मी सर्व काही मागचे पाहून घेतो' त्यामुळे कोण काय म्हणेल आणि कोण काय बोलतो ह्याकडे फारसे लक्ष न देता 'देवाचा चाकर' म्हणून मला हे कामकाज पूर्ण करायचे आहे. मित्रांनो, मे. तहसीदार श्रीम. प्रतिभा वराळे मॅडम यांनी अंजनेश्वर जमीन प्रकरणी केलेले लेखनदोषदुरूस्तीचे आदेश महत्त्वाचे आहेत. आणेवारी रद्द करण्यात आली आहे, बँक बोजे कमी करण्यासाठी आदेश झाले आहेत. महसूल विभागाने अंजनेश्वर जमीन प्रकरणी केलेली ही मोठी कारवाई आहे. अशी कारवाई अन्य कुठेही अशा पध्दतीने झालेली नाही. मित्रांनो, मला काय मिळाले??? अंजनेश्वरला सर्वकाही मिळाले. अंजनेश्वर आपलाच. त्यामुळे त्याला जे मिळाले ते मला मिळाल्यासारखे वाटले. बाकी काही नाही.

**● स्थावर मालमत्ता रजिस्टर –**

मित्रांनो, हे श्री देव अंजनेश्वरचे 'स्थावरमालमत्ता रजिस्टर' (Immovable properties register) श्रीदेवाच्या जमिनी आणि त्या बाबत चा तपशील. यापूर्वी कुणीही असे काम केलेले नव्हते, ते केले आहे. केलेले कामकाज तुमच्या पर्यंत पोहोचवणे हे माझे कर्तव्य आहे. आणि म्हणून हे थोडे थोडे लेखन करून झालेले कामकाज सातत्याने तुमच्या ठायी पोहोचवण्याचा मी प्रयत्न करीत आहे. मित्रांनो, परमेश्वर म्हणतो की 'मी तुला काही कमी पडू दिलेले नाही... तू न मागता मी तुला देतो आहे. मग माझे काम फुकटमध्ये करून दे'. मित्रांनो, ही आज्ञा मी शिरसावंद्य मानतो आणि गुमानपणे त्याचे काम करत रहातो. हे भाग्य पुढच्या जन्मी येईल न येईल. या जन्मी काम करण्याची संधी मला मिळाली आहे. संधीचे सोने करणे हे माझे कर्तव्य आहे.

**● अहवाल... पंचवार्षिक... वार्षिक अहवाल –**

मित्रांनो, वार्षिक अहवाल २०१७/१८. प्रतिवर्षी अहवालाची सुरूवात या वर्षापासून केली. निमित्त ठरला एक गांवकरी 'संतोष'. ग्रामपंचायत मिठगवाणेच्या निवडणुकीत अकारण अंजनेश्वर देवस्थानच्या कारभाराबाबत टीकाटिप्पणी केली. परंतु मी ती टीकाटिप्पणी शिरसावंद्य मानून, अंजनेश्वरचा हुकूम समजून कामकाज केले. वार्षिक अहवाल प्रतिवर्षी देण्याचे नक्की करून तसा संकल्प केला. आणि दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर प्रथमतः अंजनेश्वरला अहवाल पुढ्यात ठेवून सर्व देणगीदारांना आणि सर्वांना व्हाटस्अप, फेसबुकद्वारे वार्षिक अहवाल पाठविण्याचे थोडेसे कष्ट घेतले. संधीचे सोने झाले. मित्रांनो, कधी कधी टीकाटिप्पणी कडे सुध्दा सकारात्मक पद्धतीने आपण पहायला शिकले पाहिजे. टीकाटिप्पणी करणाऱ्याला आपण आपला 'मार्गदीपक' समजले पाहिजे. 'निंदकाचे घर असावे शेजारी' असे म्हणतात ते बरोबर आहे. निंदेमुळे आपण सदैव अलर्ट रहातो. आपले काम निंदेमुळे सुधारते. अधिक

उजळ होते. मित्रांनो, अंजनेश्वर मंदिरावर सोन्याचा कळस बसला. त्यामुळे हा अहवाल आपण संग्रही ठेवला पाहिजे. मित्रांनो, '५१/५२ लाख किमतीचा सोन्याचा कळस' आणि त्यावेळी झालेला 'सुवर्ण कलशारोहण समारंभ' हे सर्व माझ्या आयुष्यातील अद्वितीय प्रसंगातील एक प्रसंग आहे. जोखीमीचे काम होते. धिटाईने आणि अत्यंत प्रामाणिक बुध्दीने पूर्ण केले आहे. श्रीदेव अंजनेश्वर आणि त्या वेळी उपस्थित असलेल्या २६ देवदेवता आणि भाविक भक्त हे साक्ष आहेत. मित्रांनो, सन २०२०/२१ च्या वार्षिक अहवालाची लिंक फेसबुक पेजला आहे. जरूर वाचा. मित्रांनो, यापूर्वी मी हे वार्षिक अहवाल तुम्हाला पाठवले आहेत. समाजस्मृती क्षीण होतात. फार काळ हे सर्व स्मरणात रहात नाही. कोणी काहीही बोलतो. अशा बोलणाऱ्या लोकांसाठी पुन्हा हे सर्व प्रसिद्ध करून ठेवले आहे. माझे भाषेत सांगायचे म्हटले तर ''उजेडी ठेवले आहे'' मित्रांनो, इतके करून एखादा अडमतडम बोलला त्याला आपण उत्तर देणे योग्य नाही. ते सर्व अंजनेश्वर पाहून घेईल असे म्हणायचे आणि अशा अडमतडमकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून टाकायचे. सर्व अहवालांचे क्यु आर कोड तयार करून ठेवले आहेत. या अहवालात ते छापले आहेत. सर्व अहवाल एकत्रितपणे पहाता येतील.

**● आर टी एस अपील –**

मित्रांनो, हे अंजनेश्वर जमीन क्षेत्राबाबतचे आदेश मे. अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी पारीत केलेले आहेत. आणि उपविभागीय अधिकारी राजापूर यांच्या कडील आदेश कायम केले आहेत. आर टी एस अपील मधील अंतिम आदेश फेसबुक पेजला शेअर केले आहत. अंजनेश्वर जमीन प्रकरणी असे आदेश होत असताना या जमिनीच्या वहिवाटींचे सर्वाधिकार अंजनेश्वर ट्रस्टकडे हस्तांतरित झाले आहेत. मित्रांनो, हे सर्व तुम्हा सर्वांना कळावे म्हणून येथे शेअर केले आहे. या मध्ये नफा/फायदा होईल तो अंजनेश्वर देवस्थान ट्रस्टचा होईल. मला फायदा तो कोणता झाला? या माझ्या प्रश्नामध्ये सर्व उत्तरे दडलेली आहेत.

**● इमारत मालमत्ता –**

मित्रांनो, कारण नसताना सन २०१७ मध्ये या ५ इमारती मिठगवाणे ग्रामपंचायतीने आपल्या मालमत्ता रजिस्टर मध्ये नोंदवल्या आहेत. वास्तविक इमारती खालील जमीन श्रीदेव अंजनेश्वरची आहे. ह्या सर्व इमारती श्री देव अंजनेश्वरसाठी बांधल्या गेल्या आहेत. यामध्ये लोकसहभागाचा हिस्सा रु. दीड लक्ष अंजनेश्वर देवस्थान ने खर्च केलेला होता. इमारती बांधकाम झाले सन २००३/०४ मध्ये आणि सन २०१७ मध्ये अचानकपणे या इमारत मालमत्ता ग्रामपंचायत मिठगवाणेच्या मालमत्ता रजिस्टर मध्ये नोंदवण्याची गरज नव्हती, तशी आवश्यकता नव्हती. परंतु अधिकार मिळाला की आपण काहीही करू शकता असे सर्व काही झाले. दस्तूरखुद्द अंजनेश्वरला सुद्धा याचा त्रास झाला. सरतेशेवटी मी पाठलाग घेण्याचे सोडले नाही. मला वाईटपणा आला. अंजनेश्वर दरबारी सर्व काही बोलणे करून हा हस्तांतरण प्रस्ताव सादर केला गेला. करायला भाग पाडले. मित्रांनो, अत्यंत चुकीचे काम सन २०१७ मध्ये ग्रामपंचायत मिठगवाणेच्या दप्तरामध्ये झालेले आहे. ग्रामपंचायत मिठगवाणेचे स्थावर मालमत्ता रजिस्टर कुणी पाहीले आणि त्या नोंदी पाहिल्यावर लक्षात येईल की हे का केले, कशासाठी केले, कोणता हेतु होता. मित्रांनो, अंजनेश्वरच्या जमिनीवर उभ्या असलेल्या इमारती ७/१२ सदरी नोंदण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागली. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांच्याकडे लोकशाही दिनात जाऊन सांगावे लागले की अंजनेश्वर देवाच्या जमीनीवर अनेक इमारती शासन खर्चाने बांधलेल्या आहेत. मात्र जमीनजागा श्रीदेव अंजनेश्वरची आहे. कोणत्याही परिस्थितीत या सर्व इमारती अंजनेश्वरच्या सातबारा उताऱ्यावर नोंदल्या गेल्या पाहिजेत. मित्रांनो, स्थळ पहाणी करून, पंचयादी घालून, अहवाल करून फेरफार क्रमांक नोंदवून १३ मारती अंजनेश्वर सातबारा उताऱ्यावर नोंदल्या गेल्या. मित्रांनो, हे पूर्वी कुणीही केले नव्हते ते मी पुढाकाराने केले आहे. त्यामुळे झालेले कामकाज आपल्यापुढे ठेवायला मला अजिबात संकोच वाटत नाही. मित्रांनो, कोणतीही गोष्ट लपवायची नाही असे माझे सामान्य धोरण असते. अंजनेश्वरचे बाबतीत माझ्या हातून झालेले सर्व कामकाज आपल्या समोर आणून ठेवायचे होतेच. मित्रांनो, हा कलेक्टर आदेशाने स्थळपहाणी अहवाल झालेला आहे. सांस्कृतिक कला केंद्रासह अंजनेश्वर जमीन जागा स. नं. ६२/८३वरील १३ इमारती सात बारावर आणण्यासाठी हे सर्व सव्य अपसव्य करावे लागले.

● **अर्पणदानाबाबत नोटीस –**

मित्रांनो, श्रीदेव अंजनेश्वरच्या समोरच्या अर्पणदान (Offerings) हे हिशोबात आले पाहिजे, आणि ते एकूण उत्पन्नामध्ये (Gross Income) लक्षात घेतले पाहिजे, असे धर्मादाय आयुक्त मुंबई यांच्या कडील सर्क्यूलर क्रमांक ५२ मध्ये नमूद आहे. हे सर्क्यूलर लक्षात घेतले तर या रक्कमेचा हिशोब ठेवणे आणि तो हिशोब धर्मादाय खात्याकडे आणि आयकर खात्याकडे सादर होणे आवश्यक आहे आणि बंधनकारक ( mandatory) आहे. त्यामुळे आजरोजी देवस्थान पुजारी लोकांना एक नोटीस करून हिशोब परस्पर धर्मादाय खात्याकडे सादर करण्यासाठी सांगितले आहे. तसेच दानपेटी बाबत एक तक्रार अर्ज पुजारी लिंगायत लोकांनी केला होता, तो निर्णित करून घेण्यासाठी सांगितले आहे. जनरल अफेअर्स सांभाळताना आजपर्यंतच्या देसाई विश्वस्तांनी देवस्थानचे हिशोब नीटपणे ठेवले म्हणून या देवस्थानचा नावलौकिक वाढलेला आहे. त्यामुळे समन्याय तत्व लक्षात घेतले तर **लिंगायत विश्वस्तांनी देवासमोर मिळणाऱ्या गुरवखी उत्पन्नाचे हिशोब नीटपणे ठेवले पाहिजेत आणि ते धर्मादाय आयुक्त आणि आयकर आयुक्त यांना सादर केले पाहिजेत.** देवदानची रक्कम तथा 'Offerings' हिशोबात आले पाहिजे. त्याची रोजकीर्द आणि खतावणी ठेवली गेली पाहिजे आणि त्याचे ऑडिट रिपोर्ट धर्मादाय विभाग व आयकर विभाग या दोन्ही विभागाकडे दिले पाहिजेत. अनेक दुरुस्त्या करताना ही शिल्लक दुरुस्ती करण्यासाठी आज नोटीस केली आहे.

● **जाहीर प्रसिध्दी पत्रक–**

निंदक नियरे राखिए ।
आँगन कुटी छवाय ।।
बिन पानी, साबुन बिना ।
निर्मल करे सुभाय ।।

मित्रांनो, निंदकाला आपल्या अगदी जवळ ठेवून घेतले पाहिजे. मग साबण आणि पाणी लागत नाही, असे संत कबीर म्हणतात. निंदक साबण पाण्याचे काम करतो. आपल्या स्वभावात किंवा आपल्या व्यवहारात काही उणीवा त्रुटी राहून गेल्या तर निंदकाच्या निंदेमुळे आपल्यातल्या कमतरता, उणीवा आणि आपल्यातले दोष निंदकामुळे कमी कमी होत जातात. आणि आपण रोजच्या रोज सुधारत जातो. संत कबीरांचा हा सल्ला आपण मानला नाही तर आपल्या सारखा मुर्ख कुणीही नाही. 'निंदकाचे घर असावे शेजारी' हे त्यासाठीच म्हटले आहे. निंदक हा मार्गदीपक ठरतो. देवाची फसवणूक यामधील 'दे' उच्चारल्याबरोबर आणि बँकेची फसवणूक या अक्षरपंक्ती मधील 'ब' उच्चारल्याबरोबर मी अंजनेश्वर देवस्थानचा कारभारी विश्वस्त म्हणून एक 'जाहीर नोटीस' करून मोकळा झालो आहे. व्हाटस्अप, फेसबुक, अंजनेश्वर नोटीस बोर्ड, आणि गावातील शिवाजी चौकातील महत्त्वाची ठिकाणे आदी सर्व ठिकाणी ही 'जनरल नोटीस' लावली आहे. हेतू इतकाच की श्रीदेव अंजनेश्वर कसबा मिठगवाणे हा ट्रस्ट अकारण कुणीही बदनाम करू नये. अंजनेश्वर देवस्थानच्या कारभारावर अकारण कुणीही ओरखडा पाडू नये. देवस्थान फेसबुक व वेबसाईटवर जास्तीत जास्त माहिती प्रयत्नपूर्वक अपलोड करून घेतली आहे. याचे संपूर्ण श्रेय निंदकाचे चरणी अर्पण केले पाहिजे. अंजनेश्वर रेकॉर्डरूममध्ये सर्व दप्तर क्रमवारीत लावलेले असते. ते कुणाही व्यक्तीला पहाण्याची संधी ठेवलेली असत. त्याबाबतचा प्रचार मला निंदकामुळे करता आला आहे. जो पुढे जातो तोच चुकतो. परंतु चुका दुरुस्त करण्याऐवजी पुन्हा पुन्हा नवनवीन चुका आपण केल्या तर मग 'निंदा' सुद्धा पराभूत ठरते. 'निंदा' मार्गदर्शक समजली पाहिजे. 'निंदा'' सोबती समजले पाहिजे. सोबतचे खुशमस्करी करणारे कधीही चांगला सल्ला देत नाहीत, ते खड्ड्यात घालण्याचाच सल्ला देतात. मित्रा. 'निंदक' हा मार्गदीपक असता. साबण, पाण्याबिना आपली स्वच्छता करत असतो.

● **पब्लिक ट्रस्ट मधील सर्व पब्लिक –**

पब्लिक ट्रस्ट म्हटले की पब्लिक ट्रस्टचे नियम कायदे लक्षात घेऊन कामकाज करावे लागते. ट्रस्ट म्हटले की धर्मादाय परिपत्रके अथवा आयकर कायद्याची परिपत्रके विचारात घेऊन कामकाज करावे लागते. ट्रस्ट म्हटले की ट्रस्टची घटना, परिपाठ किंवा धर्मादाय चे निर्णय लक्षात घेऊन आपली कामाची दिशा ठरवावी लागते. जेणेकरून

यथोचित कारभार आणि यथोचित हिशोब या मध्ये कुठेही भविष्यात अडचण उद्भवू नये. आपल्याला कळले असेल तर आपण सांगून टाकायचे आणि मोकळे व्हायचे असे ते सामान्यपणे माझे धोरण आहे. आणि जे जे अंजनेश्वर बाबतीत करणार ते तुमच्यापर्यंत पोहोचवणार असे ठरले आहे. थोडक्यात 'उजेडी' ठेवणार. आजकाल आपण जास्तीत जास्त नीटनेटके रहायला शिकले पाहिजे म्हणजे नंतर कोणतीही अडचण रहात नाही.

**● धर्मशाळा विस्तारीकरणाचे कामाला सुरुवात –**

मित्रांनो, दि. १३ सप्टेंबर २३ पासून वाळू आणि खडी मंदिरापर्यंत आणून ठेवण्याचे काम सुरू झाले आहे. धर्मशाळा विस्तारीकरणाचे कामासाठी म्हणजे पिलर आणि स्लॅब कामासाठी ६/७ डंपर खडी आणि ६/७ डंपर वाळू लागणार आहे. हे सर्व मटेरियल डोक्याने वहातूक करून मंदिरामागील धर्मशाळेपर्यंत न्यायचे आहे. प्रत्यक्ष स्लॅब ओतकाम गणपती नंतर लगेच सुरू करायचे असल्याने हे सर्व मटेरियल त्या पूर्वी त्या ठिकाणी नेऊन ठेवणे आवश्यक आहे. कॉन्टॅक्ट असे काही नाही. डिपार्टमेंटल मेथडने कामकाज करायचे आहे. त्यामुळे वाळू खडी जशी जशी आणून होईल तशी तशी रक्कम द्यायची आहे. सर्व रक्कम क्रॉस चेक द्वारे. बेअरर असे कामकाज मी करत नाही. थोडे मोठे बजेटचे काम आहे. म्हणून सर्व सर्व उजेडात ठेवून केलेले चांगले. १५/१६ लाख मर्यादेपर्यंत खर्च अपेक्षित आहे. वहातूक खर्च थोडासा जास्त येणार आहे. मंदिराच्या परिसराला कुठेही ओरखडा न पडता हे सर्व बांधकाम पार पाडायचे आहे. तुम्हा सर्वांना सांगितले आणि खुद्द देवाला वेळोवेळी सांगून कामकाज केले की फारसा भार मजला वाटत नाही. सारे हलके होऊन जाते. म्हणून हे असे लेखन करून ठेवायचे. ओझे काहीसे हलके करण्यासाठी. बाकी काही नाही. अंजनेश्वर म्हणतोच आहे की 'तू पुढे बघ. मागे वळून पाहू नकोस. मागचे मी पाहून घेईन' मित्रांनो, तरी सुद्धा हे सांगणे लिखीत स्वरुपात करून ठेवले की तशी मजला बोलायची गरज रहाणार नाही. हे 'लेखन' तसे फुकट जाणारे नाही.

**● निमंत्रण सीईओ जि. प. रत्नागिरी यांना –**

मित्रांनो, कार्तिकी उत्सवामध्ये सीईओ रत्नागिरी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद रत्नागिरी यांना उपस्थिती लावणे बद्दल निमंत्रण दिले आहे. अशी सर्व अधिकारी मंडळी एकदा येऊन सर्व काही बघून गेली तर ते आपल्या कामकाजाला पूरक होते. त्यानिमित्ताने ग्रामीण यात्रा स्थळ विकास योजनेचा निधी साठी उपयुक्त भेट ठरून जाईल. त्यानिमित्ताने शासननिधीतून बांधलेल्या इमारतींबाबतची उजळणी करता येईल. निमंत्रण पत्रव्यवहार स्पीड पोस्टाने पाठवला आहे. पुन्हा प्रत्यक्ष आमंत्रण द्यायचे. कोणत्याही परिस्थितीत ते उत्सवाचे वेळी आणायचे असे मी ठरवलेच आहे. आणि ठरवलेले श्रीदेवाला आणि पाठोपाठ तुम्हाला सांगून ठेवतो आहे. तुम्ही सर्व त्या वेळी उपस्थित राहिले पाहिजेत.

**● कार्तिकी उत्सवाबाबतचे निमंत्रण –**

